

म. ग्रं. सं. ठाणें
विषय भू प्रवास
सं. क्र. ६२९

REFBK-0023769
REFBK-0023769

द. वि. जोगळेकर

संदर्भ भू-प्रवास
६२९
२३५६९
७९।२।८३

# पहाड, पाणी आणि परी

(कश्मीर, कांगडा व कुलू – मार्गदर्शक माहिती पुरवणीसह)

REFBK-0023769
REFBK-0023769

द्वा. वि. जोगळेकर

अभिनव प्रकाशन, मुंबई १४

© सौ. विमल दा. जोगळेकर

प्रकाशक :
वामन विष्णु भट
अभिनव प्रकाशन
५३ गुरु नानक मार्केट
डॉ. आंबेडकर रोड,
दादर, मुंबई १४

मुखपृष्ठ चित्रकार : र. स. कंटक

छायाचित्रे : स्वतः लेखक
प्रथमावृत्ती : डिसेंबर १९६५
द्वितीयावृत्ती : जानेवारी १९८३

मूल्य पंधरा रुपये

मुद्रक :
विजया प्रिंटिंग प्रेस, झिराड
ता. अलिबाग. जि. रायगड

माझी दोन तपांवरील
सहचारिणी
सौ. विमल हीस -

# जरा एक मिनिट ....

नुकताच मी कष्मीर–कांगडा–कुलूच्या प्रवासाहून आलो होतो. 'निळे नंदनवन' या माझ्या कष्मीरच्या मार्गदर्शिकेची पहिली आवृत्ती कित्येक वर्षांपूर्वी संपून गेली होती. आणि माझे मित्र श्री. शंकरराव कुलकर्णी यानी त्याची दुसरी आवृत्ती काढण्याबद्दल सुचविले, त्यावरून हे पुस्तक लिहिण्याची कल्पना सुचली. त्यांनीच प्रसिद्ध करण्याचे मनावर घेतले. म्हणू प्रसिद्ध होत आहे. त्याचप्रमाणे माझे जेष्ठ मित्र श्री. अण्णासाहे महाशब्दे (या पुस्तकांतील अण्णा) श्री. पुरुषोत्तम धाक्रस व श्री. चिंतामणराव जोशी यांचीही मदत झालेली आहे, परंतु त्यांचे आभार मानणे त्यांस आवडणार नाही.

# आणखी एक मिनिट :

असल्या पुस्तकांची दुसरी आवृत्ती ही गोष्ट सहज आढळत नाही. पहिली संपल्यास अनेक वर्षे झाली. सतरा वर्षांपूर्वीची प्रवासांतील ही दैनंदिनी अद्यापहि वाचक गोडीने वाचतात. म्हणून माझे मित्र श्री. वामनराव भट यांनी ही दुसरी आवृत्ती काढायचे ठरविले. याबरोबरच **कष्मीर, कांगडा व कुलूच्या** हौशी प्रवाशांना मार्गदर्शक माहिती मिळेल अशी पुरवणी या पुस्तकाला जोडली आहे, माहिती अद्यावत व सविस्तर आहे.

दिनांक ८ डिसेंबर १९८२
३७७ वि. प. रोड, मुंबई ४

दा. वि. जोगळेकर

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
८२८
क्र. क्र. २३५६९
ग्रंथ शाखा

## ‘फ्रंटीअर मेल’

ऑक्टोबर १३, १९६४

**अण्णा** नि मी. दोघेच अखेर कुलू खोऱ्याच्या ‘यात्रे’ ला निघालो

जायचे नक्की ठरल्यावर तिकीटांच्या चौकशीला लागायलाच पाहिजे होते. चौकशीअंती समजले की पुढील दोन आठवड्यांची फ्रंटीअर मेलची, सगळ्या वर्गांची, सगळी राखीव तिकीटे संपलेली आहेत.

झाले ! आली आता सहलच रद्द करायची वेळ !

‘उडत’ जायची आमची ताकद नव्हती. शिवाय बघत बघत जायचे म्हटल्यावर उडता प्रवास काय कामाचा ? तेव्हा काही शौकिन मुले-कॉलेजांच्या फाटकांशी ‘लाईन मारीत’ घुटमळत उभी असतात ना, तसा तिकीट ऑफीसच्या खिडक्यांपाशी मी ताटकळत उभा राहू लागलो. आणि अखेर जमले. एका गृहस्थाने फ्रन्टीअर मेलची दोन तिकीटं परत करताना मी पाहिली. खिडकीपलीकडल्या ‘मण्डळी’ ना मर्म आणि चाटु वचनांनी विनंती करीत माझा वेटिंग लिस्टचा अर्ज परत आलेल्या तिकीटांच्या माहितीसह पुढे सरकावला.

अर्जावरची आमची नावे वाचून ‘एक नवल वर्तले.’ ‘अच्या ! तुम्ही अमक्याचे तमके काहो ?’ माझ्या रोखाने खिडकीच्या आतून प्रश्न आला. नि आमचा प्रश्न सुटला. चक्क ओळखच निघाली. तिकीटे खिशात पडली.

पहिल्या वर्गाची तिकीटे मिळाली, ती मी घेतली होती अण्णांना ही गोष्ट कितपत आवडेल याची धाकधूक मनात होती. असा सहज सढळ हाताने खर्च करण्याची सवय नव्हती. अमूक तारखेच्या आतली तिकीटे मिळाली तरच घ्यायची अशा मर्यादा घालून घेणे भाग पडले होते. दिवाळीला

आम्हाला मुंबईस परतायलाच पाहिजे होतें. जेमतेम तीन आठवडे मिळत होते, आणि ठरविलेल्या मर्यादेतील शेवटल्या दिवसाची म्हणजेच आजची पण पहिल्या वर्गाची तिकीटे मिळाली होती.

पण या पहिल्या वर्गाच्या तिकीटांबद्दल अण्णांनी भलताच मुद्दा उपस्थित केला.

'काही म्हटलंत आबा, तरी ही पहिल्या वर्गाची तिकीटे माझ्या स्वास्थ्यासाठीच काढलेली आहेत.' अण्णांनी भलताच गैरसमज करून घेतला होता. त्यांच्या स्वास्थ्यासाठी मला पहिल्या वर्गाच्या तिकिटांचा भुर्दंड पडला असे त्यांचे म्हणणे. परंतु वस्तुस्थिती तशी नव्हतीच मुळी.

'अहो अण्णा! ईश्वरसाक्ष खरं सांगतो. स्लीपरकोच वगैरे दुसरी कोणतीच तिकिटं मिळाली नाहीत आणि त्यात विशेष असं काय आहे? मलाहि अलिकडे पहिल्या वर्गाची तिकिटं काढावीच लागतात.'

'ती तुमच्या मंडळीच्या स्वास्थ्यासाठी हो!'

'म्हणजे? मला काय स्वास्थ्य टोचतं?'

'तुम्ही काय! व्यायाम-आसनवाले!'

'तसं नाही हां अण्णा! मला सुद्धा अलिकडे आराम हवासा वाटतो. तरुण का आहे मी आता? आणखी आठ-नऊ वर्षांनी तुमच्या सध्याच्या वयाचा झालो म्हणजे तुमच्या इतपत तरी माझी चपळता राहील की नाही कुणास ठाऊक!'

'तुम्ही आहात म्हणून! नाही तर खरं म्हणजे कोणत्या तरी प्रवासी कंपनीच्या डब्यातूनच आम्ही जायचे.'

'मला नाही वाटत ती तीस दिवसात चाळीस गावांची सहल तुम्हाला आवडेल. त्यांच्या बांधलेल्या कार्यक्रमाच्या खुंटाच्या परिघात फिरत राहाणं तुम्हाला मुळीच मानवणार नाही. 'पारतंत्र्यातील सुराज्यापेक्षा स्वातंत्र्यातील गोंधळ परवडला' पक्षांतले तुम्ही.'

'पण आता उतार वयात उरक नाहीसा झाला तर काय करावं आमच्या सारख्यांनी? शिवाय मोठमोठ्या मान्यवर व्यक्तींनी या प्रवासी कंपन्यांना दिलेली शिफारसपत्रे वाचल्येत ना तुम्ही?'

'वाचल्येत ना! त्यांच्या खरेपणाबद्दलहि मला शंका नाही. ज्यांना उरक

नसेल त्यांनी खुशाल जावं त्या डब्यांतून. परंतु एका मान्यवर भटक्यानं एकदां जाऊन आल्यावर पुन्हा कानास खडा लावून घेतला आहे ते माहीत आहे ना ?'

'ते खरंच आहे. शिवाय खर्चाच्या बाबतींत डावं उजवं कसं काय असतं त्याची कल्पना नाही काही.'

'वा! या आघाडीवर तर आपली निश्चित सरशी आहे. त्यांच्या तिसऱ्या वर्गाइतका आपला पहिला वर्ग स्वस्त ठरेल. कितीतरी अनावश्यक खर्च आपण टाळू शकतो. त्यांना ते टाळता येत नाहीत. त्यांचे काही खर्च फुकट जातात. व्यवस्थापनाचा खर्च असतोच. शिवाय त्यांचा तो धंदा आहे. ते पैसे जास्त घेतात अशी तक्रार असूच नये. मुख्य प्रश्न आहे तो म्हणजे खऱ्या भटक्याला ते मानवत का नाही, हा आहे.'

'तुम्ही स्वतंत्रपणं जाऊन कांही विशेष बघतां असं का तुमचं म्हणणं आहे ?'

'तो थोडासा आपल्या मानण्याचा प्रश्न आहे. परंतु एवढं मात्र नक्की की आम्ही आम्हाला हवं तेच बघतो. मनसोक्त बघतो. महत्वाचं, गौण आमचं आम्ही ठरवितो. आमचे आयोजक नियंत्रक आम्हीच असतो. अहो! ही डब्यांतली प्रवासी मंडळी प्रवासांतच मला पुष्कळ वेळा भेटली आहेत. काय काय पाह्यलं ते मोठ्या चवीनं सांगू लागतात. आणि आपल्याला असं आढळत कांही वेळां की त्या चवीत मीठच राहून गेलेलं असतं. त्या बिचाऱ्यांच्या ते गांवीही नसतं. मीहि त्यांचं 'अज्ञानांतील सुख' तसंच त्यांच्यापाशी राहू देतो. उगाच ढका लावून त्यांच्या रंगाचा बेरंग कशाला करा! खरं म्हणजे अण्णा, या प्रवासांतील ऐतेपणच मला बोचतं. प्रवास कसा स्वकष्टार्जित हवा! तरच तो प्रत्ययकारी ठरेल. जीवन कांही समृद्ध झाल्यासारखं वाटेल. ऐता प्रवास कितीहि सुखदायक असला तरी तो म्हणजे गाद्यागिरद्यांवर लोळणारांनी खाल्लेला पौष्टिक खुराक.'

'तुमच्या या सगळ्या गोष्टी अगदी खऱ्या आहेत असं आपण धरून चालू. परंतु उत्साहाच्या भरात एक गोष्ट मात्र विसरू नका.'

'अशी मी विसरण्यासारखी कोणती गोष्ट बुवा!'

'सांगून झालेलीच पुन्हा आठवणीकरता सांगतोय. तुमच्याबरोबर

माझ्यासारखा एक म्हातारा आहे हे लक्षात असू द्या. मला झेपेल इतपतच तुमची झेप असू द्या म्हणजे झालं!'

'आता काय सांगायचं तुम्हाला अण्णा! माझ्या प्रकृतीबद्दल तुमचा अगदी गैरसमज आहे. तुम्हाला जावत्रणार नाही त्याठिकाणी मीहि जाणार नाही असं आपलं ठरलंच आहे. पण हे सुद्धां एक ढोंग आहे. तुमच्या नांवाखाली मी मलाच जास्त जपणार आहे. तुम्हाला वाटतोय तितका टणक्या कांही मी आतां राहिलेलो नाही.'

तसे गेली दोन - तीन वर्षे आम्ही घोकत आहोत. एकदां कुलू खोऱ्याची यात्रा करून येऊ या. परंतु योग जमून येत नव्हता. दरवर्षी कांहीना कांही अडचणी यायच्या. म्हणजे यावर्षी आल्या नाहीत असे नाही. उलट जास्तच आल्या. (असे म्हटल्याशिवाय कर्तृत्व उठून दिसत नाही नै?) परंतु ठरता ठरता ऑक्टोबर महिना उजाडला कांही दिवसांनी दसराहि उजाडेल. दसऱ्याला सीमोल्लंघन करायचे असते. पण याला हिमप्रदेश अपवाद असतो. 'जनरल विंटर' शी मुकाबला करायला कुणी तयार नसते. चीनसारखा शत्रू सुद्धां! एकूण हिमप्रदेशांत जाण्याचा हंगाम संपत आला होता. आणि रेल्वेच्या सवलतीच्या तिकिटांचा सुद्धां. तेव्हां निघायचे तर ताबडतोब निघायला पाहिजे होते.

'कुलूला आपण जातोच आहोत तर एकदां रेकॉर्डला लावण्यापुरतं तरी आम्हाला कश्मीर दर्शन घडवा की!' असे अण्णानी म्हटल्यावर या तीन आठवड्यांत थोडेसे कश्मीर आणि बरेचसे कुलू खोरे पाह्यचे आम्ही ठरविले दोन्हीकडील आराखडा तीन आठवड्यांत बसवायचा! मोठे कठीणच काम होते! माझी कश्मीरची सहल नऊ वर्षांपूर्वी चांगली महिनाभर सवडीने झाली होती. पण त्रेसष्ट वर्षांचे अण्णा, कश्मीर पाहायला म्हणून थोडेच पुन्हा निघणार होते! शिवाय पहाडांतील उंच उंच ठिकाण पायी अगर घोड्यावरून जाऊनहि त्यांना झेपण्यासारखी नाहीत. तेव्हां कश्मीर सहल, प्रवासीकंपनीच्या डब्यांतल्या सारखी उरकायची; आणि कुलू मात्र हौसेमौजेने त्यांतल्यात्यांत सावकाशीने पाहायचे असे ठरविले.

ऐन विशीतल्या प्रवासांची आज आठवण येते. मुंबई - महाबळेश्वर ही आमची सायकल - ट्रिप दोन अडीच रुपयांत भागायची. थोडेसे हाल होत

असत जिवाचे. पण त्या वयांत त्यांची क्षिती बाळगत होता कोण ? एक वर्ष तर सायकली मराठवाड्यापर्यंत हाणल्या होत्या.

अलिकडे दहा पंधरा वर्षांत झालेल्या सहली मात्र त्या मानाने आरामात झाल्या. ब्रह्मचर्याश्रमांतील सहलींच्या मानाने या सहकुटुंब सहली आरामात व्हायच्याच. यातही एक मख्खी असते. स्त्रीदाक्षिण्यापायी आपल्या वाट्याला येणारा आराम, हालांच्या सरहद्दीवरचाच असतो.

प्रौढपणातले कांही दौरे पुढाऱ्याच्या ऐटीतही झाले आहेत. म्हणजे दस्तुर खुद्द पुढारी किंवा व्ही. आय. पी. आहेत असे नव्हे. तसे मुळीच नाही. गैरसमज नसावा. परंतु माणूस एखाद्या 'मिशन' वर गेला म्हणजे त्याची बडदास्त पुढाऱ्यासारखी आपोआपच ठेविली जाते की नाही ? तसे फुकट भाव खाण्याचे योग काही वेळा आले आहेत, इतकेच !

आता पन्नाशीनंतर सुद्धा भटकायची हौस कायम आहे. आपण काय काय पाहिलं आहे त्याच्यापेक्षा काय काय पाहायचं राहिलं आहे. त्या स्थळांची यादी मनात घोळत असते. या सर्व आठवणी, हालअपेष्टायुक्त आणि सुखमय प्रवासांच्या, आता रवंथ करायला बडा मजा येतो !

इंजिनांतल्या कोळशाचे कंकर एवढ्या बंदोबस्तातूनसुद्धा किती हे आत आले आहेत ! कदाचित वातानुकूल डब्यांमध्येच फक्त त्यांना मज्जाव असेल. बाकी सर्वत्र त्यांचा संचार चालू आहे.

दमण गंगा मध्यरात्रीच पार केली आहे. हे प्रांतांतर क्रमांक एक. उद्या सकाळी आम्ही उठू तेव्हा प्रांतांतर क्रमांक दोन झालेले असेल. राजस्थानात असू तेव्हा आम्ही.

# 'फ्रंटीअर मेल'

## ऑक्टोबर १४, १९६४

**भारताच्या** राजधानीवरून गाडी नुसती गेली ! राजधानीत पाय सुद्धा आम्ही ठेवला नाही. तरी सुद्धा राजधानीचे वारे जाणवले. इथे भोजनगृहाचा डबा लागला. ऑर्डरवाल्याने आमच्या नुसत्या चहाच्या ऑर्डरकडे साफ दुर्लक्ष केले. बरोबर दोन टोस्ट आणायला सांगितल्याबरोबर दोन मिनिटांत सर्व सामानाचा ट्रे आला. टोस्टचा भुर्दंड फुकट म्हणजे आमच्या जवळ घरचे फराळाचे भरपूर असताना. दुपारी जेवण भरपेट झाले होते.

राजधानीवरून जाताना राजधानीच्या आठवणी अपरिहार्य होतात. मुंगलकालीन पादशाही राजधानीच्या दंतकथा आणि 'किस्से' यांच्यात तुलना केली तर आताची राजधानी संख्येत आणि 'गुणवत्तेत' सुद्धा पूर्वीच्या राजधानीवर मात करील कदाचित्. स्थलकालांत, नांव रूपात बाह्यतः फरक पुष्कळ झाला आहे. परंतु राजधानीच्या अंतःस्वरूपात फार थोडा फरक आढळून येईल.

त्याच चोरवाटा, तीच कळीची दारे नि तशीच भुयारे यथापूर्व आहेत. यांची माहिती नसल्यास बिनमाहितगारास पूर्वीप्रमाणेच तटाबाहेर उभे राहावे लागते. कुळवंतिणी नि कुणबिणी त्याच आहेत. बादशाहाची जरा कुठे कमजोरी दिसली तर सिंहासन बळकावू पाहाणारे महत्वाकांक्षी शहाजादे आहेत. आणि सिंहासनावर कोणी येवो कोणी जावो, आपले आसन संभाळून राहाणारे सचीव तसेच आहेत.संधी मिळाली की कुटिल कारस्थानांना तसाच ऊत येतो.

लोकशाही नि समाजवाद यांची तत्वे, थोर चिंतक सांगून गेले आणि

सांगत आहेत. ज्यांच्यापर्यंत ती पोचली आहेत त्यांतील बहुसंख्य ती स्वतःच्या महत्वाकांक्षेकरता राबवतात. बाकीच्या अफाट जनसमुदायापर्यंत ती पाझरलीच नाहीत.आपण म्हणतो जग बदललं आहे, बदलत आहे. किती पण? न कळण्या-इतपत! महत्वाकांक्षी माणसातला जंगलीपणा जवळ जवळ तसाच आहे. सामान्य माणसाचे सामान्यपण आहे तसेच आहे. मतलब, राजधानीतील बलप्रयोग (व्यक्तिगत ऐवजी आता सामूहिक, एवढाच फरक!) यथापूर्व चालू आहेत.

गाडी आता ऐन पंजाबात आली आहे.बाहेरचे काही सुध्दा दिसत नाही. परंतु काही पाहायचे चुकणार आहे म्हणून चुकचुकायचं काही कारणच नाही. मधूनच दिसणाऱ्या गावांतील घरांचे कृत्तिका नक्षत्रासारखे पुंजके आणि चहू - बाजूला वाटोळी क्षितिजे या शिवाय या मैदानी मुलखात, या द्रुतगती गाडीतून बघण्यासारखे असते तरी काय! खंडाळयाचा घाट नाही, डुंगरगडचे जंगल नाही; कोल्ह्या जवळचे रंगीबेरंगी खडक नाहीत, इतकेच काय पण वाडी - हैदराबादकडे दिसतात तशा खेळांतल्या बुडकुल्याप्रमाणे एकावर एक चढलेल्या प्रचंड शिळा सुध्दा नाहीत. शतलूज मात्र रात्रीच्या झोपेत ओलांडली जाणार असल्यामुळे पाहायची चुकणार आहे. बियास सकाळी भेटणारच आहे.

दिल्लीला आमच्या कंपार्टमेंटमध्ये सैनिकी कचेरीतील एक डोगरा तरुण आला आहे. गोरा! तरतरीत! कांतिमान! किती देखणा आहे! जम्मूचा न तो! जम्मू-काश्मीरमधील झाडूवाले नि मेहेतर (यांना तिकडे जमादार म्हणतात.) आपल्यापैकी बहुतेकांपेक्षा (आमच्यापेक्षा तर नक्कीच) देखणे असतात. काश्मीर आम्हाला उद्या दिसायचं आहे. परंतु त्या प्रांतांच्या इतिहास भूगोलां-तील 'टोपोग्राफी' मात्र आताच नजरेसमोर तरळू लागली आहे. बाहेरचे काही दिसत नाही. साहजिकच दृष्टि अंतर्मुख बनत आहे.

समोर दिसते आहे ते पामीर पठारावरून आलेल्या आर्यांनी वसविलेले काश्मीर. काश्यपमीर-काश्मीर! वुल्लर सरोवराचा दीड हजार चौरस मैलाचा जलमय प्रदेश. यांतूनच झेलम-वितस्तेचा कालवा काढून पाण्याचा निचरा केल्यावर वस्ती करण्यास योग्य असा हा भूभाग ज्या इंजिनियराने वसविला त्या ऋषिवर्य काश्यप मुनीचा हा काश्यपमीर-काश्मीर! वैदिक कालात ज्याने मार्तंडे-श्वराचे अफाट वेलाग शिळांचे सूर्यमंदीर उभारले त्या राजा रामदेवाचे काश्मीर!

सम्राट ललितादित्याचे नि अवंतीपूरच्या अवंतीवर्म्याचे कश्मीर ! झुलकादरखाँ आझादखाँ नि महादखाँ या मोगली जुलमी सुलतानांचे कश्मीर ! यांच्या जुलमाने नि भयाने वनवासास गेलेल्या हिंदूना अभय देऊन ज्याने त्यांचे पुनर्वसन केले त्या झैन् उल अबदीनचे, त्या परमधर्म सहिष्णु मोगली थोर सुलतानाचे कश्मीर! अकबरादि दिल्लीपतींचे कश्मीर! पंजाबच्या प्रतापी राणा रणजितसिंगाचे कश्मीर आणि अखेर जम्मूच्या गुलाबसिंगादि डोगरा राजांचे कश्मीर !

या डोगरा तरुणाने ही मालिका चालविली. या तरुणाच्या सामानाचे केव्हढाले ढीग समोर पसरले आहेत ! जाणे-येणे मुष्कील झाले आहे हा रजा घेवून चालला आहे आपल्या घरी, जम्मूला. आणि आमचा मुंबईपासूनचा सहप्रवासी नारायणन् तोहि रजा संपवून कामावर रुजू व्हायला चालला आहे जम्मूलाच. परंतु याचे सामान म्हणजे नुसती ट्रंक वळकटी. त्याच्या उलट, घरच्या माणसांना नाना भेट-वस्तू देऊन खूष करण्यासाठी कनवालने पेटारे भरुन आणले आहेत. आणि नारायणन् ते रिकामे करुन आला आहे. आपल्या प्रेमाच्या नि लोभाच्या सुहृदांना भेटायला चाललेल्या कनवालचा चेहरा कसा फुललेला आहे. उलट त्यांचा निरोप घेवून आलेला नारायणन् प्रौढ असून सुद्धा कालपासून विमनस्क, उदास आहे.

आज स्नान भोजनोत्तर झाले. उद्या बहुधा स्नानाच्या गोळ्याचा घ्यायला पाहिजेत. परवा श्रीनगरास पोचल्यावर स्नान होईल. दोन स्नानांतील अंतर कमीत कमी असावे म्हणून आज उशीरा स्नान. काहीतरी आपलं मनाचे समाधान ! कोळशाच्या किटाळाने या पहिल्या वर्गाच्या डब्यांत सुद्धा नुसता धुमाकूळ मांडलाय. जंक्शनवर मेहेतरकडून साफ करुन घेता येते. पण तोपर्यंत हात जोडून पाहात थोडेच राहावते ! म्हणून एक झटकणे बनवलेय. मळखाऊ म्हणून आंध्रच्या तांबड्या कापसाच्या सुताचा कुडता घातला आहे. पण किटाळाने त्याचा सुरेख 'मॉटल ग्रे' रंग बनावला आहे.

सकाळी कोटा जंक्शनवर गाडी थांबल्यावर बाळ पंडितची आठवण झाली, आणि स्टेशन मास्तरच्या खोलीत जाऊन त्याचा ठावठिकाणा विचारला. मास्तर काहीच बोलले नाहीत. परंतु त्यांनी टेलिफोन जोडून 'बोला' म्हणत टेलिफोनचा रिसीव्हरच माझ्या हाती दिला. पंडित घरी भेटला हेच आश्चर्य वहिनीहि घरी होत्याच. स्टेशनवर येऊन भेटण्यास त्याना आता वेळ उरला

नव्हता. तीं पोहोचायच्या आत गाडी सुटली असती. आधी कळविले नाही म्हणून दूरध्वनीवरून शंखध्वनी केला. कळविले असते तर वहिनींनी कदाचित स्टेशनवर भेटायला येताना कसला तरी डबा भरून आणला असता. गरम गरम घरची न्याहारी झाली असती. सगळं खरं! पण मला हे जमत नाही! आधी लिहून स्टेशना-स्टेशनावर माणसांचा घोळका जमा करणे! त्यातली किती मनापासून येतील, किती भीड पडून येतील हे सांगता येत नाही. त्या पेक्षा त्या भानगडीतच न पडलेले बरे!

आश्चर्य असे की अण्णांनीहि वाटेतल्या कोणत्याच गावी कुणा इष्टा मित्राला कळविले नव्हते.

'काहो अण्णा, तुम्ही का कुणाला कळविले नाही?' मी अण्णाना गाडी कोट्याहून पुढे गेल्यावर विचारले होते.

'कशाला कळवायचं?'

'दिल्लीला तरी निदान रात्रीचं जेवण, नाहीतर गरम गरम थालीपीठ-मोटारीतून आलं असतं!'

'असं? तुमचा काय अनुभव आहे, तो तुम्ही मला इतक्या वेळ सांगितलात. तरी सुद्धा मी कळवायला हवं होतं?'

'माझ्यापेक्षा तुमची गोष्ट निराळी आहे.',

'काही निराळी नाही आहे.'

'माझ्या एका दूरच्या नातेवाईक मुलानं मनमाडला पहाटेस आम्हाल जोंधळ्याची भाकरी, चटणी आणि दूध आणून दिल्याचं पण सांगितलं होतं ना? अजून त्याची आठवण येते.'

'अशा आठवणी किती?'

'अपवादात्मकच! पण आठवतात त्याच, पुन्हा पुन्हा.'

'बरं मग, तुम्ही कुणाकुणाला कळविलंत?'

'कुणालाच नाही.'

'झालं तर मग! उगीच कुणाला भीड पडायला नको!'

इतर मोठमोठ्या शहरांप्रमाणे या कोट्याच्या परिसरांत सुद्धा धुरांडी नि चिमण्या दिसू लागल्या आहेत. औद्योगीकरण म्हणजे समृद्धी असे समीकरण आहे ना हल्लीच्या युगाचे? कृषिप्रधान भारताला अन्नधान्याबाबत अवलंबून

राहावं लागत आहे ते मात्र उद्योगप्रधान अमेरिकेवर ! केवढा भयंकर विनोद आहे ! परदेशी माणसाला हे समजल्यावर ( आणि ते समजतेच ) आमच्या पंचवार्षिक योजनाक्रमाचे त्याला किती कौतुक वाटत असेल !

दुपारी मथुरा जंक्शन आले. तिथे न उतरताच मथुरा आणि वृंदावन या दोघांची तुलना मनात सुरू झाली. मथुरेतील भांडखोर नि शिरजोर चोबे आणि तिथली दुर्गंधी या दोनच गोष्टी नजरेसमोर आल्या. उलट वृंदावनाच्या आठवणी किती प्रसन्न होत्या ! बाबूजींचे आरसपानी मंदिर तर रंगनाथाचे काळ्या पाषाणाचे. ती कुंजगली ! तो कदंबवृक्षाखालचा डोह ! ती मीराबाई ! यांच्या सभोवतीच्या आणि त्यांत गुरफटलेल्या दंतकथा कशा सजीव वाटतात ! गोरसाची स्वस्ताई नि शुद्धता आठवून तोंडाला आताहि पाणी सुटत आहे. गाडी हलली तेव्हा तो गोपालकृष्णाचा परिसर दृष्टीआड झाला.

उद्या आम्ही कश्मीरच्या हद्दीत शिरणार आहोत. त्या आधी काही खास कश्मीरी शब्द अण्णांच्या कानावर घालून ठेवायला हवेत. नाहीतर ‘ चश्मा ’ आणि ‘ नाग ’ हे शब्द भलत्याच संदर्भात ऐकू आले की चेहरा कोराच राहतो. ‘ चश्मा ’ म्हणजे डोळ्यांना लावण्याचा नव्हे आणि ‘ नागा ’ वर दहाचा आंकडाहि दिसायचा नाही. चश्मा म्हणजे लहान झरा (पुष्कळ वेळा पन्हळी अगर नळी लावलेला. ) आणि नाग म्हणजे मोठा चश्मा अगर त्यांचा समुदाय. पुष्करिणीच्या तळाशी असतो तसा. ‘ बल ’ म्हणजे तळे किंवा सरोसर. ‘ सार ’ म्हणजे मोठे सरोवर. ( अमसुलाचे किंवा चिंचेचे, भुरकायचे सार नव्हे. )

हाऊस बोट आणि शिकारा यांचीहि मंडळी गल्लत करीत असतात. हौसबोट म्हणजे नांगरलेले अगर तारांनी बांधून ठेवलेले पाण्यांतील तरंगते नौकागृह—आणि शिकारा म्हणजे होडके. सामानाचा शिकारा आपल्या होडक्या-सारखाच असतो. परंतु प्रवाशांचा शिकारा म्हणजे लहानशा मंडपीखाली अलीशान बैठकी घालून भोंवताली सरक पडदे असलेली सपाट तळाची होडी.

♣ ♣

# ‘बनिहाल’
## ( पॅरिस हॉटेल )

---

## ऑक्टोबर १५, १९६४

**सकाळी** नऊच्या सुमारास आम्ही पठाणकोट या शेवटच्या स्टेशनवर उतरतो. या पुढील श्रीनगर पर्यंतचा दोनशे बासष्ट मैलांचा प्रवास बसचा आहे. आज दसरा. नऊ वर्षांपूर्वी आम्ही इथे उतरलो होतो त्या दिवशीहि असाच एक सण होता. राष्ट्रीय सण! पंधरा ऑगस्टचा स्वातंत्र्यदिन! त्या दिवसाची आठवण राहाण्यासारखी एक गोष्ट तिथे घडली होती. रेल्वे खात्यातर्फे फलाटावर ध्वजवंदनाचा कार्यक्रम होता. परंतु गंमत अशी की तिथे जमलेल्या एकाहि माणसाला पुरे राष्ट्रगीत अवगत नव्हते. अखेर ते आमच्या बरोबरच्य कमलताईंनी म्हटले.

दसरा असला तरी या सणाची म्हणून इथे काही निशाणी दिसत नाही. कुलूला आज मात्र मोठी झुंबड उडाली असेल! धालपूर मैदानात! कुलूचा हा सर्वांत मोठा सामूहिकरीत्या साजरा करायचा सण. सर्व खोऱ्यातील देवदेवता मिरवणुकीसाठी कुलूला एकत्र आणल्या जातात. माझी अर्थात् ही पुस्तकी माहिती आहे. तरी सुद्धा या सणाच्या सांगतेच्या आधी एखादा दिवस आम्ही कश्मीर उरकून कुलूला पोहोचू अशी उमेद आहे. कारण त्यांचा हा महोत्सव इथून पुढे दहा दिवस चालतो.

मुंबईहून गाडीत बसायच्या आधी आम्ही इथल्या सरकारी वाहातूक खात्याला तार केली होती. आमच्या जागा राखून ठेवण्याबद्दल. तेव्हा जागेकरता काही धडपड न करता तिकिट मिळेल अशी आपली माझी कल्पना. पण कसचं काय हो! तार आल्याची इथे कुणाला दादहि नाही. माझ्या एकट्याच्या तारेची ही हकीगत नाही. इतरांच्या तारांचीसुद्धा तीच गत.

शेवटी मी रांगेत उभा राहतो. नुसते उभे राहून भागत नाही. मध्येच कुणी घुसू नये म्हणूनहि काळजी घ्यावी लागते आहे. वास्तविक रांगा लावण्याची संस्कृती नागरी. आणि तिथे उभे असलेले सगळे प्रवासी नागरीच आहेत. परंतु मध्ये घुसण्याची संस्कृती सुद्धा नागरीच आहे, हेहि माझ्या लक्षात येते. पहिल्याच गाडीची तिकीटे मिळाली म्हणून मी घाईघाईने अण्णांना सांगायला येतो. सामान आम्ही टपावर चढवून घेतो. हात पिशव्या आणि शाली संभाळीत गाडीत बसतो. आणि गाडीत बसल्यावर मग पहिल्या गाडीचे 'सुख' आमच्या प्रत्ययास येते.

आमची तिकिटे पहिल्या गाडीत, पण शेवटच्या क्रमांकाची होती. गाडी सुटल्यावर आम्ही बसमधून प्रवास करीत नसून सांडणीवर स्वार झालो आहोत असे भासू लागते. गाड्या खऱ्याखुऱ्या आराम गाड्या आहेत. परंतु रस्ते आरामात नसून आजारात पडलेले आहेत. रस्ता-दुरुस्ती, थेट मुंबईच्या चालीवर वाटोवाट अविरत चालू आहे. नाही तरी भारतात प्रत्येक चळवळीचे पुढारीपण आज अर्धशतक तरी मुंबईनेच सांभाळले आहे. हा दावा मुंबापुरीने या बाबतीत सुद्धा खोटा का पडू द्यावा ?

'पूजेची' (आपल्या कडील दिवाळीची) सुट्टी सुरू झाली की प्रत्येक बंगाली नि उडिया प्रवासी जो उठतो तो श्रीनगरचेच तिकिट काढतो, (पठाणकोठ शेवटचे स्टेशन असले तरी रेल्वेचे तिकिट बसच्या आकारासह श्रीनगरचे मिळते) किंवा कसे नकळे ! पठाणकोटला उतरल्यापासून कानावर जो शब्द येतोय तो आपला 'ऑ'कारांत. भारी बडबडी जमात ! आमच्या बसमधल्या चोवीस प्रवाशात एकोणीस ऑकारांती आहेत. त्यांच्या ऑमारतॉमार पुढे अण्णा आणि मी काही वेळ आपापसात बोलायचेसुद्धा विसरतो.

नऊ मैलावर लखनपूरला गाडी थांबते. आम्ही खाली उतरतो. अण्णा एक सिगारेट मला देतात, एक आपण घेतात. पंचवीस वर्षे मी दुसऱ्याची— फक्त दुसऱ्याचीच—विडी पितो आहे. स्वतःच्या खिशात बाळगीत नाही. हा माझा संयम म्हणायचा का स्वतःची पदरमोड होऊ नये म्हणून माझ्याकडून होत असलेला हा भटजीपणा याचा थांग मला अद्याप लागत नाही.

'बरं का अण्णा ! नऊ वर्षापूर्वी आम्ही इथं आलो ना, तेव्हा या रावीकाठीं, या कश्मीरच्या सरहद्दीवर एक गंमत झाली.' मी सिगरेट शिलगावून अण्णाना म्हणत होतो.

'गंमत ?' माझ्या 'नऊ वर्षापूर्वीच्या गम्मती' आताच तर सुरू होत होत्या.

'हं गंमत ! तेव्हा या जम्मू-काश्मीरच्या सरहद्दीवर प्रवेश-परवाना दाखवावा लागे. आमच्यापाशी तो होताच. परंतु पंजाबांतील एका पाटीलबाबाजवळ तो रीतसर नव्हता. रीतसर नव्हता म्हणजे परवान्याकरता करायच्या आवेदनपत्रकावर तिथल्या स्थानिक आमदारानं शिफारस केल्यावर त्या पत्रकालाच तो परवाना समजला, आणि आला तेच घेवून इथपर्यंत.'

'मग ? सोडला की नाही त्याला ?'

'नाही हो ! परत जावं लागलं बिचाऱ्याला. भारताच्या या अविभाज्य भागांत त्याला प्रवेश नाकराला गेला.'

'श्यामाप्रसादांचा सत्याग्रह इथेच झाला होता ना हो ?'

'हो, इथेच.' यावर आम्ही दोघेही स्तब्ध होतो.

त्यानंतर घडलेल्या दुःखद घटनेनंतर प्रवेशपरवाना रद्द झाला होता. परंतु 'भारताच्या या अविभाज्य भाग प्रकरणाची' वाटचाल मात्र कशी जैसे थेच आहे याबद्दल आम्ही बरेचसे बोलतो. गाडी पुढे चालू लागते.

टवी नदी ओलांडून गाडी जे. ॲन्ड के. च्या जम्मू या हिवाळी राजधानीत शिरते. नदी ओलांडल्यानंतर लहानशी टेकडी चढल्यावरच हे गांव लागते. तरी सुद्धा पंजाबांतील इतर मैदानी गांवाप्रमाणे या गांवाची उंची हजार फूटच आहे. हिवाळ्यांत इथून लांबवर हिमशिखरे दिसत असली तरी इथे गांवात बर्फाचा ताप नाही. म्हणून राजधानी इथे आहे. गांव टेकडीवर असल्याकारणाने घाण पाण्याचा निचरा नैसर्गिकरीत्याच होऊन जात असला पाहिजे. म्हणून गांव स्वच्छ वाटते.

पाकिस्तान सरहद्दीवर करीत असलेल्या नित्याच्या कटकटीच्या बातम्या वर्तमानपत्रातून आपण वाचतो त्या बहुतेक जम्मूहून आलेल्या असल्याचे आठवते. म्हणून मी चौकशी करतो, सरहद्द इथून किती दूर आहे ? तेव्हा समजते कीं ती फक्त पंधरा मैलच आहे. सरळ रेषेत याहूनहि कमी असेल.

गाडी इथे सुमारे तासभर थांबणार आहे असा अंदाज येतो. सांगताना जेवणासाठी अर्धा तास गाडी थांबणार आहे,असेच औपचरिकरीत्या सांगण्यात येते, परंतु आपल्याला छापील दोन ओळींच्या मधला न लिहिलेला मजकूर वाचता येतोच कीं नाही ?

म्हणून आम्ही रघुनाथजी मंदिराकडे मोर्चा वळवितो. डोंगरांचे हे कुलदैवत. याचे सोनेरी कलश उन्हांत चमचमत प्रकाश - पल्लवीच्या भाषेत आपल्याला बोलावतात. नेटके आणि देखणे देवस्थान आहे. इथे लक्षावधी शिवलिंगे आहेत म्हणतात. शिमिटांत मोठ्या वैदुलासारखी बसविलेली बरीचशी दिसतात खरी ! उंचावरील प्रशस्त प्राकारामुळे ही वास्तु लोभस वाटते.

गाडी उधमपूरच्या पुढे सरकते. उधमपूर कश्मीरांतला सगळयात मोठा लष्करी तळ. गाडी या पुढचा कूडचा घाट चढू लागली म्हणजे खऱ्या कश्मीरची चाहूल लागते. वर निमुळते होत गेलेले पाईन्स आतापर्यंत दक्षिणी नवख्या प्रवाशाने फक्त चित्रांत पाहिलेले असतात. त्यांचे साक्षात् दर्शन त्याला प्रथम इथे होते. घरांच्या प्रांगणात नि डोंगरांच्या उतारावर जी जी म्हणून वनस्पती दिसते ती सर्वस्वी अपरिचित. तुळशी, सब्जा, आंबा, वड, पिंपळ, निंब, कश्शाकशाचे नांव नाही. आता रस्ता गर्द जंगलांत चढत आहे तर दुसऱ्या क्षणी वळणे मारून मोकळ्यावर येत आहे. सभोतालच्या सृष्टीचे स्वरूप भव्य, थोडेसे रौद्र, रोमाचकारी काटू लागले आहे. आणि आपल्या क्षुद्रपणाची जाणीव होऊं लागली आहे. आपली बस खेळण्यातली वाटू लागली आहे.

आता कूड गाव आले. आरंभीच्या वळणावरचा 'चष्मा' च सांगतो आहे. शेरे कश्मीरांना बंदिवासांत ठेवले होते तेच हे गाव म्हणून लक्षात येते. आता गाडी गावात आलेली असते. हा डाव्या हाताला डाकबंगला. अरे गाडी थांबली नाही ! चहा पिण्यापुरती सुध्दा नाही. बटोलला थांबेलच. गाव मागे राहिले. वळणावरचा मैलाचा दगड उंची अठ्ठावनशे फूट दाखवितो. बापरे ! म्हणजे हे कूड सवाई महाबळेश्वर !

गाडी पट्टणचा घाट चढू लागली आहे. वळणावरून खाली उजवीकडे पाहिले की वर येणाऱ्या बस नि टूरिंग, खेळातल्या वाटू लागतात. आपली बस मात्र मोठी ! मागच्या वळणावर झटदिशी एक बस आपल्या पाठीमागेच आलेली दिसते. तिची चाहूल लागूनच की काय आपली बस गीअर बदलून नेटाने वेगाने चढाव चढू लागते. तिच्या 'र्‍हिं-र्‍हिं-र्‍हिं' आवाजाने मागच्या गाडीचे आव्हान तिने स्वीकारलेले असते. 'काय बिशाद मला पकडशील !' असा ध्वनी त्यांतून ऐकू येत असतो. सुमारे अर्धा तास हा पाठशिवणीचा खेळ चाललेला असतो.

आता पुन्हा एकदा रस्ता झाडीच्या गुहेत शिरतो आहे. एकजात सगळा देवदार! वेंगेत मावणार नाही एव्हढाला एक एक वृक्ष! उंच सरळ सोट! छाया इतकी गर्द की दुपारी चार वाजता, द्वां एकादीच उन्हाची पत्रावळ जमिनीवर पडलेली दिसते. ही देवदारवट सगळे आकाशच वरच्यावर पेलून धरते आहे. हवा थंडगार! हातासरशी ठेवलेल्या शाली नि फरकोट भराभर प्रवाशांच्या अंगावर चढत आहेत. आम्हीहि ती काळजी घेतलेली आहेच. पुन्हा एकदा बससह आम्ही एक क्षुद्र वळवळणारे जीव झालो आहोत मैलाच्या दगडांवरील उंचीचे आंकडे आता आमचे लक्ष वेधून घेत आहेत. सदुसष्टशें फुटांचा आकडा मघाशीच पहिला. पुढचा अडुसष्टशें फुटांचा. मग सात हजार! आठ हजार! उंचीची झिंग आली आहे दहा हजार फुटांपर्यंत तरी गाडी चढतच राहावी असे वाटते आहे. आणखी गेली तरी हरकत नाही!

परंतु तसे होत नाही. कसेबसे काश्यापर्यंत अडुसष्टशें फूट होतात. आणि गाडी उताराला लागते. झिंग उतरते. समोर पीरपंजालच्या रांगा दिसू लागतात सगळे भुंडे डोंगर! नीरस! खडकांची करड्या रंगाची आंतडी बाहेर दिसत असतात. या देवदारवटीतून, आरामशीर जागेवर बसून समोरच्या डोंगराला नाव ठेवायला सोपे होते. परंतु तो बिचारा सगळी हिमवादळे आपल्या छातीवर पेलून धरतोय, म्हणून कश्मीर खोऱ्याचे फूल जमीनदोस्त होत नाही, ही गोष्ट लक्षात आल्यावर त्याचे भुंडेपणही धन्य वाटू लागते. या भुंड्या पहाडांतच बनिहाल बोगदा आहे.

देवदारवटीची गुहा आता संपली आहे. रस्त्यानं एक सफाईदार वळण मारलंय. आता समोर बटोट दिसू लागलंय. रात्रौ मुक्कामाला गाड्या कूड किंवा बटोटला थांबतात. कूडला गाडी थांबली नाही तेव्हा बटोटला थांबणारच. तशी ती थांबतेहि. परंतु मुक्कामाला नाही. चहा पिण्यापुरती. चक्रधर (ड्रायव्हर) सांगतो आपण रात्रीच्या मुक्कामाला बनिहालला (टनेलच्या पायथ्याजवळचं गाव) जाऊ. म्हणजे उद्या सकाळी सोपं पडेल. श्रीनगरला लवकर पोचूं. सकाळी एकदा बोगदा झटदिशी पार केला की लष्करी गाड्यांचा त्रास टळेल. उद्या त्यांचा वार आहे. म्हटले चला! बनिहालला तर बनिहालला! पण इथे चहा घेतल्याशिवाय तर निघणार नाही आहोत ना आपण? नाही मग कबूल? मग काही हरकत नाही.

बटोट ! उंच उतारावर गाव आहे. समोर रस्ता चिनाबला गाठायला भराभर कोसळत जात आहे. आसमंताचे क्षितीज पहाडामुळे मर्यादित झालेले आहे. निसर्गाचा हा छायाचित्रांचा स्टूडियो आहे. इथे गाढवाचे जरी छायाचित्र घेतले तरी ते देखणे येणार आहे स्टूडियोची मांडणीच तशी नेटकी आहे.



निसर्गाच्या स्टूडियोतील गाढवाचे चित्र

पाय मोकळे करून येऊन ( म्हणजे लघुशंका उरकून ) मंडळी विश्रांतिगृहात चहा पीत बसली आहेत. मालकाने रेडियो चालू केला आहे. मुंबईस ऑस्ट्रेलिया भारत कसोटी क्रिकेट सामना चालू आहे. वेळ संपत आला आहे. आणि सामनाहि. सामना अडीचकांड्यांवर आला आहे. पतौडी उडाला ! चंदू बोर्डे नि इंद्रजित यांच्यावर आता आशा लोंबकळत आहेत. तिथे असणाऱ्यांना आता एकच इंद्रिय आहे कान ! चहा कपात निवतो आहे. अर्धी मोडलेली बिस्किटे आमच्या समोरच्या बशांतून तशीच पडली आहेत. आता फक्त बारा धावा पाहिजे आहेत ! यांपैकी आठ-नऊ तरी चंदूलाच काढाव्या लागणार

आहेत! दुसऱ्या नवख्या गड्याचं ते काम नाही! आता दोनच पाहिजे आहेत! आणि कानठळ्या बसविणारा आवाज रेडिओमधून येऊ लागला आहे. भारताने सामना जिंकला आहे. विजयी टोला चंदूचाच असणार! मैदानावरील उन्माद रेडियोवरून उतू जातो आहे त्याची प्रतिक्रिया हॉटेलमधल्या सगळ्यांवर झाली आहे. पोकळ धोतरवाले नि पुंगळी इजारवाले अक्षरशः नाचत आहेत. हातांतल्या सिगारेटी फेकून टाळ्या पिटीत आहेत. हाताच्या पिपाण्या वाजवीत आहेत. हॉटेल मालक मालक राहिले नाहीत, ग्राहक ग्राहक राहिले नाहीत. कुणी हिंदू नाही, कुणी मुसलमान नाही. कुणी मरेठा नाही, कुणी बंगाली नाही. इथं आहेत ते सगळे ब्रॅबॉर्न स्टेडियमवरचे बेभान प्रेक्षक. आपण जिंकलो आहोत हा एकच भाव सगळ्यांच्या चेहऱ्यावर विलसत आहे.

चक्रधराने गाडीचा भोंगा वाजविला. पुन्हा एकदा सगळे स्टेडियममधून बटोटमध्ये उतरले आहेत. गाडीत पाय टाकायच्या आधी भानावर आलेल्या मालकाने सगळ्यांकडून योग्य ते पैसे घेतले आहेत. कॅमेरावाले अद्याप 'क्लीक' करीतच दूरदूर आहेत. चक्रधराने गाडी चालू करून थोड्या अंतरावर पुन्हा उभी केल्यावर सगळे आता येऊन बसले आहेत. चिनाबला भेटायला रामबनकडे रस्ता कोसळत चालला आहे. अवखळ चिनाबची सागरी गर्जना आता स्पष्ट ऐकू येत आहे.

रामबनला चिनाबवर एकेरी वाहतुकीचा पूल आहे. गंगामैया, जमुना मैय्या सारखे हिला चिनाबमैय्या म्हणावेसे वाटत नाही. अल्लड पोरीला हे भारदस्त नाव शोभणार नाही. लामांच्या लडाखमधून ही चिनाब हिमाचल काश्मीरमध्ये नुकताच प्रवेश करते आहे. नाचा - बागडायचेच तिचे वय आहे. आत्ता आपले हात पकडून आपल्याबरोबर धावत येते, तर दुसऱ्या क्षणाला काहीतरी कारणाने रुसून फुगून द्रुतगतीने लांब पळते. पुन्हा जवळ येते. पुन्हा पळते कुठच्या कुठे दूर! आता ती दृष्टीआड झालेली आहे.

रस्ता दुरुस्तीला आता ऊत आला आहे. रस्ता धुळीचा आहे. परंतु वाहतूक फारशी नाही. निवांतपणी हेडलाईटस्च्या प्रकाशझोतांत चांगल्या वेगाने रस्ता काटला जातो आहे. चक्रधराचा होरा बरोबर ठरत आहे.

संध्याकाळचे सात वाजले आहेत. परंतु तासभर रात्र झाली आहे आणि गाडी बनिहालच्या 'पॅरिस हॉटेल' पाशी उभी आहे. डाव्या बाजूला त्याची

पार्टी दिसते. इथे या हॉटेलमध्ये वस्तीला राहाण्याची चक्रधराची शिफारीश आहे. कुठे काळोखांतून जाता डाक बंगला शोधायला! म्हणून मी सामान काढायच्याही आधी एक खोली ठरवायला जातो. पॅरिस हॉटेलची कळा किंवा अवकळा आडगावातल्या टावरणाची आहे. त्याचा पश्चिम भाग पाहिला म्हणजे मुंबईच्या झोपडपट्टीचीही आटवण येत आहे. टावरणांतल्या गैरसोयी नि झोपडपट्टींतला गलिच्छपणा अशा दोन्ही 'शोभा' इथे एकवटल्या आहेत.

रात्री झोपण्यापुरता तर प्रश्न! तीन रुपयाला एक खोली ठरवून सामान आणले आहे. दोन झोळणा झालेल्या खाटांवर ते पसरुन दिले आहे. जमिनीवर नि भिंतींवर पोपडे निघून सुंदर नक्षीकाम झालेले आहे!

हात - पाय धुवायला मालक एका पिंपाकडे बोट दाखवतो. त्यांतले पाणी गरम आहे म्हणून सांगतो. प्रवाश्यांची काळजी वाहणारा मालक बघून आम्हाला दिलेल्या जागेच्या दारिद्र्याबद्दल मी त्याला क्षमा करतो नि हातावर पाण्याचा नळ सोडतो. कसचं गरम पाणी! त्या गारठणक पाण्याने हाताची बोटे आणखीच ताठरतात. थंडी चिक्कार पडलेली आहे. पाणी बहुधा सकाळी गरम केलेले असावे. आणि चेंडू दुप्पट उसळी मारतो त्याप्रमाणे आता ते सूडबुद्धीने आणखीच गार झाले असावे. आमच्या जवळ असलेले सर्व गरम कपडे या नमनालाच पणाला लावावे लागणार आहेत.

मिळाले त्यांतल्या त्यांत निवड करून आम्ही पोटपूजा उरकतो. आण्णा खिशांतली पुडी काढून लवंग - सुपारी माझ्या हातावर ठेवतात. आणि आम्ही खोलींत परत येतो. बघतो तो काय! तीन वंगीय प्रवासी आमच्या खोलींत जाड लव्हाळ्यांच्या चटयांवर पसरलेले. मालक आमच्या मागूनच खोलींत प्रवेश करतो. तो आम्हाला सांगतो, ते आमचे भागीदार आहेत. वर आणखी बजावतो, 'तुम्ही मुंबई कलकत्तावाली शहरी माणसं. बाहेर ओसरींत तुम्हाला झोपूं दिलं तर या सर्दीत निमोनिया व्हायचा! शिवाय आपण सगळेच भाई भाई. एकमेकांशी सहकार्यानं आपण वागायला नको काय? जरा सांभाळून घ्या एकमेकांना.' हा नक्की स्थानिक पुढारी असला पाहिजे अशी मी मनाशी खूण-गाठ बांधतो. त्या तीन बांधवांची सोय लावल्याचे पुण्य आणि तीनच्या ऐवजी दाड रुपयांत खोली पडणार आहे, ह्या सुखद विचारांत 'भागीदारां'ची कोण,

कुठले, चौकशी करतो. ते बंगलाभाषी असले तरी बंगाल्यातले नव्हते. ओडिसातल्या सिंगभूम मधले होते. सिंगभूम म्हणजे बंगालची सरहद्दच.

सगळे शौकिन लोक कानावरून गरम गळपट्टे बांधून नि गरम पांघरूण ओढून चिडीचिप्प झोपले सुद्धा. मीच तेवढा आंबटशौकी ही रोजनिशी लिहीत बसलो आहे.

दिवा मालवून अंथरुणावर पडल्यावर समोरच्या डोंगरापलीकडले ते निळे नंदनवन दिसू लागणार आहे.

♣ ♣

# ‘श्री न ग र’

## (महालक्ष्मी हॉटेल–बादशा ब्रिज)

## ऑक्टोबर १६, १९६४

**सकाळी** पॅरिस हॉटेलच्या त्या ‘महाला’त जाग आली, तेव्हा दाराच्या फटीतून अगर खिडकीवरच्या काचेतून उजेडसुद्धा दिसत नव्हता, पांघरुणाबाहेर हात काढवेना इतकी थंडी! कश्मीर खोऱ्यात तर आम्हाला अद्याप उतरायचेच आहे! त्या आधीच इतकी थंडी! या वर्षी बर्फ लवकर पडायला लागून आमच्या सहलीचा विरस तर होणार नाही ना!

काल चक्रधराने सांगितले होते मुद्दाम. बडे फजल आपण निघालो तर ‘सुबह सुबूमे’ श्रीनगरास पोहोचू. पुढचा रस्ताहि निर्वेध आणि डांबरी होता. पांघरुण बाजूला सारले. उठलो. अण्णा जागेच होते. एक ‘भागीदारहि’ जागा होता. त्याला सुचविताच त्याने आपल्या सोबत्यास ‘बंगाली’त जागे केले.

मी ‘कराग्रे वसते लक्ष्मी! करमध्ये सरस्वती ....’ अशा थाटात म्हणू लागलो की जसा काय आम्हा मराठी माणसांचा हा नित्य पाठच आहे. तोंड धुवून आल्यानंतर ‘या कुन्देन्दुतुषार हार धवला’ चालू केले. मुंबईस नित्यपाठ म्हणजे प्रभातसमयी उठून रबराची नळी कराग्रांत धरून ‘आज पाणी पुरे भरून होतेय की नाही’ ही विवंचना करणे हा. तिथे कुठली लक्ष्मी नि सरस्वती! अण्णा मिशीतल्या मिशीत हसत होते ‘म्हणजे तुम्हाला हे तोंड-पाठ येताय तर!’ एवढेच म्हणून माझ्या झाकल्या मुठीत काही नाही हे त्यांनी ओळखले होते तर!

टावरणांतील चाय बरी होती. दूध कदाचित रात्रीचे निरसेच त्याने सकाळच्या चहाला ठेवले असावे, किंवा उशीरा आल्यामुळे निरसेच राहिले

असेल. या अशा थंडीत ते नासण्याचा संभव नाही. काही का असेना ! चहा झक्क जमला होता. सगळ्यांनी दोन-दोन ' कोप ' घेतला.

हॉटेल मालकाचा हिशोब खोलीच्या पुऱ्या भाड्यासह मी चुकता केला. ' भागीदार ' आपल्या बरोबर गाडीत आहेतच. ते आपणहून देतील पैसे. मागायचे कशाला ? बरे नाही दिसत पैसे मागणे !

उठल्यापासून अर्ध्या तासात सर्वांचे सामान टपावर पूर्वस्थितीवर आले होते. सूर्योदय व्हायच्या आत. ( कदाचित नुकताच झाला असला तरी ते पहाडांच्या आकाश-भिंतींमुळे आम्हास समजणे शक्य नव्हते. ) रस्ता काटायला सुरुवात झाली. नवीन बोगद्याच्या तोंडाशी पोचलो. सूर्य चांगला दांडभर वर आला होता. बोलता बोलता सहज वंगीय मित्रांच्या तोंडून माहिती बाहेर पडली. हॉटेल मालकाने त्यांच्याकडूनहि खोलीचे भाडे वसूल केले होते. म्हणजे आम्ही ' भागीदार ' खरे परंतु ' भागी ' मात्र मालकाची होती. गेल्या नऊ वर्षात कश्मीर एवढे बदलले होते काय ?

पीर पंजालच्या नव्या दोन मैली बोगद्यातून कश्मीर खोऱ्याच्या बाजूला गाडी बाहेर पडली. आणि पहातो तो काय ? कश्मीर खरोखरीच बदलले होते. समोर कश्मीर खोरे सगळेच्या सगळे पसरले होते—पण हे रुखे सूखे नि भुंड्या डोंगराचे. मागील खेपेस पावसाळ्याच्या अखेरी अखेरीस पाहिलेल्या कश्मीरचे मी वाटभर अण्णांजवळ पवाडे गात आलो आणि आता हे समोरचे पानगळी लागलेले कश्मीर पाहून अण्णांनी मला गाजरपारखी म्हटले असेल ! माझे मन पार खट्टू झाले होते. नऊ वर्षांपूर्वीच्या माझ्या आठवणीतील ' निळे नंदनवन' हे नव्हते. नऊ वर्षात ते काय इतके सुरकुतले ? म्हातारे झाले ?

क्वचित् दिसणाऱ्या हिम शिखरांचा तेव्हढा विरंगुळा वाटत होता, आपल्या घरी पाहुणा आलेल्या रसिक मित्राला आपल्या आवडत्या नाट्य-प्रयोगाला मोठ्या हौशीने घेऊन जावे आणि त्यात प्रमुख कलावंताचे काम त्या दिवशी एखाद्या सामान्य नटाने करावे, म्हणजे आपला जसा विरस होईल तसा माझा हे समोरचे कश्मीर बघून झाला होता.

पण आश्चर्य असे की अण्णांचा तसा काहीच विरस झाला नव्हता. ' अजायब घर ' बघावे तसे ते चहूकडे कुतूहलाने पाहात होते. माझी टकळी बंद झालेली पाहून त्यांची सुरू झालेली होती. ' ही हिमशिखरं कोणत्या

भागातली, ती कोणत्या भागातली ?' म्हणून ते चौकशी करीत होते कसे झाले तरी ते कश्मीर होते ! पावसाळी ओढा नव्हता तो. अगदीच काप जाऊन नुसती भोके राहिली नव्हती. समुद्राला ओहोटी लागली नि त्यातील पाणी कमी झाले तरी त्याचा अथांगपणा कितीसा कमी व्हायचाय ! प्रथम पहाणाराला ते भरपूर आकर्षक वाटत होते. गळायला आलेली पाने सुकट पिवळी झालेली नव्हती. तांबूस सोनेरी होती ती. निसर्गाचा दैवी बगीचा होता तो कश्मीर !

खरी गोष्ट अशी होती की आम्हाला यायला महिना-दीडमहिना उशीर झाला होता. इकडे यायला उत्तम दिवस म्हणजे ऑगस्ट अखेर पासून ते सप्टेंबर अखेरपर्यंत. पाऊस संपलेला असतो. वनस्पतींचा माज कायम असतो. फळांचा हंगाम बहरात आलेला, भूमि सुजलां सुफलां झालेली. थंडी पुढं यायची असलेली, मे महिन्याच्या सुटीची गर्दी काही महिन्यापूर्वी टळलेली, दिवाळी-पूजेची सुटी पुढे राहिलेली, आणि परिणामी सगळीकडे गर्दी कमी असते. सुखसोयी आणि वस्तू माफक दरात उपलब्ध असतात. अशी ही त्या दिवसातली सहल 'आखूड शिंगी, बहु दुधी, कमी खाणारी !' अशी बहुगुणी असते. ही झाली व्यवहारी दृष्टी. या पलीकडे निरनिराळ्या ऋतूत कश्मीरची निरनिराळी वैशिष्ट्ये बाकी राहातातच. चेरीब्लॉसम नि फुलांचा बहर मे-जून-मध्ये आल्याशिवाय दिसणार नाही. स्कीईंग स्केटिंग सारखे बर्फावरील खेळ डिसेंबर जानेवारीतच खेळायला मिळायचे.

नऊ वर्षापूर्वी आम्हाला ऑगस्ट सप्टेंबरचा मोका बरोबर मिळाला होता. आम्ही आज पार केलेल्या या नव्या बोगद्याची 'खुदाई' तेव्हा चालू होती. तेव्हा हा पीर पंजाल पुरा चढून काठ्यावर आले की आपण नऊ हजार फुटांवर येत होतो. कात्रजच्या घाटमाथ्यावर असलेल्या लहानशा बोगद्यासारखा एक बोगदा पार केल्यावर त्या नऊ हजार फूट उंचीवरून समोर सोळाशे मैल क्षेत्रफळाचा कश्मीर खोऱ्याचा गालिचा उलगडलेला अकस्मात दिसे. चक्रधराला सांगितले तर तो खुशीने गाडी उभी करीत असे. मोटार रस्त्याची ही उंची जगात पहिल्या क्रमांकाची समजली जाई.

गाडी थांबल्याबरोबर कॅमेरावाले, दुर्बिणवाले धडाधड गाडीखाली उड्या टाकून आपली हत्यारे परजीत असत. समोरचे दृश्य विमानात बसून पाहात असल्यासारखे भासे. इतके अनोखे ! इतके वैविध्याने नटलेले ! तिथून हलूच नये असे वाटे.

पायतळींच्या व्हेरिनाग (मूळ नांव व्हर्नागझे—लमचे तथा वितस्तेचे उगमस्थान) पासून वितस्तेचा मागोवा घेत घेत थेट वुल्लर सरोवरापर्यंत नजर पोंचे. पलीकडे उत्तर सीमेवरचा नंगा पर्वत. २६६२० फूट उंचीचा. या खोऱ्याचा तळ सगळा सपाट. काहिलीसारखा. या प्रचंड काहिलीच्या भिंती खाली हिरव्या कंच. वर वर निळ्या शार. पहाड कुठे संपले नि आकाशाची निळाई कुठे सुरू झाली हे दुर्बिणीशिवाय लक्षांत येऊ नये इतकी रंगसंगती जमलेली. गहिऱ्या निळाईची. सागर आकाशापेक्षा गहिरी !

हे दृष्टि-सुख ऑगस्ट अखेर येऊन सुद्धा आता यापुढे प्रवाशांच्या नशीबात नाही. नऊ हजार फूट उंचीचे सहजासहजी भेटणारे ते थ्रील् आता संपले आहे. आता दोन मैलांचा बोगदा पीर पंजालच्या पोटांतून खोदला आहे ना ! लिलिपुटियनांनी खुपसलेली ही टांचणी त्या गलिव्हरला समजली सुद्धा नसेल.

रस्ता बारमाही चालू रहावा, हिवाळ्यांतहि बर्फाने वाहातूक अडू नये म्हणून हा बोगदा खोदला आहे. तरीहि क्वचित बर्फ याचे तोंडच बंद करतो. म्हणून आता त्याचे तोंड बांधीत बांधीत बर्फ रेषेच्या खालपर्यंत आणण्याचे



कश्मीरची गंगोत्री — व्हेरिनाग

काम चालू आहे. काही कामे दुसऱ्या पिढीलाहि उरतात, तरी गैरसोयी मात्र सरत नाहीत ! या वोगद्यांतली दीपावली मात्र दिवाळींतली आहे.

इथल्या बस - गाडीवाल्यांचा एक रिवाज आहे. पुष्कळ रिवाज कायद्यां-पेक्षां काटेकोरपणे पाळले जातात. Conventions are nobler than laws असे ब्रिटिश मानतात. इथला रिवाज म्हणजे प्रत्येक प्रवाशाकडून पन्नाससाठ पैसे घेऊन वाकडी वाट करून गाडी व्हेरिनागला न्यायची कश्मीरची ही गंगोत्री पाह्यचा इतका सोपा मोका कोणता प्रवासी सोडणार ! आणि आमची गाडी अपर मुंडाच्या आधीच व्हेरिनागकडे वळली.

आपल्याला सवय अशी आहे की नदीचा उगम कुठे तरी डोंगर चढून गांठायचा. महाबळेश्वर, भीमाशंकर, त्र्यंबकेश्वरचं गंगाद्वार आणि उत्तरेसहि अशीच गंगाद्वारे आहेत. इथे मात्र चक्क सपाटीवर एका अष्टकोनी पुष्करणींतून दर सेकंदास एकशे तेहतीस घनफूट पाणी, हिरवी छटा असलेले स्फटिकवत् स्वच्छ पाणी, जोरात उसळी मारून वर येत आहे. जहांगीर बादशाहाने १६१२ सालात ही पुष्करिणी बांधविली. पुष्करिणीपासून फर्लांगभर पाण्याचा पाट बांधून सभोवती बगीचा बनविला आहे.

पाटाच्या जवळ फुलझाडे आणि बागेत लहान थोर वृक्ष शिस्तींत लावलेले आहेत. कश्मीरची बहुतेक नागरी वनस्पती इथेच प्रथम एकत्र अशी आणि जवळून पाहायला मिळते आपल्या पसरलेल्या हाताच्या पंजा सारख्या आणि हाताएवढ्या फताड्या पानांचा कश्मीरचा राष्ट्रीय वृक्ष, चिनार ! कोणत्याही कलाकुसरीच्या कामांत या पानाची कुसर हमखास असायचीच. या पानांचा रंगसुद्धां उगवत्या सूर्यबिंबासारखा आहे. कांही दिवसांतच ही पाने गळणार आहेत. परंतु ती गलितगात्र मात्र दिसत नाहीत.

सफरचंद, बगूगोषा, बदाम, चेरी ( अर्थात् पुष्पहीन ) वगैरे झुडुपीं झाडे बागेतच होती. रस्त्यावर सरळ सोट पॉप्लर ( सफेदा ) वृक्ष शंभर शंभर फूट उंचीचे, आपल्याकडील शाखायुक्त ताड - माड जणू, असे दुतर्फा होते. तर पुष्करिणीच्या मागील टेकडीवर देवळातल्या घंटेच्या आकाराची फुले ( की फळे ! ) लोंबत असलेले देवदार वृक्ष होते. अण्णा आणि इतर मंडळी हे झाड कसले, ते कसले म्हणून मला विचारीत. तसा तज्ञपणाचा मुखवटा मी कालपासून धारण केला होता किंवा काय कुणास ठाऊक ! परंतु

खेडेगावच्या अर्धतज्ञ शाळामास्तरसारखी माझी स्थिति होती. क्वचित एखाद्या प्रश्नावर उत्तर देताना माझी अवस्था अवघडल्यासारखी होत होती. अर्धसत्य किंवा थाप यावर वेळ मारून न्यावी लागत आहे. अहंकार हार कबूल करू देत नाही. तज्ञपणाचा बुरखा टाकवत नव्हता.

काझी-गुंडला चाय-नाष्ट्यासाठी गाडी उभी राहिली. इथे हमखास गिऱ्हाईक गरजू असते. टावरणवाले भरमसाट आकार घेतात खाद्यवस्तूचा. यापुढे खानावल बिजबिहार, पांपूर (केशराच्या शेतीसाठी प्रसिद्ध), अवंतीपूरवरून दल गेटाजवळील प्रवासीकेन्द्रांत गाडी श्रीनगरला येऊन उभी राहिली आणि तिथल्या घड्याळात अकराचे ठोके पडले. पटाणकोटहून काल सकाळी निघालेल्या स्पेशल स्टेशन वॅगन्स, काल रात्रीपर्यंत येऊन पोचल्या होत्या. पोहोचायला हरकत नाही आम्ही आलो त्या बसगाड्यानासुद्धा. परंतु फ्रंटीयर मेल आल्यावर निघायलाच त्यांना दहा वाजतात. नाही तर मुंबईहून सकाळी निघालेल्या गाड्या रात्रीला अडीच तीनशे मैल रस्ता काटतातच. इंदूर गवालियार तीनशे मैल अंतर बस एकाच दिवसात जाते. पठाणकोट-श्रीनगर अंतर दोनशे बासष्ट मैल. नव्या बोगद्याने ते आणखी कमीच केलेय. परंतु बरोबर किती कमी ते मोजलेच नसावे. जुने मैलांचे दगड अद्याप तसेच कायम आहेत.

जे.अॅन्ड के.ची ही राजधानी बावनशे फूट उंचीवर आहे. जुनी शहरांतील मुख्य वहातूक झेलममधून होडीने सातपुलाखालून होत होती. म्हणून जलमार्ग असलेल्या या शहराला पूर्वेकडील व्हेनिसहि म्हणतात. दुपारीसुद्धा इथे चांगला गारवा वाटला. मागील खेपेस ऑगस्टमध्ये इथे उतरल्यावर मुंबईच्या आणि या हवेत काहीच फरक वाटला नव्हता.

आता आम्ही दोघेच नव्हतो राहिलो. बसमधील दोन वंगीय शिक्षकांनी कष्मीरपुरती आमची साथ धरायचे ठरविले होते. गाडीतल्या माझ्या बडबडी-मुळे मी कष्मीरचा माहितगार अशी त्यांची गैरसमजूत झाली आहे. सामान उतरवून रस्त्यावर आणून मी बादशा ब्रिजचा टांगा ठरवू लागतो. त्याआधी क्षेत्रस्थ पंड्यांप्रमाणे आमच्या मंडळीना ‘एजन्ट’ या जमातीने घेरले होते. आणि आमचे बंगाली शिक्षक त्यांच्या जाळ्यात सापडत होते. त्या दिवशी प्रवासी केंद्रावर एकहि खोली रिकामी नव्हती याचे भांडवल प्रत्येकाने केले होते.

श्रीनगरला उतरल्याबरोबर प्रत्येकाला कसले स्वप्न दिसत असेल तर ते

म्हणजे हाऊसबोटीचे-नौकागृहाचे. हे जलमंदिर कसे असेल! त्यात राह्यला काय मजा येत असेल! प्रवाशांचे हे दौर्बल्य एजन्ट जमातीने बरोबर हेरलेले असते. आणि त्या दिशेने त्यातले काही आपले घोडे दामटवीत असतात. आमच्या वंगीय शिक्षकांचा मासा त्या गळाला लागला आहे.

'अरे बाबूशाब ! देखिये तो मेरी हाऊस बोट ! बडी अफलातून है. मिजाज आपकी खूष हो जायगी.' एजन्टाचा अनुनय चालला आहे.

'तोमार हाऊस बोट क्या पानी में है?' बंगाली कलाशिक्षकाची चौकशी. आता नौकागृह काय डोंगरावर असतील? मास्तर या संज्ञेबद्दल नि या अश्राप जमातीबद्दल मला नुसती सहानुभूतीच नव्हे, तर आदरहि आहे. मला कुणी विचारले तुम्ही 'अमूक अमूक' नसता तर काय होण्याची तुमची इच्छा होती? (आता आमचं 'अमूक अमूक' मुळीच महत्त्वाचे नसल्यामुळे आम्हाला हा प्रश्न कोणी विचारणारच नाही, हा भाग निराळा!) तर मी सांगितले असते 'मास्तर'. ('गणिताचा प्राध्यापक' म्हणून टिळकांसारखे सांगण्याची पदव्यांच्या अभावी सोयच नाही!) परंतु तरीसुद्धा 'बोट पानी में है क्या?' हे प्रश्नहि ह्याच मंडळींनी विचारावे.

'पानीमें याने पानीके ऊपर तेरती है, बाबूशाब!' डॉईंग शिक्षकाला चड्डी वर सारणारा विद्यार्थी समजून हाऊस बोटवाला समजावीत होता.

'तो मॉशॉय हम लोग क्यूं नही जाते हाऊसबोट में?' कला शिक्षकाने मला विचारले. या नव्या सहकाऱ्यांना एकदम 'नाही' म्हणणे कठीण होते. अण्णांनी यावर तोड काढली. चिनार वृक्षाखाली ते स्वतः आणि दुसरे शिक्षक यांनी सिगरेटी ओढीत सामान संभाळीत चिनारच्या आरामशीर छायेत बसावे आणि आम्ही दोघांनी प्रथम ती हाऊस बोट पहावी. ती पसंत नसली तर दुसरी जागा ठरवून परत यावे नि मगच सगळ्या गठल्या-पोटल्यांसह सगळ्यांनी मिळून ठरविलेल्या जागेत जावे, असे ठरले.

'हां हां! चलिये!' म्हणून हाऊसबोटवाल्याने मान डोलविली.

कसली हाऊस बोट नि कसले नौकागृह! झेलमच्या चिखलांतील ते एक मचवा-गृह होते. मोडकी तोडकी पार्टिशन्स आणि विटलेले फर्निचर बघून माझ्या बरोबरचा कलाशिक्षकहि ओशाळला बिचारा आणि माणशी अकरा रुपये दररोजचा दर! दोन ठिकाणी आणखी चौकशी करून आम्ही नागजीभाईच्या

या महालक्ष्मी हॉटेलात चार खाटा असलेली खोली राहाण्याच्या फक्त पांच रुपये भाड्यात ठरविली. बादशा ब्रिजच्या प्रशस्त रस्त्यावरची दुसऱ्या मजल्यावरची ही खोली चांगली हवा-उजेडाची आहे. चहापाणीहि इथेच मिळते. फक्त जेवायची सोय मात्र दुसरीकडे पाहावी लागते. तेहि आम्हाला सोईचे वाटतेय.

पहिल्यापासून माझा या नौकागृहाबाबत एक ग्रह आहे. नौकागृहात राह्यचे असेल तर चांगल्या 'अ' वर्गीय नौकागृहात आणि दल सरोवरातील स्वच्छ पाण्यांत असलेल्या नौकागृहांत राहावे. मध्यम वर्गातील माणसांसाठी हा योग जमून यावा लागतो. तसा आमचा योग नऊ वर्षांपूर्वी जमून आला होता.

पहिला भाडोत्री त्याची सुट्टी संपल्यामुळे निघून गेला होता नवीन भाडोत्री ठरला होता; परंतु तो यायला आठवड्याभराचा अवकाश होता. आणि मधल्या मुदतीत आम्हाला चार पाच दिवसांची सवड होती. त्याच मुदतीत ते आम्हाला मिळाले होते. नक्षीदार वेलपत्ती काढलेल्या बैठका अंथरलेल्या होत्या. चकचकीत फर्निचर होते. उंची क्रॉकरी, कटलरी कपाटात व्यवस्थित लावून ठेवलेली होती. निरनिराळ्या बेडरूम्स, बाथरूम्स होत्या. दिवाणखाना होता. निराळे जेवणघर होते. तिथे आमच्या बायका मंडळींनी मराठी जेवण चार पाच वेळी तरी स्वतःच रांधले होते. आणि या सर्वांवर ताण म्हणजे गच्चीवर खऱ्या फुलझाडांची बाग असलेली एक छोटीशी मंडपी होती. आणि हे सर्व आमच्या खिशाला परवडणाऱ्या भाड्यात! दिवसभराची सहल संपवून आणि जेवणे उरकून रात्री त्या पारदर्शक रुपेरी चांदण्यात शाल पांघरून इथे बसले की ती मंडपी आमच्या गप्पा मधात बुडवून जिभेवर ठेवायची!

कुठे ते नौकागृह आणि कुठे सकाळी पाहिलेला मचवा. कोकणातल्या आगबोटीवर लागणारे खपाटे असतात ना, तसा. बोटीवर जाताना त्यात बसल्यावर वाटते तसेच वाटले असते तिथे उतरलो असतो तर. इथे या बादशा ब्रिजवरच्या खोलीत बसूनसुद्धा आता त्या सुखद आठवणी चाळविण्यात किती रमून जातोय मी! नऊ वर्षांपूर्वीच्या आठवणीत!

आज आमची काही फारशी दमणूक झाली नव्हती. म्हणून दुपारी विश्रांतीनंतरचा वेळ सार्थकी लावायचे ठरविले आणि शंकराचार्य टेकडीकडे कूच केले. इथे श्रीनगरला आल्यावर एखाद्याला फक्त एकच वेळेची सवड

असेल तर मी त्याला सांगेन, ' तर मग फक्त शंकराचार्य टेकडीवर जाऊन ये. ' वर जायचे म्हणजे एक हजार फूट चढावे लागते. दल गेटकडील चढ जरा उभा आहे. नेहरूपार्ककडील रस्ता सोपा, परंतु लांबवरचा आहे.



शंकराचार्य टेकडीवरील शिवालय.

वर गेल्यावर कमरभर उंचीची शाळुंका असलेल्या जगदीश्वराचे दर्शन घ्यावे नि चौथऱ्यावर बसून दुर्बिण नाकाला लावावी. सभोवतालचा पंचवीस मैलांचा परिसर तपशीलवार टिपून घ्यावा.

शहराच्या मधोमध वितस्तेचा राजधानीचा कमरपट्टा चकाकत असतो. पायाजवळ अफाट पोलोग्राऊंडचा लहानसा चौकोन रांगोळी काढलेल्या छोट्याशा अंगणामारखा दिसत असतो. मग थेट लांबवर विमानतळ, त्याच्या खाली झेलममधील झाडीतून नौकागृहे डोकावत असतात. नदीकाठचे पांढरे जुने सचिवालय ( जिथे आता अजायब घर

आहे. ) त्याच्याच बाजूला रघुनाथजी मंदिराचा सुवर्ण कलश दिसतो. मग वितस्तेवरचे अमीराकदलपासून सात पूल मोजून घ्यावे. मोजता मोजता जामा मशीद–पथ्थर मशिदीवरून टेकडी-वरच्या राणीच्या किल्ल्यावर नजर स्थिर होते. तिथे आता तुरुंग आहे वाटते. इथून दल सरोवराच्या पाण्याच्या मैदानावरील नौकागृहे दिसतात. पलीकडे नगीन लेक. हा दलचाच एक भाग. इथेच कुठेतरी हजरतबाल मशीद आहे. ती स्पष्ट दिसली नाही. दलच्या पार टोकाला शालिमार बगीचा, त्याच्या अलिकडे निषाद उद्यान, त्याच्याही अलिकडे टेकडीच्या पायथ्याशी असलेली चष्मशाही नि टेकडीवरील परीमहाल (परिकथांऐवजी यांच्या कथा भुताटकीच्या आहेत. ) आणि मग दलमधल्या जलमंदिर राजवाड्यावरून नि चार - चिनारवरून नजर स्थिरावते ती आपल्या पायथ्याशी असलेल्या छोट्या नेहरू बागेवर आणि सदर-इ-रियासतच्या राजवाड्यावर.

सरते शेवटी आम्हाला जाणीव झाली ती दिनराजाची. सुवर्णकण उधळीत वस्तुजात सुवर्णमय करून टाकणाऱ्या त्या हिरण्यगर्भाची ! आता दुर्बिणीची गरज संपली होती.

शिक्षकद्वय सर्व माहिती आपल्या वहीत टिपून घेत होते. मधूनच एखादे छायाचित्र खेचीत होते. त्यांना बहुधा ती माहिती सचित्र करून आपल्या विद्यार्थ्यांस सांगायची असावी. अण्णा तत्त्वचिंतकासारखे निर्गुण निराकारांत दृष्टि लावून बसले होते. बोलत नव्हते. बोलायचे कामच नव्हते. मी एकटाच मास्तरासारखा बडबडत होतो. सगळा देखावा मंत्रमुग्ध करणारा होता. तो पाहून फक्त मनाच्या एका कप्प्यांत साठवून व्यवस्थित ठेवून द्यायचा होता.

पाह्यचे ते दुर्बिणींतूनही दिसत नाहीसे झाल्यावर आमचे पाय जमिनीला लागले. परतायचा विचार करून उठलो. उतार कंकरमय होता, जपून उतरावे लागत होते. उजव्या हाताला पाणी चमकू लागले दल सरोवराचे, तेव्हां चंद्र-प्रकाशाची जाणीव झाली. नाकासमोर एकादशीचा सोमनाथ सस्मित एकटक आमच्याकडे आरपार पाहात होता. त्या टेकडीच्या पार्श्वभूमीवर उतरणारे आम्ही चार जीव त्याला कीड - मुंगीसारखे तरी भासले असू का ! आमच्या मीपणालाच तो हसला असावा ! आपल्या क्षुद्रपणाची जाणीव ठेवून नम्रपणे आम्ही एकेक फूट उतार काटीत होतो.

'एक एक सिगरेट मारू या का ?' – अण्णांची सूचना. कुणीतरी सूचना करायचाच अवकाश होता. कंकरमय पायवाटेने, अंधुक उजेडात उतरता उतरता पाय हुळहुळे झालेले असतात. खेटरे आमच्या हातात होती. आम्ही दलकडे तोंड करून एका डगरीवर टेकलो.

दलमधील नौकागृहे धूसर दिसत होती. त्यांच्या मागला भाजीपाल्यांच्या तरत्या बागांचा पट्टा जमिनीसारखा भासत होता. मूळ स्वरूपांत वस्तू कशा आहेत हे माहीत असले तर त्यांच्या अस्पष्ट दर्शनात सौंदर्य जास्त प्रतीत होते किंवा कसे कुणास ठाऊक! कदाचित चांदण्याच्या मौक्तिक रंगाचा तो प्रभाव असू शकेल.

बागांजवळ उभ्या असलेल्या शिकाऱ्यांतून भाज्या, पालेभाज्या व फळ-भाज्या लावून ठेवल्या असाव्यात. दुकानांतील मांडण्यावर असतात तशा. त्यांची रंगसंगती इतरांना नसली तरी मला दिसते आहे. पूर्वपरिचयामुळे. उद्या सकाळी फुलांनी भरलेले शिकारे आणि भाज्यांचे शिकारे ग्राहक शोधीत नौकागृहांच्या बाजूबाजूने फिरणार आहेत. नौकागृहांतल्या प्रवाशांना मग प्रश्न पडणार आहे की कोणता शिकारा आकर्षक म्हणायचा ? रंगीबेरंगी फळभाज्या पालेभाज्यांचा का विविध रंगी फुलांचा.

♣ ♣

# ‘श्रीनगर’

## ( महालक्ष्मी हॉटेल—बादशाह ब्रिज )

## ऑक्टोबर, १९, १९६४

**आज तीन** दिवसांची रोजनिशी लिहायची आहे. तीन दिवसांची आणि रोजनिशी ! हे वदतो व्याघाताचे उत्तम उदाहरण होईल. परंतु ही वस्तुस्थिति आहे. कां लिहिली नाही याला कारणे पुष्कळ सांगतां येतील. माहेरी गेलेल्या बायकोला आपण उशीरा पत्र लिहितो. झालेल्या उशीराची कारणेहि आपण लिहितो. परंतु तिला ती पटतात कधी ? तशीच माझी कारणेहि पटायची नाहीत. माझी मलासुद्धा !

कश्मीर हा तीन ‘प’ कारांचा मुलूख आहे असे म्हणतात. पहाड, पानी आणि परी ! काही मंडळी जी बापकमाईवाली असतात ती, सर्वच नव्हे पण त्यांपैकी काही, केवळ तिसऱ्या ‘प’ काराचा शोक करण्यासाठीच इथे येतात. काही खरी रसिक असतात, तर काही ‘आपणहि काही कमी नाही आहोत’ हे रेकॉर्डला लावण्यापुरती येतात.

खऱ्या शौकिनांपकी एक वल्ली आज जेवायला गेलो होतो त्या खानावळीत भेटली. या माणसाने शौक केला असला तरी त्याचा शौक फार फार सोज्वळ प्रकारचा होता. याची ‘परी’ याची नवपरिणीत वधूच होती. ओळखीवरुन ओळख निघाली. माझ्या एका स्नेह्याचा हा मुलगा. ओळख निघाल्यावर पोरगा रंगांत आला. चांगला तास - दीड - तास गप्पांत गेला आणि आम्ही मुक्कामावर परतलो.

‘काही म्हणा अण्णा ! या पोराची जिद्द मला आवडली.’ माझ्या मनांतून त्याची हकीकत काही केल्या जाईना. म्हणून मी अण्णांजवळ तो विषय उकरून काढला.

## ३६ : पहाड, पाणी आणि परी

'मरळीहळ्ळी म्हणता होय? तो सांगतोय त्याच्यातला खरा भाग किती नि खोटा किती कुणास ठाऊक! काय तर म्हणे यानं नवस केला होता, अमरनाथाचं दर्शन घेतल्याशिवाय मधुचंद्र साजरा करणार नाही म्हणून. हा कसला नवस? चांगला पदवीधर हा!'

'नवस वगैरेचं राहू द्या हो! आई वडिलांच्या धार्मिक भावनेला कौल लावून कष्मीर ट्रिप पदरात पाडून घेण्यासाठी त्यानं ती एक युक्तीसुद्धां केली असेल. परंतु तीन आठवड्यांपूर्वी अमरनाथाचं दर्शन घेतल्यावर त्यानं आपल्या नवसाचं पारणं फेडलं यात मला शंका नाही. आणि ती मुलगी मधूनच त्याला कानडीतून काय सांगत होती हो?'

'ती त्याला म्हणत होती की या असल्या गोष्टी परक्या माणसांजवळ कसल्या सांगता!'

'पण त्यानं काही ऐकलं नाही तिचं.'

'अहो, हा तिला सांगत होता की ही समानधर्मी माणसं परकी नव्हेतच.'

'हां! तरीच ती त्याला एवढी काकुळतीला येऊन विनवीत होती. बाकी मुलगी मोठी गोड होती नाही? आणि त्यांची इकडे येण्याची उत्सुकता, कळकळ वगैरे बघून त्याच्या म्हणण्यावर माझा तरी विश्वास बसतो बुवा!'

'असेल असेल! निदान मधुचंद्राची अभिनव पद्धत अनुसरून यानं काही तरी निराळं केलं खरं.'

'अण्णा, अमरनाथ म्हणजे सहज साध्य गोष्ट नाही आहे! पहलगावच्या पुढं अठ्ठावीस मैल पायी अगर घोड्यावरून डोंगर तुडवायचाय! मस्करी नाही! म्हणून यांच्या जिद्दीचं मला कौतुक वाटतं. हा सांगत असतांना लाजेनं चूर झालेल्या त्या नववधूची मुद्रा अजून माझ्या डोळ्यांपुढं दिसते.'

'आमच्याबरोबर असलेल्या दोन्ना बंगाली पोरांना मी ही हकीगत समजावून सांगितली. त्या दोघांची अद्याप लग्नं व्हायची आहेत. लग्नानंतर त्यांनी सुद्धां हा पुरुषार्थ करण्यासारखा असल्याचे अण्णा त्यांना वडिलकीच्या नात्याने सांगतात.

'आन्नासाब! आप गाईड करोगे तो मैं शादीके बाद जुरूर आयेंगा.' कला शिक्षकाच्या डोक्यांत या हकीगतीने चांगलेच घर केले होते.

शंकर टेकडीवरून आसमंताचे दर्शन कितीहि मनोहर घडत असले तरी या दिवसात मुघल बगिच्याशिवाय कोणत्याच स्थळाचे दर्शन फारसे आकर्षक नसल्याचे प्रत्ययाला येते. दुरूनच डोंगर साजिरे, गोजिरे ! परवा सकाळी उठून सात पुलांची सफर टॅक्सी-शिकाऱ्यातून केली. झेलमचे या दिवसातले पाणी म्हणजे नुसता पातळ चिखल ! पावसाळ्यात अर्थात् असे नसते. रघुनाथजीचे मंदिर नि मशिदी ही भगवंताची निवासस्थाने तरी प्रसन्न असायला पाहिजे होती ! परतताना शिकारावाल्याने आम्हांला गरीबांची वस्ती दाखविण्यासाठी मुद्दाम सांगूनच एका गलिच्छ नाल्यांतून आणले. त्याने हेरले होते की आम्ही गरिबांचे कैवारी आहोत म्हणून. चेहरा पाहून होरा जाणण्याची कला त्याला बहुधा अवगत असावी.

या सफरीतला आकर्षक प्रवास फक्त एकच. तो म्हणजे आम्ही बसलो होतो तो खुद्द टॅक्सी शिकारा. टॅक्सी शिकारा हा होडीचा प्रकार. ही टॅक्सी पाण्यातून सरकत असते. वल्ह्याच्या चुळूक फुळूक तालात स्थानिक कलाकुसरीने मढविलेल्या अलिशान बैटकीवर लेटून बसायचे ! मोटा मजा येतो रात्रीच्या चांदण्यात तर हा प्रवास संपूच नये असे वाटते. सगळा गढूळपणा नि लता वेली पाण्याखाली झाकलेल्या राहातात. वास्तवापेक्षा स्वप्नातच माणूस जास्त रमतो.

दुपारचा सगळा वेळ विश्रांती नंतरचा, खरेदीतच गेला. बायकामंडळी बरोबर नसताना ! माणसाला कांही कर्तव्ये असतातच ना ? एवढे कश्मीरला यायचे ! आपल्या बायकोला (म्हणजे आपल्या मुलीच्या नावाने तिने सांगितलेल्या साड्या वगैरे– तिला स्वतःला आता काहीच नको असते !) वस्तू न्यायला नकोत का ? (खरे म्हणजे आपण या नेतो त्यांना खूष करण्याकरता किंवा निदान कटकट चुकविण्याकरिता.पण ती चुकते का ? आपण नेलेलं काही तरी कोणत्या कुलवधूला निर्विवाद पसत पडते ? तरी पण न्यावे लागते. म्हणूनच त्याला कर्तव्य म्हणायचे !)

अण्णासह तिघेहि मला या खरेदीतला तज्ञ समजतात. हा खरे म्हणजे मोठा विनोद आहे. प्रत्यक्ष प्रवासापेक्षा बहुतेकांचा या खरेदीत खर्च जास्त होतो. आपल्याकडे दुर्मिळ असणाऱ्या वस्तू आणि मिळत असलेल्या फार स्वस्त भावात (निदान तशी समजूत तरी असते) प्रत्येक जण ट्रंका भरभरून घेऊन

जाणार आहे. यात स्वतःच्या कुटुंबापेक्षा इतरांनी सांगितलेल्या वस्तूच जास्त आहेत.

माझे सहप्रवासी मला तज्ञ समजत आहेत. परंतु मुंबईहून निघायच्या आधी मला मिळालेले शिफारसपत्र अगदी निराळेच होते. आणि तसे ते माझ्या सारख्या भिडस्त ( घरच्या भाषेत याला पर्यायी शद्व ' अगदी हे ') स्वभावाच्या असंख्य सद्‌गृहस्थांस मिळतेच म्हणा ! मला खास बजावण्यात आले होते—

" फारशा काही वस्तू आणू नका हो ! भाराभर आणाल नाही तर, आणि देऊन टाकाल कुणाला तरी. नि मला सांगाल विकत दिल्या म्हणून. मग पैसे येण्याचं मात्र नाव नाही. "

" बरं बरं ! काऽही आणणार नाही. मग तर झालं ? "


" तशा दोन वस्तू आणायलाच हव्यात ! जाताच आहांत तर ! मला नको हो ! अगदी काऽऽही सुद्धा. पण जिजीला नको का काहीतरी ? एकाद दुसरी रेशमी साडी. म्हणजे ते स्टेपल सिल्क नको हो ! प्युअर सिल्कच्या दोन साड्या. आणि एक चेक सिल्कची. क्रीम कलरची. मागं आपण आणल्यौती तशी. प्युअर सिल्क मात्र चांगलं बघून आणा. तो पंडतजी आहे ना सेन्ट्रल मार्केटांत, त्याच्याकडून. तुमच्या मुलीकरता हो हे ! ( या नेसणारच या साड्या. पण आणायच्या मात्र मुलीच्या नावाने ! ) आणि हो, बरी आटवण झाली ! केशर ! "

नऊ वर्षांपूर्वी या बाईसाहेब बरोबर होत्या तेव्हा ' काय काय नि किती किती घेऊ !' असे यांना झाले होते. माझे मध्यम वर्गीयाचे (मध्यम हा शद्व सुद्धा फसवा आहे. ) अंदाजपत्रक घाईला आले होते.

इथले दुकानदार आणि सिल्क फॅक्टरीवाले परंपरेने धंदा करीत आले आहेत. अनुभवी विक्रेत्याच्या बोलण्याला वजन असतं. तत्परतेने तो सगळे सांगत असतो, समजावीत असतो आणि विश्वास निर्माण होतो. आज सकाळी सिल्क फॅक्टरीवाल्याने मुंबईच्या आपल्या ग्रांहकांची यादी सांगितली. त्यांत आमदार-खासदार होते. व्यापारी होते. गिरगावातल्या एका वस्ताद व्यापाऱ्याचे नाव ऐकले आणि त्याने किती माल घेतला म्हणून सहज विचारले. एक वर्षांपूर्वीचे त्यांचे बिलच काढून दाखविले त्याने. सुमारे बाराशे रुपयांचे. तेव्हा मी खूणगाठ मनाशी बांधली की इथे माल घ्यायला हरकत नाही.

आपोआप माणसाचे काही अडाखे बसलेले असतात. आमचा एक स्नेही होता. त्याला जी चालेल ती स्वच्छता आम्ही डोळे मिटून स्वीकारीत असू. तसा तो गिरगावातला व्यापारी.त्याला चालले म्हणजे आपल्या पदरी ' चांगल्या खरेदी 'चे यश पाडणारच असे मी गृहीत धरले. पुष्कळशी खरेदी इथेच झाली. सेन्ट्रल मार्केटमध्ये केशर वगैरेसारख्या वस्तूहि घेतल्या. आमच्याकरता घेतल्या. आप्तेष्टमित्रांनी सांगितलेल्या सुद्धा घेतल्या. आणि आमच्या सामानात मोठी जागा अडविणाऱ्या वस्तूंचा ( अण्णांच्या नि माझ्या ) एक डाग रेलवे औट एजन्सीने मुंबईला रवान.सुद्धा करून टाकला. बरोबर बाळगायला नको. आम्हाला पुढे कुलूला जायचे होते. अंदाजापेक्षा नेहमीप्रमाणे खरेदी जास्तच झाली होती. एकूण खरेदी छान जमली होती. ( मला नेहमीच तसं वाटत असतं ! )

काल रविवार नसतानासुद्धा आम्ही मुंगल बगीचे पाहायला जायचे ठरविले. रविवारीच पाणी सोडलेले आणि रोषणाई केलेली असते. परंतु काल शनिवार असूनसुद्धा आम्हाला कारंजी उडत असलेली बघायला मिळणार होती चित्रीकरणासाठी आलेल्या एका सिनेमा कंपनीमुळे.



उल्हासोद्यान – निशाद् बाग

हे बगीचे म्हणजे शहरांतील गार्डन्स आणि पार्कस नव्हेत. बरा किंवा वाईट सबकुछ माणसाने बनविलेला प्रकार हा नव्हे. यांच्या आकर्षणाचे पुष्कळसे श्रेय तेथील नैसर्गिक साधनांना आहे. प्रत्येक बगीच्यासाठी सजल अशी दल सरोवराकाटची लहानशी टेकडी निवडली आहे. टेकडीला एकावर एक विस्तीर्ण ओटे पाडलेले आहेत. टेकडीवरच्या झऱ्यांचे पाणी मधोमध नाला बांधून थेट दल सरोवरात सोडले आहे. नाल्याच्या दुतर्फा लागूनच फर व फुलझाडे, थोडी दूर झुडपी फळझाडे आणि शेवटी लांबवर अक्रोड-चिनारासारख्या वृक्षाच्या दोन तीन रांगा. नाल्यावर मध्येच एकाद् दोन ओढ्यांवर सुबक मंडपी बांधलेल्या आहेत. त्यांच्या दोन्ही बाजूस कारंजाकरता विस्तीर्ण टाकी असून नाल्यांमधून शिवाय कारंजी आहेत. रविवारी अगर इतर खास प्रसंगी सर्व कारंजी थुई-थुई नाचत असतात.

शालिमार बागेमधून आल्यावर निषाद बागेत गेलो. तिथे हे सर्व वैभव पाहायला मिळाले. सिनेमा कंपनीच्या कृपेने. भर दुपारी बारावर एक वाजता डोळ्यांना त्रास होण्याऐवजी थंडगार तृप्ती लाभत होती. पहिला ओटा चढल्यावर समोरचे दृश्य पाहून कलासक्त फारसी कवीच्या सुप्रसिद्ध ओळी आठवल्या.

**'हर सोक्त जान-ए कि बा कष्मीर देर आयाद्।**
**गर मुरघी कबाब अस्त बा बाल ओ पेर आयाद्॥'**

शहरांतील गलिच्छपणाचा इथे मागमूस नाही. म्हणजे पहायला आलेल्यांनी खाऊन झाल्यावर कागद पाने तिथेच टाकलेली नव्हती असे नाही, परंतु हे रानच इतके विस्तीर्ण असते की त्या कचऱ्याचा मागमूसहि लागत नाही. वृक्षांच्या नि झुडपांच्या रांगा शिस्तीत असतात. या शिस्तीला उताराची जोड. कारंजी सुटून सूर्य किरणात तुषार सप्तरंगात चमकू लागले की त्यांच्या विविध छटांशी स्पर्धा करतील अशा रंगाचे पक्षी कारंज्याचे तुषार टिपीत भराऱ्या मारू लागतात. नाल्यांमधल्या ओह्यांच्या दगडी भिंतीत असलेल्या हज्ञनावरी कोनाड्यांतून भडक रंगाची फुले लावून ठेवलेली असतात. वरून पडणाऱ्या सहस्रधारांचा पारदर्शक पडदा वरून सरकू लागला की या फुलांची दिवाळीतील रंगावली होते अमरावतीत इंद्राच्या उद्यानात तरी यापेक्षा अधिक शोभा काय असणार आहे!

अशा या बागा! मोठी शालीमार (प्रेम गेह) मधली निषात् (उल्हासोद्यान)

आणि सुचक लहानशी शहराच्या जवळची चष्मशाही (शाही झरा—याचे पथ्य-कर मधुर पाणी खास राजवाड्याकरता असे.)

आम्ही निषात बागेत हिंडत असताना आमच्याबरोबरचे बंगाली मुलगे कुठेतरी हरवले. त्यांना शोधण्यासाठी म्हणून मी उठणार इतक्यांत अण्णा म्हणाले –

'बसा तुम्ही! मला माहीत आहेत ते पोरगे कुठे गेले आहेत ते!'

'माहीत आहेत? कुठे?'

'त्यांना बघायला जायची जरूरी नाही. त्या सिनेमा कंपनीत ते नक्की मिळतील. जातांना त्यांना त्या गर्दीतून खेचून आणा म्हणजे झालं.'

खरं तर आम्ही बसलो होतो तिथून सेटवर काय चालले आहे ते स्वच्छ दिसत होते. पुंगळी इजार घातलेला गोरा गोमटा तरुण नायक उडत्या कारंज्याच्या पार्श्वभूमीवर एका पायरीवर बसला होता. तशीच एक गोरी गोमटी तंग इजार घातलेली तरुणी त्याच्या मांडीवर डोके टेकून आडवी झाल्यावर तो तिच्या केसांतून हात फिरवायचा. तो तिला 'प्यार' करीत असावा! कारण तशा अर्थाचे गाणे आम्हाला ऐकू येत होते. पुन्हा पुन्हा हे नि हेच चालू होते. यालाच 'रीटेक' का कायसे म्हणतात मला वाटते.

सबंध बागेत आठदहा माणसे (प्रवासी नि दोन पोलिस मिळून) होती. बाकी सर्वच प्रवासी 'सिनेमा कंपनी'त चित्रीकरणाला गेले होते. प्रवासी त्या दिवशी इतर बागा पाह्यला नक्कीच गेले नसतील. तिथे असलेली प्रवासी मंडळी घरी परतली असतील तेव्हां बायका आपल्या नवऱ्यांना म्हणाल्या असतील —

— "तुम्ही आता गडे, तसली पुंगळी पँटच शिवा. किती छान दिसते!' यावर नवरे आपल्या बायकांना म्हणाले असतील, 'तुलासुद्धा तसली तंग स्लॅक किती शोभून दिसेल! नाही?'

यावेळी मी कष्मीरला दुसऱ्यांदा येत होतो. साहजिकच माझे मन मागील भेटीच्या वेळचे कष्मीर नि आता पाहातो आहे हे कष्मीर अशी या सीमाप्रदेशाची तुलना करीत होते. कष्मीर बदलले आहे असे राहून राहून मनांत येत होते. तसे तर सारे जग बदलले आहे. बदलण्याची ही प्रक्रिया जगाच्या अंतापर्यंत चालणार आहे. तसे कष्मीर तेच आहे माणसे तीच आहेत. म्हणजे आमच्या मानाने कितीतरी देखणी, लाल-गोरी, मध्यम चणीची नि चपळ.

उर्दू भाषाही तीच आहे. परंतु तिच्यांतील अदब आर्जवीपणा नाहीसा झाला आहे. बनिहालपासून मी पाहातो आहे. प्रवाशांशी संबंध येणारे हॉटेलवाले, डाक बंगलेवाले, टांगावाले, शिकारावाले, मुंबई - कलकत्यासारख्या मोठ्या शहरांतील व्यवसाय बंधूंप्रमाणे 'शहाणे' झाले आहेत. व्यवहारांत आणि राजकारणांत सुद्धा ! सगळ्यांना जणू कुणीतरी पढविले आहे. सायंशाखा नि प्रभातशाखांत बौद्धिके दिल्यासारखे.

प्रत्येकजण शेवटी एकच तात्पर्य सांगतो. कश्मीर जसे भारताला खुले आहे तसे ते सगळ्या दुनियेला – पाकिस्तानला सुद्धा, (हे नाव मुद्दाम घेऊन) खुले हवे, म्हणजे सगळ्या दुनियेचे प्रवासी इथे येतील नि कश्मीरची तरक्की होईल. यांतील व्यंजना कोणाच्याही लक्षात यावी. ही मंडळी कश्मीरच्याच केवळ उत्कर्षाबाबत विचार करतात. कश्मीर भारताचा एक अविभाज्य भाग आहे या संदर्भात नव्हे !

देवळावर भगवा ध्वज, मशिदीवर हिरवे निशाण दिसावे हे साहजिकच होते. परंतु एका पक्ष - कचेरीवर चांद - ताऱ्यासह हिरवे निशाण दिसले. पाकिस्तानचे निशाण नि हे निशाण यांत मला न समजण्याइतका फरक असूही शकेल !

मागील खेपेस मी आलो होतो तेव्हा येथील सामान्य माणूस भारताशी समरस झालेला आढळला होता. प्रवेश - परवाना असूनसुद्धा ती भावना होती. आता प्रवेश परवाना रद्द झाला आहे. वास्तविक ती वाढलेली दिसायला पाहिजे होती. परंतु दुर्दैवाने तसे नव्हते. मागील खेपेस जे दिसले त्याला तसे कारणही होते. १९४७ साली टोळीवाल्यांनी पाकिस्तानच्या मार्गदर्शनाखाली जे हल्ले कश्मीरवर केले त्यांत सध्यांच्या हंगामी सीमारेषेच्या अलिकडील झियारतीही (पूजास्थाने) त्यांनी लुटल्या होत्या. या धर्मबुडव्या कबाली टोळीवाल्यांपासून भारताने कश्मीरचे रक्षण केले. आणि म्हणून तेथील बहुजन समाजाला भारताबद्दल कृतज्ञता वाटत होती. ती त्यांच्या बोलण्यातून व्यक्त होत होती. तेव्हांपासून आतापर्यंत सतरा वर्षे भारत दरसाल कोट्यवधी रुपये कश्मीरच्या विकासासाठी ओतीत आहे. नव्या भावनेच्या जोषांत याची जाणीव मात्र सध्या कुठेच दिसत नाही.

शेख अबदुल्ला हे जनमानसावर जबरदस्त पकड असलेले एक पुढारी

होते. त्यांच्या स्वतंत्र कष्मीरच्या प्रचाराचेच तर हे फळ नव्हे! नऊ वर्षांपूर्वी मी आलो होतो तेव्हां शेखसाहेब हे पदच्युत पंतप्रधान होते. शिवाय तुरुंगांत होते. तरी सुद्धा त्यांच्याबद्दल अनुदार उद्‌गार ऐकू येत नसत. त्या वेळी पंतप्रधान असलेले आता पदच्युत झालेले आहेत. यांच्या बाबत मात्र परिस्थिति उलट आहे. सामान्य टांगेवाला आपल्या ग्राहकास त्यांची अगर त्यांच्या नातेवाईकांची लोकक्षोभाने जळून उध्वस्त झालेली जायदाद आपणहून दाखवितो. त्यांच्याबद्दल कडवट उद्‌गार काढतो.

लोकशाहीच्या बाल्यावस्थेत विचारपूर्वक मत बनविण्याची सामान्य माणसाची कुवतच नसते. त्याच्या पुढाऱ्याची मते तीच त्याचीं मते. म्हणून चारित्र्यवान् पुढारी हवेत नाहीतर समाजात निर्नायकी उत्पन्न होण्यास वेळ लागणार नाही.

सध्या इथे दिसत असलेला बदल किती खोल आहे हे जाणून घेण्यास मी उत्सुक होतो काल सेंट्रल मार्केटांत एका दुकानात गप्पा रंगल्या. गप्पांत एक शेख साहेब भाग घेत होते. मी चाचपून पाहाण्याचा प्रयत्न करीत होतो.

" आच्छा शेखसाब, स्यांसी मामल्यात बडी दिलचस्पी आपणास आहे असं दिसतं. तर या स्वतंत्र कष्मीराचं हे काय प्रकरण आहे हे मला समजावून सांगाल काय ? "

' स्यांसी मामल्यापासून कोणी अलग थोडाच राहू शकतो ! आणि या प्रकरणाबद्दल म्हणायचं झाल तर आम्ही थोडेच पाकिस्तानी बनू इच्छितो ! "

' आखीर आपण काय बनू इच्छिता तेच तर मी विचारून राहिलो आहे.'

" आझाद स्वित्झरलंडसारखा आझाद कष्मीर म्हणून आमचा मुल्ख राहावा. बस्स, इतकंच ! "

" परंतु तसा कष्मीर राहू शकतो का ? "

" आम्ही सगळ्यांशी दोस्ती ठेवू ना ! "

" हे ' फिफ्टी परसेंट लव्ह ' झालं.भोवतालची राष्ट्रं तर कष्मीर गिळकृत करायला टपलेली आहेत. त्यांच्यासमोर कष्मीर टिकू शकेल काय ? "

" मदत करायला आपण म्हणजे भारत आहेच ना ? आमचा बडा भाई !"

" आच्छा आच्छा ! म्हणजे ' खानेको हम और लढनेको हमेरा बडा भाई ' असंच की नाही ? "

यावर तोहि माझ्या हास्यात सामील झाला. त्याच्या समर्थनाचे वैयर्थ्य त्याला पटले असावे. तो पुढे म्हणाला,

'हे बघा पंडतजी ! भारताची दोस्ती गमावून आम्ही काहीहि होऊ इच्छित नाही. भारतानं करोडो रुपये कश्मीरच्या उत्कर्षाकरता हरसाल खर्च केले आहेत नि करत आहे. भारताचे हे ऋण आम्ही विसरणार नाही.'

'अरे मग भारताचा उत्कर्ष नि कश्मीरचा उत्कर्ष निरनिराळा का मानता ?'

'पंडतजी ! माझी स्वतःची राय सांगतो. भारतासारखा दोस्त आम्हाला मिळणार नाही. नियतीनं आमचं दोघांचं नशीब एकत्रच बांधलेलं आहे. लिजिये ! चाय ठंडा होतो आहे.'

हे झाले याचे स्वतःचे मत. जनसामान्यांचे असेच असेल काय ? बुद्धिभेद करून गोंधळ उडवून देण्यात तरी शेखअबदुल्ला यशस्वी झाले आहेत. त्यांच्या नंतर तुल्यबल पुढारी कश्मीरला अद्याप लाभला नाही, असाच निष्कर्ष काढायला पाहिजे. सध्याच्या नवीन मंडळीतून असा कुणीतरी निघेल अशी आशा करू या !

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात सुद्धा धर्माच्या नावाखाली परंतु धर्माचे नाव न घेता इतका बुद्धिभेद नि गोंधळ निर्माण होऊ शकतो ! कश्मीरांत बिगर कश्मीरीला झोपडी बांधायलाहि जमिन विकत घेता येत नाही. नागभूमीत सुद्धा हाच प्रकार नाही का चालू आहे ? या दोन्ही ठीकाणी बुद्ध किंवा हिंदू बहुसंख्य असते तर हा चावटपणा होऊ शकला असता का ? एवढे मोठे हैदराबाद संस्थान. त्यातल्या प्रजेचे भारताशी सामरस्य उत्पन्न व्हायला कुठे वेळ लागला ?

खरे कश्मीर, ते दैवी निळे नंदनवन पाहायचे, अनुभवायचे असेल तर पाहाडातच जायला पाहिजे. तिथल्या श्रमजीवी शेतकऱ्यांनी नि घोडेवाल्यांनी कधी श्रीनगर सुद्धा पाहिलेले नसते. नागरी अगर औद्योगीकरणाने होणारे संस्कार न झालेल्या त्या हिमप्रदेशांत निसर्ग जसा विकृत झालेला नसतो तशीच तिथल्या माणसांची मनेहि. नेकदार आणि प्रामाणिक असतात बिचारे ! अभुक्त सृष्टवैभवाचा हा शौक - कांहीच्या मते आंबटशौक - पांच सात टक्के प्रवासीच करतात. नऊ वर्षापूर्वी आमचा हा योग बराचसा जमला होता. तीन चार दिवसाच्या पहाडी सहली, काही घोड्यांवर, काही पायी आम्ही केल्या होत्या.

बरोबरच्या वायका मंडळींचीहि जिद्द टिकून होती. कैक वर्षे त्यांना या आठवणी रवंथ करायला पुरून उरल्या आहेत.

या पहाडी माणसांची एक आठवण जतन करून ठेवण्यासारखी आहे. अमरनाथला जायला निघालेले आम्ही पावणे तेरा हजार फुटावर शिशनाग-बावजनच्या लाकडी आराम घरात रात्रीच्या मुक्कामासाठी राहिलो होतो आणि अमरनाथला जाऊन आलेली काही खेडा जिल्हातील पाटीदार मण्डळी परतताना तिथेच मुक्कामाला आली होती. त्यांना दुसरे दिवशी पहलगावला उतरायचे होते आणि आम्हाला पुढे चढायचे होते. पुढचे रस्ते पावसाने ढासळल्यामुळे आम्ही तिथेच मुक्काम ठेवला होता. ती मंडळी सकाळीच खाली उतरली.

परंतु जाताना पश्मिन्याची एक शाल ते विसरून गेले. ती एक चंबूत घातलेली त्या चंबूसह एक तट्टयाआड राहून गेली. पश्मिन्याची शाल म्हणजे केवढी मौल्यवान वस्तू ! सर्वात उबदार कपडा तो. मुठीत राहाण्याइतका लहान मुटका त्याचा होतो. अंगठीतून ओढून काढण्याइतकी ती तलम असू शकते. आता ते पाटीदार प्रवासी, त्यांचे घोडेवाले सर्वच मंडळी निघून गेली होती. ज्याला ती मिळेल तो ती आपली करू शकला असता. आमच्या घोडेवाल्याला ती दिसली. कुणाची ती त्याने ओळखली होती. पाच सहा मैल दौडून त्याने ती पाटीदार मंडळीना परत केली. आश्चर्य म्हणजे एक पैसाहि बक्षिस म्हणून त्याने स्वीकारला नव्हता, धर्म म्हणून तेही नेकी पाळतात. धर्म म्हणजे सामाजिक नीतिनियम. स्वतःवर निष्ठापूर्वक लादून घेतलेला कायदा.

घोडा हा जितका उमदा तितका इमानी प्राणी, हे आपणाला माहीत असते. परंतु त्यांचे मालक सुद्धा आपल्या अन्नदात्यांशी (ग्राहकांशी) तसेच असतात, हा अनुभव सगळ्याच हिमप्रदेशात येतो म्हणतात. केवळ काश्मीरातच नव्हे. ज्यांना फारसा विचार करण्याची सवय नाही नि जरूरहि नाही अशा या कष्टकरी माणसांचा, समाजस्वास्थ्याला अत्यावश्यक असलेला 'धर्म' किंवा कायदा शहरी वातावरणांतून आलेल्या प्रवाशांना स्तिमीत करतो शहरांत प्रस्थापित कायद्यांना धाब्यावर बसविण्याचा अगर त्यांतून पळवाटा काढण्याचा 'धर्म' पहायची संवय त्यांच्या अंगवळणी पडलेली असते म्हणून.

घोडेवाला आणि घोडा हे तर इतके एकजीव झालेले असतात की वर


बसलेला स्वार काही इषारा करो किंवा कुणीकडेहि लगाम खेचो, पण घोडा चालत असतो, धावत असतो अगर थांबत असतो तो मालकाच्या लहानशा इशाऱ्यावर. घोडेवाल्यांना काम नसले म्हणजे पहलगावच्या रस्त्यांतून त्यांची जी सरकस चाललेली असते ती सुद्धा बाजूला उभे राहून आपण नुसती पाहाण्यासारखी असते. स्वारांच्या आणि घोड्यांच्या काय एक एक पोझेस्! लहानसरच तट्टे असतात. स्वारहि फाटक्या तुटक्या कपड्यांतला. पण ऐट काय! डौल कोण!

मागच्या सहलीतून माझ्या मनात एक सल राहिला होता. अमरनाथला आम्ही पोहोचू शकलो नव्हतो. पावणेतेरा हजार फुटांवरील बर्फाने वेढलेल्या पहाडांच्या त्या बावजनच्या विजनवासात एक दिवस मुक्काम वाढवून सुद्धा रस्ते मोकळे झाले नव्हते. हवामानाचा कौलहि मिळाला नव्हता आणि आम्हाला परतावे लागले होते. म्हणून या वेळी मुंबईहून निघायच्या आधीपासून निश्चय केल होता की अमरनाथ या वेळी तरी गाठायचाच पण कसचे काय! श्रीनगरला आल्याबरोबरच डायरेक्टर टूरिझमनने सांगितले की आठवड्यापूर्वीच बर्फ पडून अमरनाथचा रस्ता बंद झाला आहे. पहलगावपासून सात मैलांवरची चंदनवाडीहि गाठणे मुष्कील आहे. अठ्ठावीस मैलांवरच्या अमरनाथाची तर गोष्टच सोडा.हं ऽ! अमरनाथच्या नशिबी आमचे दर्शन नाही! दुसरे काय!

ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये पहलगाव म्हणजे केवळ गंधर्वनगरी! गुलमर्ग सुद्धा छान प्रवासी तळ आहे. आदर्श अशी गोल्फ नि पोलोची मैदाने आहेत. गुलमर्ग हेच एक विस्तीर्ण मैदान आहे. साहेबाच्या काळी सहा सात हजार तंबू उन्हाळयात इथे लागलेला असायचा. इथल्या शिखरावरील साडे चौदा हजार फुटांवर अलपथर आणि गोटलेले तळे-विशेषतः त्यातले हिमखंड पाहण्यासारखे आहेत. आणखीहि पाचसहा ठिकाणी पहाडातले दोनतीन दिवसांचे प्रवास याच तळावरून करायला मिळतात. तसा गुलमर्ग हा एक आकर्षक प्रवासी तळ आहे. तरीसुद्धा मला आपले वाटते की पहलगाव ते पहलगावच! तसे पाहिले तर पहलगाव ही एक दरी आहे. जागेचा संकोच आहे. पण अमरनाथच्या या उपत्यकेत पाऊल ठेवायच्या आधी पासूनच मन भारून जाते, त्या संकोचात सुद्धा.

पावसाळा संपल्यानंतर सुद्धा गावात ( गाव कसला, पाच दहा हॉटेल आणि

तितकीच दुकाने असलेला केवळ प्रवासी तळ. ) यायच्या आधीच लिदर-नदीची घनगंभीर गर्जना ऐकू येऊ लागते. या बारासष्टशे फूट उंचीवर भर दुपारी सुद्धा गरम कपड्यांची आवश्यकता भासते, नि रात्रीच्या थंडीची चिंता वाटू




**गंधर्व नगरीपासून सात मैलांवरील चंदनवाडीचा सनातन बर्फाचा पूल**

लागते. बाजूच्या दोन्ही पहाडांच्या भिंतींवर पाइन्सची झाडी इतकी गर्द आहे की ती हिरव्या ऐवजी जांभळी दिसू लागते. डोंगराच्या कड्यावर जर आकाशांतून एखादी वस्तु पडली तर ती काही जमिनीवर पडणार नाही. झाडांच्या शेंड्यावरून घसरत घसरत थेट लिदरमध्ये येऊन पडेल. इतकी गर्द निबिड राने! मधूनच वाहाणाऱ्या दुधाळ झऱ्यांच्या विद्युत् रेषेमुळे दाट रंग विशेषच उठून दिसतो. आता हिवाळ्याच्या चाहुलीमुळे हा दाट रंग किंचित मंद दिसू

लागला आहे. परंतु फिती पण! चित्राला लावलेल्या पारदर्शक जिलेटाईन कागदामुळे ते चित्र दिसेल तितकाच.

'पहलगाव ते पहलगाव!' या माझ्या निष्ठेला केवळ पहलगावची उपत्यका एवढाच अर्थ नाही. चंदनवाडी, पिसुघाटी, महागुणा घाटी, अमरनाथ, आरू, लिदरवत कोलहोई (ग्लेशर्स) वगैरे नावाची जादू त्याच्यात आहे. अमरनाथच्या आसमंतांत माणूस स्वतःला हरवून निसर्गाशी एकरूप होतो, अहंकार तुटतो, तो नम्र होतो. बुद्धिवान, धीमान, श्रीमान् हे सगळे 'मान्' गळून पडतात. उरतो एक यःकश्चित् जीव. इतर जीवसृष्टींत तग धरून राहाण्या करता धडपडणारा ईश्वर मानणारा!

माझ्या या भावनेशी समरस होणारा एक अमेरिकन जगप्रवासी गेल्या खेपेस बावजनच्या झोपडीत मला भेटला होता धापा टाकीतच अमरनाथहून तिथे आला होता. चहा घेतल्यावर गळ्याला गप्पा मारण्याइतकी तरतरी आली. खरा हौशी प्रवासी होता. याचे नाव रेमंड. हा अमेरिकन इंजिनियर चीनमधील आपली मुदतीची नोकरी संपवून कॅलिफोर्नियाला आपल्या गावी परतत होता. त्याने आखलेला कार्यक्रम बराच महत्वाकांक्षी! त्या मानाने साठलेली पुंजी



बर्फाचा अमरनाथ

अमरनाथाची ही केवळ बर्फाची शाळुंका शुक्ल पक्षांत वाढते व कृष्ण पक्षांत कमी होते असे म्हणतात. अमर-नाथाचे मंदिर बांधलेले नाही. ती एक गुहा आहे.

बेताची म्हणून बिचारा गरिबीची राहाणी पत्करून आपली हौस पुरवून घेत होता. रंगूनवरून तो भारतांत आला होता. आणि त्या वेळी कश्मीरमध्ये आमच्या सारखाच त्या भागांत भटकत होता. स्वतः उंच धिप्पाड.परंतु त्याची पत्नी जॉयसी, लहानसर. तिच्याकरता एक तट्टू आणि सामानाकरता एक खेचर भाड्याने घेतले होते त्याने. स्वतः मात्र पायी चढत-उतरत होता.

'खरा भारत म्हणजे भारतातील खेडी.' विनोबाची पदयात्रा, भारताची अध्यात्मातील 'स्पेशालिटी,' वगैरे वगैरे, परदेशी बोलायचे विषय संपल्यावर आम्ही कश्मीरवर आलो होतो.

'सबंध पृथ्वी पाहिल्याचा काही मी दावा करत नाही, मिस्टर दामोदर, (त्याने उच्चार केला होता धामॉधार) स्वित्सर्लंड पहिला आहे. आफ्रिकेंतला किलिमांजारो पाहिला आहे. परंतु 'कश्मीर ते कश्मीर!' आणि त्यातले पहिलगांव ते पहिलगांव!' त्याचे हे उद्गार ऐकल्याबरोबर मी टाळी देण्याकरता हात उंच केला. पण त्यांच्यात टाळी देत नाहीत वाटते. 'अगदी बरोबर' ची टाळी हुकली. तरी त्याने हात मिळवणी केली होती. (खोटे नाही!)

'गुलमर्ग तुम्ही पाहिलं ना? ते नाही आवडलं?'

'आवडलं ना! पण याच्याइतकं नाही. युरोपियन माणसाला ते आवडणं साहाजिक आहे. कारण ते अल्पाइन वातावरण आहे.माझ्या आवडीनिवडी जरा निराळ्या झाल्या आहेत. तुम्हाला कदाचित माझा गोरा रंग बरा वाटत असेल; परंतु मला तुमचा नितळ गहू वर्ण आवडतो. (माझा गहू वर्ण! मला दुखवायचं नाही म्हणून त्यानं ही सौम्य संज्ञा वापरली असावी!) नुसतं सपाट मैदान तितकंसं आकर्षक वाटत नाही.'

'कोलाहोई ग्लेशर्स?'

'वा:! केवढी प्रचंड हिमनदी! तिचंही कौतुक आहेच. परंतु खरं सांगू का, फार उंचीवर नुसती उंची नि बर्फ यांत पाह्यचं काय? त्यापेक्षा या पिसू घाटींतून जे लॅन्डस्केप दिसतं ना, ते केवळ अप्रतिम! तुम्ही दहा हजार फुटांवर प्रचंड वृक्षतळी बसलेले असता, वाहात गर्जत चाललेला ओढा तुमची नजर ओढून नेत असतो आणि खालच्या हजारो फूट खोल दरीत आपण अदृश्य होतो. जांभळ्या रंगाच्या साम्राज्यातून मग तुम्ही पलीकडल्या आकाशाला भिडलेल्या पहाडांतले सनातन बर्फाचे थप्पे पहाता, बर्फाच्या पलीकडे पाण्याचा

ओहोळ वर्फात गुप्त होतो आणि फर्लांगभर खाली ( प्रत्यक्ष मैलभर सुद्धा असेल ) तो दुग्धस्रोत पुन्हा प्रगट होतो. हे रौद्रभीषण स्वरूप असलं तरी तितकंच संतुलित आहे.यातली वैविध्यं उत्कट आहेत म्हणून याच्यासारखं हेच, म्हणावंसं वाटतं.'

'तुम्ही कविता करता का हो रेमंड साहेब ?'

'कां हो ? लग्नापूर्वी करीत असे. आता साधा इंजिनियर आहे.'

'बरोबर ! सृष्टीचे हे प्रचंड यंत्र पाहायला निघालेल्या कवि - इंजिनियरासारखेच वाटताय तुम्ही !'

'खरं म्हणजे काय कशापेक्षा श्रेष्ठ आहे हे ठरविणं कठीण आहे !'

'श्रेष्ठ कनिष्ठ वादात आपण पडाच कशाला ! आपण कोण मोठे लागून गेलो आहोत टिक्कोजीराव !"

'राइट यू आर ! त्याच्यात मग अभिनिवेश येतो. आणि रसिकाची भूमिका सुटते.' आता मात्र त्याने टाळी दिली होती माझ्या हातावर.



शिशनाग तलावावरची हिमनदी

म्हणजे आम्ही सुरुवात केली ' पहलगांव श्रेष्ठ ' या अभिनिवेशाने आणि शेवटी या अध्यात्मावर येऊन संपविले. नऊ वर्षांपूर्वीचे हे सगळे !

पहलगांवची तिकिटे आम्ही कालच काढली होती म्हणून बरे नाहीतर आज काही जागा मिळाली नसती. आमची बस होती टुरिस्ट बस. जागोजाग थांबणारी नि काही ठिकाणी तर वाकडी वाट करून जवळपासच्या सुद्धा पाहाण्यासारख्या ठिकाणी जाऊन येणारी. शाळेच्या मुलांसारखी किंवा प्रवासी कंपनीच्या ट्रिप सारखी ही सहल होणार आहे. ' आमचा पहलगांवचा प्रवास ' म्हणून शाळेच्या षण्मासिकांत लिहिता येण्यासारखी. बसमध्ये इंदूरच्या कॉलेज-मधली ट्रान्झिस्टरवाली मुले आहेतच सपिंडी श्राद्धऐवजी चटश्राद्धावर आम्ही भागविणार आहोत. ऋतूहि असा आहे की फुरसत असती तरी आम्ही यापेक्षां फारसा मोठा पराक्रम करू शकत नाही. पहाडी सहलीचा हंगाम जवळ जवळ संपला आहे. एकाद्या सातआठ मैलांवरच्या ठिकाणी जातांना सुरक्षित गेलांत तरी येतांना हिमवादळ होणारच नाही अशी खात्री कुणी देत नाही. इतके मार्ग दुर्गम झाले आहेत.

आजच्या दिवसांत पाच - सहा ठिकाणे आमच्या रेकॉर्डला लागणार आहेत. कुकर नाग ( हत्तीच्या सोंडेएवढे अनेक डोंगरी झरे ) अच्छाबल ( झरा + मुंगल बगीचा, ) अनंत नाग ( झऱ्यांची पुष्करिणी ) आणि मार्तंड ( तीर्थ ) ही चार ठिकाणे पाहूनच आम्ही दुपारी पहलगावला पोहोंचलो. गावांत शिरायच्या आधीच गेल्या वर्षी डोंगरावरचा जलशय फुटून त्या पाणलोटाने जो हाहाःकार उडविला होता त्याच्या खुणा उजव्या हाताच्या डोंगरांत दिसल्या. डोंगर कड्यावरून सुटलेल्या पाणलोटाने थेट नदीपर्यंत एक चांगली दगड - गोट्यांनी भरलेली एक घळच तयार झालेली दिसली. या क्लाउडबर्स्टचे वर्तमानपत्रांतून आलेले शब्दचित्र माझ्या नजरेसमोर उभे राहिले. एक हॉटेल या प्रवाहांत सांपडले. आणि त्याचा वरचा मजल्याच मजला त्याने लिदर नदीत नेऊन सोडला. दिव्याच्या राक्षसाने सोडावा तसा. या हॉटेलची धडगत नाही असे पाहिल्यावर एका जोडप्याने खिडकीतून उड्या टाकल्या. कशीबशी ती वाचली. बाकीची तीस माणसे खलास ! हा सरकारी आंकडा आहे. तोच विश्वसनीय असावा. कारण इथले स्थानिक घोडेवाले चाळीसपासून शंभरापर्यंत अनेक आकडे आतां सांगतात.

एक प्रवासी सामान त्या हॉटेलांत ठेवून नुकताच बाहेर पडला होता तो सुदैवाने वाचला होता. असे सुदैवी फारच थोडे होते. दुर्दैवीच जास्त. आता त्या प्रसंगावर सुरस आणि चमत्कारिक दंतकथा पहलगावांत आकार घेत आहेत. पाण्याच्या प्रचंड वेगाने कशालाच उसंत ठेवली नव्हती. वाटेत आलेली प्रत्येक वस्तू होती का नव्हती करुन टाकली होती.

पहलगावला आलो तो उशीर झाला होता. तरीहि 'पूर्णिमे' त अनपेक्षित गरमागरम जेवण मिळाले. गाडी सुटायला संध्याकाळी सहा वाजणार होते. म्हणून एक लहानसा फेरफटका घोड्यावरुन करुन यायचे ठरविले.

'तुमची का घुडस्वारी जमते हो? काही कठीण नाही त्यांत!' अण्णा महादेवाचे दर्शन घेऊन बाहेर आल्यावर पुन्हां स्वार होण्याआधी मला सांगत होते.

'तशी सोपीच आहे हो! म्हातारी कोतारी नि दुर्बळ माणसं सुद्धां जातातच तट्टांवरुन. चालत चढण्यापेक्षा पुष्कळ सोपं.'

'जन्मांत पहिल्यांदा बसलो घोड्यावर. पण मला सरावच आहे अशासारखं वाटतं.'

'असं! पण रात्री बघा कशी मजा होईल.'

'मजा?'


'तर हो! बैठकीची चामडी हुळहुळी होते.'

'तासाभरांत?'

'बघालच आज रात्री!'

अण्णांच्या वयोमानाप्रमाणे आणि माझ्या अपेक्षेच्या मानाने त्यांना स्वारी चांगली जमली होती. पंधरावीस दिवस आधी आलो असतो तर पांच - सात मैलांतल्या सहली त्यांना त्रास न होतां जमल्या असत्या.

पहलगांवच्या आमच्या जुन्या घोडेवाल्या मित्राची, खलीकूची मला आठवण झाली. त्याला मुद्दाम बोलावून घेतला. माझ्या प्रमाणेच आमच्या पुनर्भेटीची त्यालाहि मजा वाटली. वाटेत भेटला असता तर मी त्याला ओळखले नसते. मागील वेळी, तोच आमचा मार्गदर्शक होता. या वर्षी आता अमरनाथची गोष्टच बोलायला नको होती. म्हणून त्याने निरोप घेताना मला बजावले होते, 'ऑगष्टमध्ये बाईसाहेबांना (आमच्या) घेऊन



शेतकरी-घोडेवाल्याचे कुटुंब

या. आपण जरूर दर्शन घेऊ.' त्याच्या मुलांना खाऊला दिलेले पैसे मला त्याच्या खिशांत जबरदस्तीने कोंबावे लागले. माझ्या 'भाबीला' ला त्याच्या 'भाबी' चा नमस्कार प्रविष्ट करण्यास सांगून मी त्याचा निरोप घेऊन गाडीत येऊन बसलो.

परवांची पठाणकोटची परतायची तिकिटे नोंदवून झाली आहेत. कुणाच्यातरी कृपेने! ही मात्र पहिल्या बाकाची आहेत.

उद्या जमल्यास गुलमर्गला जाऊन येण्याचा विचार आहे. गुलमर्ग झाल्यावर अण्णांची ही प्रवासी डब्यांतल्याप्रमाणे होणारी काश्मीर यात्रा सुफल-संपूर्ण होणार आहे. अण्णांच्या वयाच्या मानाने अण्णा चांगले टिकले आहेत. इथल्या मर्यादित भटकण्याचा वचपा कुलूला भरून निघायचा आहे.

♣ ♣

# पठाणकोट, (रिटायरिंग रूम)

ऑक्टोबर २२, १९६४

**पुन्हा** तीन दिवसांची रोजनिशी लिहीत आहे. पण इलाज नाही. काल पहाटे पंच पंच उषःकाली उठून सहा वाजता प्रवासी केंद्रावर हजर झालो. साडेसहा वाजता बस सुटायची होती म्हणून तशी सूचना होती. प्रत्यक्ष सुटली मात्र सात पन्नासला.

कश्मीर आम्ही सोडत होतो. येताना वाटले होते तितके कश्मीर रुक्ष नव्हते. पाण्याच्या सुकाळामुळे ते पार सुकून केव्हाच जात नसावे. बर्फकाल अर्थातच याला अपवाद.

येताना आमच्या जागा शेवटच्या क्रमांकाच्या होत्या. तरी गाडी पहिली होती. त्यामुळे सर्व ठिकाणी वेळेवर पोहोचून प्रवास झक्क झाला होता. आता जागा पहिल्या क्रमांकाच्या असल्या तरी बाकी सर्वच हाल झाले. लष्करी गाड्यांचे तांडे नि रस्तादुरुस्तीची धूळ यांनी हैराण केले. बरे असे जेवण कुठेच मिळाले नाही. वेळेवारी असे कुठेच काही होऊ शकले नाही.

रात्री जम्मूला पोहोचायला अर्थातच उशीर झाला. झोपण्यापुरतीच तिथे वस्ती करायची होती. धड जागा कुठे मिळेना. अखेर गोठ्यासारखी एक खोली मिळाली. या गोठ्यांत गुरे नव्हती आणि गोठ्याचे नाव ' जयमहाल ' होते. संडास वर धाब्यावर. भाडे रुपये तीन. आम्हाला केवळ आठ तासच जागा पाहिजे होती. पहाटे साडेपाचला गाडी निघायची होती. कारण त्याच गाडीला पुन्हा लगोलग श्रीनगरला परतायचे होते.

पुन्हा पहाटे उठून सामान बांधले. आणि दिसायला लागायच्या आधी आम्ही टवी नदी ओलांडली. पुढच्या सीटचा आज मात्र छान लाभ झाला.

सूर्योदयापूर्वीची उषा आणि अरुण यांची जादू आम्ही अनुभविली. तसा तर कैक वेळा निरनिराळ्या ठिकाणाहून हा प्रकार अनुभवला आहे; पण म्हणून काय त्यांतली जादू संपते थोडीच !

साडेआठ वाजता आम्ही पठाणकोटला पोहोचलो सुद्धा. कुलूची बस आधीच सहा वाजता सुटून गेली होती. एक आख्खा दिवस इथे थांबायला पाहिजे होते. म्हणून ही रिटायरिंग रूम गाठली.

ही मात्र झक्क आहे. मुख्य म्हणजे अतिशय स्वच्छ आहे. इतकी की घाणेरड्या माणसासही घाण करायला इथे शरम वाटावी. प्रथम टोपलेभर कपडे धुतले. गरम पाण्याने अगदी अभ्यंग स्नान केले. सगळ्या आठवड्याचा शीण नाहीसा झाला. प्रवासात सुद्धा आठवड्याने एकाद दिवस विश्रांती पाहिजेच. शिवाय मुंबईला परतायची एकतीस अगर एक तारखेची रेलवेची जागा राखून ठेवायची होती.

दहा वाजता कुलू प्रवासी - केंद्रात गेलो. आम्ही ठरविलेल्या कार्यक्रमात काही इष्ट सुधारणा करता येतात का त्या पाह्यच्या होत्या. कुलूला पोहोंचल्यावर एकादी जीप मिळाली असती तर आम्हाला पाहिजे होती. भाड्याने. तिथे मग पायाशिवाय दुसरे काही साधन नव्हते. ती मिळावी म्हणून चांगली शिफारस पत्रे आम्ही घेऊन ठेविली होती. परंतु तिथे जाऊन काही एक वळले नाही. आणि आमच्या पुस्तकी नि ऐकीव कुलू खोऱ्याच्या ज्ञानांत काही भर पडली नाही.

संध्याकाळी मुंबईला परतायची तिकिटे नोंदली आणि निश्चिंत झालो. आता कुलूची हुरहुर मनाला लागून राहिली आहे. कसली तरी हुरहूर, कसली तरी काळजी, फिकीर, मागे लावून घ्यायची मला संवयच आहे. डोक्यावर कसला तरी बोजा असला पाहिजे. त्याशिवाय मी ताठ राहू शकत नाही की काय कुणास ठाऊक !

उद्या पुन्हा पहाटे उठायला हवंय !

♣ ♣

# कुलू (टूरिस्ट बंगला २)

ऑक्टोबर २३, १९६४

**नव्या** मुलुखाच्या सहलीला अशी माझी आज सुरुवात झाली कुलू खोऱ्याला देवाचे खोरे म्हणतात. या खोऱ्याविषयी माझे कुतूहल बऱ्याच वर्षांचे आहे. मुग्ध सृष्टिवैभवाने नटलेला, माणसाने न बिघडविलेला असा हा भारताचा पश्चिमोत्तर भाग तसा दुर्लक्षितच आहे. परंतु सृष्टिकर्त्याने उत्पन्न केलेल्या मूळ स्वरूपात आहे.

गिरिशिखरे मला बोलावतात म्हणून मी म्हटले तर ते कवीसारखे दिसेल. कवीसारखे दिसेल म्हणून मोठेसे काही बिघडत नाही. परंतु त्या नुसत्या गुणवत्तेचा आरोप आपल्यावर हवा कशाला? सांगायचा मुद्दा एवढाच की डोंगरात भटकणे लहानपणापासून आपल्याला बुवा आवडते! त्यात आता पंधरा वर्षांपूर्वी हिमालयाचे किंचिद्दर्शन झाल्यापासून दर वर्षी त्या शुभ्र धवल हिममुकुटाचे आकर्षण वाढतच चाललेय.

उषा, अरुण नि प्रभाकर यांचा आजचा रंगविलास विशेष उत्कट भासतो. ऋग्वेदातील उषेचे वर्णन मला आठवते. त्या बाबतीतला वाद आठवतो. ऋग्वेदात उषेची अनेक वचने आलेली आहेत. म्हणून एका पाठोपाठ येणाऱ्या या उषा, दीर्घकाळ टिकणाऱ्या उषा, या आर्टिक क्षेत्रातीलच असल्या पाहिजेत. त्या अपौरुषेय साहित्यातील, बाकीचे अध्यात्म सोडले तरी केवळ त्या प्रदीर्घ उषामहात्म्यासाठीच ते साहित्य वाचावे, अशा योग्यतेची ती वर्णने क्षणकाल टिकणाऱ्या उषेची खास नाहीत. हा लोकमान्य टिळकांच मुद्दा.

यावर शंकाखोरांचा उत्तरपक्ष असा की त्या अनेक उषा—आजची उषा, कालची उषा, परवाची उषा अशा अर्थी अनेक उषा असू शकतील.

कालची उषा मी पाहिली होती. आजची पाहिली. मी कवि नाही. प्रतिभावान नाही. कुठल्याहि पक्षाचे समर्थन करण्याइतपत विद्वान नाही. तरीहि एक सामान्य वाचक म्हणून मला आपले वाटते की ऋग्वेदात जी प्रदीर्घ वर्णने उषा सौंदर्याची आहेत त्यांची प्रचीति यायला ही क्षणैक टिकणारी, मी दोन दिवस पाहिलेली उषा पुरेशी नाही.

विचारतो कोण माझ्या या मताला! तरी सुद्धा वाटायचे ते वाटतेच ना! ते आपल्याच रोजनिशीत नमूद करायला कोणती हरकत आहे ?

'प्रतिक्षणं यन्नवतामुपैति। तदेवरूपं रमणीयतायाम् ॥' या कोटीतील रमणीयता आम्ही दोन्ही दिवस पाहतो आहोत. यावर छत्तीस वेळा 'स्वयंवर' नाटक पाहिलेल्या नाटकवेड्याची गोष्ट अण्यांना आठवते. त्यावर चौदा वर्षे दरवर्षी बद्रीकेदारची यात्रा करणाऱ्या, हिमगिरीचे वेड असणाऱ्या यात्रीची गोष्ट मी त्यांस सांगतो.

उषा, अरुण नि प्रभाकर या तिन्ही भावंडांच्या पराक्रमाचे क्षेत्र आज थेट आमच्या नाकासमोरच आहे. कालच्यासारखी जरासुद्धा मान तिरकी करायला आज लागत नाही. 'घनःशाम सुंदरा, श्रीधरा, अरुणोदय झाला....' ही भूपाळी आमच्या मनात आपोआप घुमू लागते. 'करिती सडा संमार्जन....' इथपर्यंत ती उलगडते. आणि काय योगायोग पाहा! बाहेर पाहातो तो नूरपूर हे जुन्या राजधानीचे गाव ('काप गेले नि भोके राहिली, अशी दशा प्राप्त झालेले) आलेले असते. या नगरीतील पुरंध्री सडा संमार्जनाचे प्रात्यक्षिक करतांना दिसतात कडेवर घडे घेऊन पाणी आणीत असतात. शारदा, सौभद्र ही नाटके जशी अजून ताजीच, तशीच ही अमर भूपाळी! ते प्रसन्न काव्य अंतर्बाह्य अनुभवायला मिळत असते. मनात मी ती भूपाळी आळवून आळवून म्हणत असतो. (मोठ्याने म्हणायची आमच्या सारख्याला काय सोय आहे!)

गाडी नूरपूरच्या थांब्यावर थांबते. एका उत्पाताच्या वेळी काश्मीरमधले कारागीर परागंदा होऊन इथे स्थाईक झालेले असतात. परंतु प्रभातकाळ असल्यामुळे त्यांची कारागिरी एकाद्या दुकानात जाऊन पाहाण्याची सोय नसते. उबदार किरणे पडायला सुरुवात होते न होते तोच गाडी हालते. गाडीतल्या जागा आता फारशा रिकाम्या राहिलेल्या नसतात.

रस्ता थोडा चढ-उताराचा आलेला असतो. लहानसा घाट पार करून

गाडी पुढे सरकते. वाटेत एक चौकी लागते. चौकींत चौकीदार तर नसतो. आमच्या गाडीची नोंद तर व्हायला पाहिजे असते. म्हणजे आली आता चांगलाच खोळंबा व्हायची वेळ! पण नाही. खोळंबा होत नाही. आमच्या-सारखी बसच्या चालकापुढे काही समस्या नसते. तो खाली उतरतो. आणि सरळ सरळ चौकीत जातो. टेबलाच्या खणातून नोंदवही काढतो. जी काय नोंद करायची ती करतो नि वही होती तिथे ठेवून दुसऱ्या मिनिटाला गाडीत चढतो. चढता चढता तो 'टणटण' करतो नि बस चालू सुद्धा होते. चौकीदाराची सही मात्र त्याने केली नसावी. फुरसतीने तो ती स्वतःच करणार असेल. 'एकमेका सहाय्य करू अवघे धरू सुपंथ' अशा प्रकारची या पंजाबात सहकारी भावना बरीच रुजलेली दिसते. नाही तर बऱ्या कारभाराबद्दल प्रसिद्ध असलेल्या आमच्या महाराष्ट्रांत आहे का अशी सहजीवनाची नि सहकाराची भावना?

भूपाळीचा प्रहर आता संपलेला आहे. कारण दुतर्फा शेतांतून किसान नरनारी आपल्या न्याहाऱ्या आटोपून (हे गृहीत धरलेले आहे) कामाला लागलेल्या आहेत. त्यांची सुगी आता नसून पुढे असावी. गव्हाची. कश्मीर खोऱ्यात उतरल्यावरोबर दुतर्फा असलेली सफेदाची वृक्षराजी जशी प्रवाशाला मानवंदना देते तशीच खडी ताजीम, शिसमची वृक्षराजी या पंजाबी रस्त्यावर देते. इथल्या डोंगरावर हिरव्याची निळाई झालेली नाही. ती होते हिमाच्या सान्निध्यांत. आजच्या प्रवासात तोहि भाग येतो. पुढे गेल्यावर. निदान कुलू खोऱ्यांत तरी!

आज पहाटे पठाणकोटच्या फलाटावरच चहा झाला होता. अगदी बेचव! पुळकवणी! आमच्या आजीच्या शद्बात म्हणजे 'मांजर-मुतवणी.' (ते कुणी चाखलेले असते कुणास ठाऊक?) परंतु याचा वचपा आम्ही आता आठच्या सुमारास त्रिलोकपूरच्या टावरणात काढतो. इथे 'चाय' झक्क आहे. ताज्या खऱ्या दुधाचा. (नाही तर जिथे पाहावे तिथे आपले डब्यांचे दूध! प्रवासी म्हणजे काय लहान मुले असतात? डब्याचे दूध कशाला?) ह्या टावरणाच्या शेजारी एक स्वच्छ पाण्याचा चष्मा आहे. म्हणूनच की काय, इथे स्वच्छता सुद्धा बरी आहे.

शिवाय देशी तुपांतली मिठाई! (अलिकडे हा फक्त शब्दप्रयोग राहिला

आहे. उथे त्याचा प्रत्यक्ष प्रयोग झाला आहे. ) तोंडात टाकल्याबरोबर विरघळणारी. चावण्याचे श्रम न पडता. माशा अर्थात् होत्याच. तो इकडे मिठाईचा भाग समजला जातो. हे आरोग्यशास्त्र आपल्या गळ्याखाली काही उतरत नाही. यावर अण्णा एक तोड सुचवितात. कढईत प्रत्यक्ष जो पदार्थ आमच्या समोर चालू असतो ( हा परवांच्या शिळ्या भाजीचा, काल केलेला बटाटेवडा आज पुन्हा तळणीत टाकलेला नव्हे ! ) तेव्हढाच ताजा आम्ही घेतो. माशा त्याचा एक भाग व्हायच्या आधी. फार दिवसात इतका उत्तम नाश्ता जमला नव्हता.

साडे नऊच्या सुमारास पालमपूर येते. ( हे मुंबईच्या व्हिक्टोरियावाल्याचे पालनपूर नव्हे ) गाडी इथे आर्धा-पाऊण तास उभी राहणार आहे. आम्ही पाय मोकळे करून येतो. ही नागाधिराजाची एका उपत्यका आहे. उंची एकेचाळीसशे फूट. कश्मीर, कांगडा नि कुलू या तीन ‘ क ’ कारांपैकी दुसऱ्या ककारांतून आमचा प्रवास चालू आहे. कांगड्यांतील या पालमपूरला डलहौसी या थंड हवेच्या ठिकाणाची प्रतिष्ठा आहे. देवदाराचे चहूकडे दाट जंगल आहे. जिकडे बघाल तिकडे ‘ अयं सते तिष्ठति देवदारु । पुत्रीकृतो येन वृषमध्वजेन ॥ ’

उतारावर चहाचे मळे आहेत. एका लष्करी तांड्याला वाट देण्याकरता गाड्या थांबतात. शेजारच्या मळ्यांतले चहाचे पान खुडून मी हातावर चोळून बघतो. चहा निलगिरी आहे का दार्जिलिंग ! पण कसलं काय ! पानाना चहाचा सुद्धा वास येत नाही. रानटी झाडाचा उग्र वास ! हा कसला आलाय चहा ! गाडीतच बसून राहिलेला एक शेमलेवाला सेटी माझ्या मर्कटलीला पाहात असतो. मी गाडीत पुन्हा बसल्यावर मला तो समजावतो. जून झाली पानं कीं खुडून तंदूरीत भाजतात. त्यावर आणखी काही संस्कार झाल्यावर मग त्याना चहाची खुशबू येते. पूर्वी इथे ‘ हरी पत्ती की चाय ’ पिकवीत असत. वायव्ये-कडील प्रांतातून त्याला चांगली मागणी असे. परंतु आता ते दळणवळणच बंद झाल्यामुळे इथे फक्त ‘ काळी चाय ’ पिकवितात. चहा उंची असतो.

पालमपूरच्या आधींपासूनच पठाणकोट ते जोगिंदरनगरची मीटर-गेज रस्त्याला सोबत करते. आणि आता अकरा मैलावरील बैजनाथपर्यंत दोघे गप्पा मारीतच चाललेली दिसतात. बैजनाथ पालमपूरसारखेच उंचावर आहे. बहुतेक शहरे इकडे उंचावरच आहेत. खलाटीत शेते नि शेतघरांच्या वाड्या

पाडे दिसतात. गाडी तळाजवळच दोन फर्लांगावर सुप्रसिद्ध बैजनाथ-शिवमंदिर आहे. गाडीवाला जेवणासाठी गाडी इथे थांबणार असल्याचे जाहीर करतो. परंतु इतक्या लौकर आम्हाला भूक लागलेली नसते. म्हणून आम्ही शिवमंदिराकडे मोर्चा वळवितो! दक्षिणेतला विस्तीर्ण प्रकार इथे नाही. परंतु लहान असली तरी अत्यंत सुडौल बांधणीची ही एक पुरातन वास्तू आहे. गुळगुळीत कोरीव दगडाची. उमललेल्या फुलाऐवजी गोजिरवाण्या कळीसारखी. सन ८०४ सालचा एक शिलालेख या मंदिरांत आहे.

बैजनाथ नंतर कांगडा जिल्ह्याची तशीच पंजाब प्रांताचीही हद्द लौकरच संपते. पूर्वेकडे लागून कुलू जिल्हा आहे. हा पंजाबचाच. परंतु वाटेत पहाड आहेत. त्यांना वळसा घालण्याकरिता गाडी हिमाचल प्रदेशाच्या मंडी जिल्ह्यांत दक्षिणेकडे उतरते.

गुणवैधर्म्य हे कांगडा जिल्ह्याचे वैशिष्ट्य. जणु सुखदुःखमय जीवनाचे प्रतीक! आता पाच मैल सपाटीचे गेले तर पुढचे पाच मैल चढावाचे. वर चढल्यावर मागे वळून बघावे तर शेतजमिनीच्या सोनसळ्या नि डेरेदार वृक्षांच्या बुट्ट्या काढलेले अनेक शालू उन्हांत पसरून वाळत घातल्याचे विलोभनीय दृश्य दिसते. लहान टेकड्या म्हणजे लोकर कापायला झालेल्या गुबगुबीत मेंढ्याच जणू!

आता थंडीचा हंगाम जवळ येत आहे. म्हणून बर्फाला सुरुवात व्हायच्या आधी आपापली जनावरे मैदानी प्रदेशाकडे हाकून न्यायची सगळ्या मेंढपाळांची नि गोपाळांची धांदल उडाली आहे. यांच्याकरिता वाटोवाट बस थांबवावी लागते. शुभ्र धवल वीत - वीत केसांच्या मेंढ्या आणि हात - हात लांबीच्या केसांची आयाळ असलेले मेंढे! मेंढपाळाची फिरान (कफनी) शुभ्र लोकरीची. तिला कमरबंध बांधला की तो एक होल्डॉलच होतो. आणि सर्पणापासून नुकत्याच वाळंत झालेल्या मेंढ्यांच्या बाळांपर्यंत सर्व वस्तू याच्यांत मावतात.

बैजनाथच्या पुढे पंधरा मैलांवर येते जोगिंदरनगर. गावात तसे पाहाण्यासारखे काहीच नाही. परंतु गावाबाहेर मात्र आहे. डोंगरापलीकडे बारोटला एक जलविद्युत केंद्र आहे. ते पाहायला जातात. प्रत्यक्ष ते पाहाण्यापेक्षा, ते पाहायला जातांना जो आठ हजारफुटी (समुद्रसपाटीपासून अर्थात)

पहाड ट्रॉलींतून चढण्याचा नि उतरण्याचा अनुभव येतो तो थरारक आहे म्हणतात. इतका चढ नि उतार उभा आहे! ट्रॉलींत बसतांना सरकारवर प्रवाशाची जोखीम नसल्याचा 'इन्डेम्निटी बाँड' लिहून द्यायला लागतो. बारोटला गेस्ट हाऊस पण आहे. रेलवेचा खंडाळा घाट नि खोपोलीचा मोटार रस्त्यावरचा उभ्या भिंतींसारखा भोरघाट ज्यांना वर्षातून अनेक वेळा पार करावा लागतो त्यांना या ट्रॉलीचे 'थ्रिल' किती अंशांनी वाटेल यावर ते कौतुक अवलंबून राहील. हे उरकायचे म्हटले तर आम्हाला दीड दिवस मोडावा लागणार आहे. तो आमच्या कोष्टकांत बसत नाही. म्हणून या 'थ्रिला'ची द्राक्षे आंबट असे मात्र नाही.

जोगिंदरनगरच्या पुढे मंडी पस्तीस मैलांवर आहे. तीन चार मैलांवर गुमा आणि ड्रांगच्या मिठाच्या खाणी आहेत. जोगिंदरनगरहून बारोटमार्गे पदयात्रा अगर घुडस्वारीने मधल्या रस्त्याने कुलूला गेल्यास त्या पाहता येतात. हे डोंगर - मीठ म्हणजे सैंधव असले पाहिजे. जरा पुढे गाडी उतरल्यावर एक बऱ्यापैकी नदी दिसते. खालच्या दरींत. शेजारी बसलेला लालाजी सांगतो. तो 'व्यास दर्या' आहे. बियासची ही सोबत मंडीपर्यंत तर आहेच. पण थेट कुलूपर्यंत होणार आहे. कुलू खोरे म्हणजे मुळी बियासचेच खोरे.

मंडीला गाडीतळावर गाडी थांबते. आम्ही जेवायला जातो. जिथे बसतो तिथून तळावरची गाडी दिसत असते. जेवण संपता संपता मला दिसते की कुणीतरी टपावरून आमचे सामान खाली काढीत आहे. कसाबसा हात धुऊन अण्णांना सांगून तिकडे धावतो. गाडीतल्या सगळ्या मंडळींनी केव्हाच सामानासह गाडी बदललेली असते. पहिली आम्ही आलेली गाडी आमच्या सामानामुळेच खोळंबलेली असते. शेवटी चालकांनी आमचे सामान काढून ठेवून गाडी तबेल्यांत नेण्याचे ठरविलेले असते. आता इथे गाडी बदलायची आहे हे आम्हाला काय माहीत! आमचे तिकीट तर थेट कुलूचेच होते. रेलवेचे तिकिट थेट टिंबक्टूचे मिळते नि वाटेंत दहा वेळा गाडी बदलायला लागते हे माहीत आहे. परंतु बसचे सुद्धा तसे असू शकते ही कल्पना आम्हाला चालकाने का दिली नाही म्हणून विचारताच, आम्ही नवे आहोत हे त्यास माहीत नव्हते, असे उत्तर आले.आता तर आम्हाला इन्फंटीतली पोरे समजून

सगळेच आपापल्या परीने समजावूं लागलेले असतात. आम्हीही 'भोळे' बनून ऐकतो.

हिमाचलप्रदेश आणि कुलूंत दोन निरनिराळ्या कंपन्यांची मक्तेदारी आहे. म्हणून गाडी बदलावी लागते. तिकिटाचे पैसे प्रमाणांत वाटून घेतले जातात. म्हणून तिकिट एकच चालते. नवख्या माणसास न सांगता हे कसे समजावे! गाडीत नवखे फक्त आम्हीच होतो. दोघे

मंडी हे जिल्ह्याचे ठिकाण असले तरी त्याला इतर महत्त्व काहीच नसावे. उंची चोवीसशे ऐशी फूट असल्यामुळे हवा बरी आहे. तरीसुद्धां जुन्या नदी-काठच्या गावांसारखे दाट नि कोंदट वस्तीचे आणि थोडेसे गलिच्छच वाटते. रवळसार या तीर्थक्षेत्राला जाण्याकरता मंडीलाच यावे लागते. सिमल्याकडून येणारा रस्ता इथेच येऊन मिळतो.

तीन मैलांवर गेल्यावर पायउतार व्हावे लागते. गाडी पुलावरून रिकामी जायची असते. पूल जुना आहे. आता बियास काठ धरूनच गाडी रस्ता चढत जाते. कुलू हा पंजाबचा निराळा जिल्हा बनविला आहे. हिमाचल प्रदेशाची हद्द संपून गाडी पुन्हा पंजाबांत प्रवेश करते. कुलू खोऱ्याची लांबी एकूण शंभरएक मैल. पार रोहटांग खिंडीच्या पायथ्यापर्यंत. म्हणजे बियासच्या उगमापर्यंत.

मंडीच्या पुढे रस्ता आता अरुंद दरींतून चढत आहे. दरींत गर्जणारी बियास आहे. वाहातूक एकमार्गी आहे. भर दुपारी इथे उन्हाचा कवडसा सुद्धा नाही. वाहातूक दुमार्गी असावी म्हणून नदीच्या पलीकडील अंगाला नव्या रस्त्याचे काम चालू आहे. ही दरी म्हणजे पंचवीस मैल लांबीची एकच एक खिंड आहे. दोन्ही बाजूच्या पाहाडी भिंतीवर दाट जंगले आहेत. म्हणून दरीचे स्वरूप रौद्र भासत असले तरी आकर्षक आहे. नजर सारखी वर-खाली कोसळत असते. तरी काढून घ्यावीशी वाटत नाही.

औटला खिंड संपते. खोऱ्याला सुरुवात होते. रस्त्यात एक आडवी साखळी औटच्या भर बाजारात रस्त्याच्या वळणावर बांधलेली आहे. ही चार वाजता उचलणार आहेत. मग दोन्ही बाजूना तुंबलेली वाहातूक एकमेकांना डावलून पुढे चालू लागेल.

रेलगाडीत गर्दी असली म्हणजे कसे अंग चोरून बसावे लागते

(बसायसा जागा मिळाली तर! नाही तर उभे राहावे लागते तेहि अंग चोरूनच.) तसे दरीच्या अरुंदपणामुळे आम्ही उगीचच संकोचून गेलो होतो. आता उन्हे दिसतात. आणि मोकळे मोकळे वाटते. दिवस लहान आहेत. म्हणून आता साडेचार वाजताच सावल्या लांब लांब झाल्या आहेत.

मोठे असे गाव बजौरा येते. इथे फक्त एक वज्रेश्वर महादेवाचे मंदिर आहे. दुसरे वैशिष्ट्य काहीच नाही. बैजनाथ सारखेच सुडौल लहानसे देऊळ आहे. १९०५ सालच्या भूकंपात याचा एक खास कोरीव काम केलेला मूळचा भला मोठा दगड पडून दुभंगला. त्याचीच प्रतिकृति करून नवा बसविला आहे. हे मंदिर नदीकाठाकडे असून पुराणवस्तुखात्याचे संरक्षित शिल्प आहे.

बरी बाजारपेठ असलेले अरुंद रस्त्याचे हे भुंतर. आता कुलू फक्त सहाच मैल राहिले आहे. उजव्या हाताला रस्ता दिसत आहे, हा पार्वती खोऱ्यात जाण्याचा. कोपऱ्यात मैदान दिसत आहे. हाच म्हणे कुलूचा विमान तळ. रन-वे कुठेच दिसत नाही. हिरवळच दिसते आहे मैदानभर. डाकोटा, व्हायकौंट यांना एवढेच पुरत असावे.

सकाळी गाडीत बसल्यापासून सुमारे बारा तासांनी केवळ पावणेदोनशे मैल प्रवास झालाय आमचा. आणि आता दिवस मावळतांना आम्ही कुलूच्या धालपूर मैदानात उतरत आहोत. मंडीपासूनच्या त्रेचाळीस मैलांनाच चार तास लागले आहेत. कुलू कुलू म्हणून घोकत होतो ते कुलू आले आहे. परंतु उतरल्याबरोबर चपळाई करावी लागत आहे.

मी गाडीतून उतरल्याबरोबर टूरिस्ट ब्यूरो गाठतो सामानबिमान अण्णा उतरून घेतात निरनिराळया बंगल्यांपैकी एकच ब्लॉक शिल्लक असतो. तो आम्हाला मिळतो. परंतु एक लालजी त्या ब्लॉकबरोबर भागीदार घ्यावा लागतो. चांगला माणूस वाटला. एकटाच होता. त्याला संबंध ब्लॉक काय करायचा आहे? म्हणून तो आमच्या सारख्यांची वाट पाहात होता. आम्हा तिघांचीहि सोय होते. लालजींचे नाव चिरंजीलाल.

इथल्या पहाडी हमालांची कमाल आहे. शिरपुत्र्या दिसणारा एक पठ्ठा आमचे चारी डाग पाठीवर बांधून घेतो. आणि तिथून पाच फर्लांग अंतरावरच्या टेकाडावर सहज एकटा वाहून नेतो. तो दीड रुपया हमाली घेतो. ती वाजवीच असते. त्याने अडवून धरले असते तर आम्ही दुप्पट सुद्धा दिली

असती. त्यातला एकहि डाग एवढ्या उंचावर नेण्याची आमची ताकद नाही. बसून बसूनच आम्ही दमलो आहोत.



नाकासमोरचा डोंगर बिजली महादेवाचा

रात्रीचे जेवण आटोपल्यावर आता या ठिकाणाकडे लक्ष जात आहे. बंगल्याची बांधणी आपली सरकारीच आहे! परंतु ठिकाण उंचावर नि मोक्यावर आहे. भुंतरच्या अलिकडला थेट नाकासमोरचा पहाड म्हणे बिजली महादेवाचा.

टिपूर चांदणे पडले आहे. पौर्णिमा काल-परवाच झाल्याचे आठवते. हे आवार तसे खूब मोठे आहे.कोंकणातल्यासारखी कोणतीहि वस्ती इथे डोंगराच्या कुशीतच असायची. ' जरा एक फेरफटका मारून येऊया का ? ' म्हणून अण्णा सुचवितात. आम्ही बाहेर पडतो. परंतु फारसे कुठे भटकण्याऐवजी आमच्या घराच्या समोरच्च सज्जासारख्या एका डोंगरी ओस्यावर आम्ही बसतो. कुलूचे पहिले दर्शन तरी फार आल्हादायक आहे. खालच्या बियासच्या पलीकडल्या

पहाडावर वस्ती दिसत आहे. मैल-अर्ध्या मैलावर लुकलुकणाऱ्या एखाद्या दिव्याच्या अस्तित्वामुळे ती जाणवत आहे. एवढ्या उंचीवर ही शेतघरेच असली पाहिजेत. किती कष्टाळू जीवन हे! डोंगराला ओटे पाडायचे आणि काही तरी धान्य तिथे उपजावयाचे! सबंध रत्नागिरी जिल्हाभर हेच जीवन आहे.

आम्ही बसलो आहोत त्याच्या मागच्या पहाडापलीकडे कैंसघार वगैरे आणि समोरच्या पहाडावरच 'बिजली महादेव' ही ठिकाणे असल्याची उठता उठता जाणीव होते.

♣ ♣

# कुलू ( टूरिस्ट बंगला )

## ऑक्टोबर २४, १९६४

आज इथून मुक्काम हलवून कुठे दूर जायचे नव्हते. धालपूर मैदानातील यात्रेचा नि महोत्सवाचा आज शेवटला दिवस होता. उत्सव फारसा राहिलाच नव्हता पळती यात्रा असली तरी अद्याप ती सबंधच्या सबंध मैदानात शिल्लक होती. आपल्याकडे दसरा हा महोत्सवाचा अखेरचा दिवस असतो. तर इकडे तो पहिला दिवस.

आज सकाळी बाहेर पडलो तेव्हां आमचा खोली - मित्र चिरंजीलालहि आमच्या बरोबर होता. याचे नांव चिरंजीलाल असले तरी अण्णा आणि मी आपसांत त्याचा उल्लेख ' भाऊभट ' म्हणून करतो. पहिल्याच दिवशी आम्ही बंगल्यावर यायच्या पूर्वी टूरिस्ट ऑफिसरशी, आमच्याशी आणि हमालाशी सुद्धा तो ज्या कोकणी धूर्तपणाने वागला होता त्यावरून मला आमच्या भाऊभटाची आठवण झाली, आणि या चिरंजीलालचे बारसे करून आम्ही मोकळे झालो होतो.

व्यवहारांत हा जरी असा कोकणी माणसाचा नमुना असला तरी एरवी सहवासाला हवाहवासा वाटणारा ऐसपैस पंजाबी आहे. साठीच्या पुढल्या उमरीतला असून याची ' टांगे ' ( त्याचाच शब्द ) मजबूत आहेत. उत्साह उतू जातो आहे. बोलण्यांत खानदानी अदब - आर्जवीपणा असून शिवाय विनोदाचे इंद्रिय शाबूत आहे. भरदार आवाजात पंजाबी किस्से हा सांगू लागला की वेळ चांगला जातो.

हा ' भाऊभट ' एका उद्योग - समूहाचा प्रतिनिधी आहे. त्याच्या उद्योगपतीने या पाहाडी मुलखांत, पुढे केव्हां तरी कामाला येतील म्हणून,

धूर्तपणाने राने आणि जमिनी खरीदण्याचा सपाटा लावला आहे. त्याच कामासाठी भाऊभट वरचेवर कुलूला येत असतो.

मैदानांत भाऊभटाला एक तलाटी भेटला. त्या तलाठ्याकडे काम असल्याचे हळूच आमच्या कानावर घालून, मिष्ठासपणे आमची क्षमा मागून स्वारी तुरुतुरू चालत तलाठ्याबरोबर निघून गेली. पायांत सुरवार, अंगांत पैरण नि त्यावर पांघरलेली शाल आणि गळपट्ट्याची डोक्याला गुंडाळलेली टापशी, अशा वैशिष्ट्यपूर्ण पंजाबी पोषाखातली खुसखुशीत बोलणारी ही स्वारी कोणाच्याहि लक्षांत राहावी.

आज दुपारी भुईन ( भुंतरजवळ ) च्या विमान तळावर याला आपल्या उद्योगपतीला निरोप द्यायला जायचे होते. या मालकांबरोबर त्यांचे काही हुद्देदारहि आले होते. राना - डोंगरांत हिंडायला त्यांना सोईस्कर जावे म्हणून एक जीपहि आली होती. जीपच्या दुर्मिळतेबद्दल मी आणि अण्णा सकाळी बोलत असता या भाऊभटाने आम्हाला एक आमीष लावून ठेवले होते.

'अजी, जीप म्हणजे चैन आहे चैन या मुलखांत! आणि तुमचा काका मामा इथे कमिशनर असल्याशिवाय कितीहि पैसे खर्च केलेत तरी जीप तुम्हांला मिळणार नाही.'

'मग आम्ही करावं काय? मुंबईची माणसं आम्ही! तुमच्या इतकी आमची 'टांगे' मजबूत नाहीत.'

'दूरान्वयानं एक गोष्ट संभवते. पण तुम्ही खात्री बाळगू नका. मात्र मी कोशीस करीन माझ्याकडून होईल तितकी.'

'जीप मिळायची म्हणताय काय?'

'तर! दुसरी कसली?'

'म्हणजे कसं काय? माझ्या नाही लक्षांत आलं.'

'हे 'हत्तीचे बच्चे' आले आहेत ना? ते दोन दिवसांनी जातील विमानाने. मग जीपचा बदमाश आहे ना? ड्रायव्हर? तो एक दिवस तरी इथं चोरून भाडं करील आमच्या गावी पोचण्यापूर्वी. तेव्हा आपण जमवू कांहीतरी त्या कंबखताशी.'

'बडी मेहेरबानी होईल लालाजी, असं काही जमविलंत तर!'

'अरे भाई,आपण साथ राहाणारे! माझं काही खर्च न होता तुमची काही

सोय झाली तर बडी खुषी होईल मला. त्यांत मेहेरबानी कसली ? पण तुम्ही हे धारून चालू नका हं ! मी आपला एक संभव सांगितला. आणि जमून यायला फारशी हरकत दिसत नाही म्हणून बोललो तुमच्याशी.'

'मग बघा जरा. हं ?'

'अरे जरूर जरूर. बेफिक्र राहा तुम्ही.'

भाऊभटाने हे आमीष लावल्यावर आमच्या डोळ्यांसमोर रोहटांग घाटी दिसू लागली. त्याला आम्ही बोलूनही दाखविली ती.

'असं बघा लालाजी ! उद्या आणि परवा दोन दिवस जातील आमचे मणीकरणला. आणि आल्यावर म्हणजे आजपासून चौथ्या दिवशी आम्ही, आम्हाला जर जीप मिळाली तर बडी फजल इथून निघू. नग्गरला जाऊ. तिथून रोहटांगला जाऊन येऊ. आणि येताना रात्रीपर्यंत जीपवाल्याने आम्हाला मनालीला सोडावं आणि मग खुशाल आपला रस्ता धरावा. शंभर मैलाच्या बाहेर नाही जाणा। सगळं मोजलं तरी.'

'जरा धीरे धीरे !'

'आपण म्हणाल तसं आणि भाडं पण तुम्ही ठरवाल ते देऊ.'

'ठीक आहे. ठीक आहे ! माझ्याकडून कसूर होणार नाही. खात्री बाळगा.'

स्थानिक उत्सवी वातावरणाचे उधाण अद्याप ओसरले नव्हते. आम्हाला त्याचे झाले ते केवळ ओझरते दर्शन. तरीहि हे शेपूट संपूर्ण उत्सवाची झलक दाखविण्यास पुरेसे होते. आजच्या शेवटच्या दिवशीसुद्धा म्हातारे तरणे बनून नि म्हाताऱ्या तरण्या बनून नाचत होत्या. भजनी दिंडीतील एका सुरकुतलेल्या आजीने माझ्या पांढरे केस डोकावणाऱ्या हनुवटीला हात लावून 'वधू बेटा' म्हणत माझ्या हातावर प्रसाद ठेवला तेव्हा तर तिच्या उत्साहाचा मला हेवा वाटू लागला. अजीचा चेहरा सुरकुतलेला असला तरी रेखीव होता. तिच्या काळ्याभोर डोळ्यांमुळे माझ्या तो चांगला लक्षात राहिला आहे.

या धालपूर मैदानाजवळच्या वस्तीस म्हणतात मुलतानपूर. मूळ गाव इथून दीड मैलावर आहे. त्याचे नाव आखाडा बाजार. म्हणजे हे मैदान धालपूर, सुलतानपूर आणि आखाडा बाजार मिळून झाले आहे कुलू गाव. अलिकडेच कुलू हा पंजाबातला निराळा जिल्हा बनविला आहे.

संध्याकाळी आखाडा बाजाराकडे एक फेरी टाकून यायचे ठरविले. तिथल्या स्टेट बँकेचा व्यवस्थापक सोबती भेटला. या 'रानांत' येऊन पडला होता. मुले सिमल्यास शिकत होती. इथे जिल्ह्याचे ठिकाण असून त्यांच्या शिक्षणाची सोय नव्हती. त्याच पगारावर परंतु खालच्या हुद्द्यावर सुद्धा मोठ्या शहरी जायला तो तयार आहे.

आखाडा बाजार वरी बाजारपेठ आहे. पूर्वापार व्यापाराचे ठिकाण आहे. गाव स्वच्छ वाटले. परंतु त्याचे कारण मात्र 'वियास दर्या'. पूर्वापार नदीकाठीच गावे वसत आली आहेत. वाहत्या नदीची पाण्याची सोय दुहेरी असते. पिण्याच्या आणि वापरण्याच्या पाण्याचा सुकाळ तर खराच. परंतु बिचारी जी कोण 'मैय्या' असेल ती आपल्या लेकरांची उत्सर्जिते, नी उच्छिष्टे अव्याहत साफ करीत असते.

ऐन उत्सवात आम्ही नसलो तरी गप्पा मारता मारता उत्सवाच्या हकिगती समजतच होत्या. अशी काही चतुर माणसे असतात (असे म्हणतात) की त्यांना नुसत्या निरीक्षणाने सारे काही समजते. माझ्यासारख्या सामान्य माणसाला मात्र गप्पा उकरून काढून समोरच्या माणसाला सोसतील तसतशा त्या हाणीत राहून माहिती मिळविण्याशिवाय दुसरा मार्ग दिसत नाही.

बँक व्यवस्थापक आम्हाला स्वतः सांगत होताच. शिवाय बाजारांतील ओळखीच्या व्यापाऱ्यांकडे त्याच्याबरोबर आम्ही टेकत होतो. आम्ही मुंबईचे म्हटल्यावर ती मंडळी आम्हाला मुंबईच्या उलाढालींबद्दल विचारीत होती व आपल्या गावची हकीगत सांगत होती. आम्हीही त्यांना थापा वाटणार नाही अशा बेताने मुंबईच्या व्यापारी उलाढालीच्या प्रचंडपणाची कल्पना देत होतो.

भारताच्या या कोपऱ्यांतसुद्धा यात्रा-उत्सवाचे स्वरूप भारताच्या इतर भागांशी पूर्णपणे मिळते जुळतेच आहे. उत्सवाच्या मुख्य दिवशी छबिना-पालखी निघते. मग एक चमत्कार होतो. पालखी जोराने डचमळू लागते. देव रागावल्याचे हे चिन्ह समजले जाते, मुखोपाध्याय प्रार्थना करून देवाला शांत करतो. पालखीचा हिंदोळा स्थिर होतो. मुखोपाध्याय मग स्वतः घुमू लागतो. थैमान सुरू होते. सामुहिक पापांचा तो उच्चार करतो. मग लोक उःशाप मागतात. त्याचे परिमार्जन कसे करावे ते देव सांगतो. कोकणांतल्या मंडळीप्रमाणे त्या नंतर 'देवा म्हाराजा'

म्हणून वैयक्तिक गाऱ्हाणी घातली जातात. त्यावरचे उतारे सांगितले जातात. आणि मग कार्यक्रम संपतो. आपल्या गांवाकडे यांच्यापेक्षा निराळे काय असते?

आम्हाला यायला उशीर झाला आहे हे पुन्हा पुन्हां प्रत्येकजण सांगून आमचा मूर्खपणा आमच्या पदरी बांधतो. तरी सुद्धा आम्हांला जरासुद्धा पश्चात्ताप होत नाही. जे पाहातो आहोत 'तो हि नसे थोडके' असेच वाटत असते. कारण प्रत्येक ऋतूचे आपापले वैशिष्ट्य असतेच ना?

वसंताशिवाय फुलांचा बहर दिसणार नाही. ऑगस्ट - सप्टेंबरशिवाय फळांचा हंगाम साधणार नाही. आणि डिसेंबर - जानेवारीत आल्याशिवाय तुम्ही बर्फाने वेढले जाणार नाहीत.

ऐन मार्च-एप्रिलमध्ये आपल्याकडे जसे पळस गांवच्या शिवारात आणि डोंगराडोंगरावर खदिरांगारासारख्या फुलांनी लकाकत असतात, तसे या कुलू कांगडात सदापाणी वृक्ष खदिरांगारासारख्या रंगाचा झळाळणारा फुलोरा धारण करून भटक्याचे लक्ष वेधून घेत असतात. कर्णटोपासारखी परंतु विविध रंगाची ऱ्होडोडेन्ड्रेनची फुले सबंध खोऱ्यात आणि विशेषतः रोहटांग घाटीवरील वनस्पति दुर्मिळ उंचीवरील भागात बहरून आलेली असतात. परंतु या ऋतूंत यायला सवड नसते आपणाला.

ऑगस्ट - सप्टेंबर, हा शरदाचा पूर्वार्ध. इकडे यायला आदर्शवत्. पण यायचं ठरता ठरता हा फळाचा ऐन हंगामहि आम्ही हुकविला. आणि आलो आहोत या फळांच्या सरत्या हंगामात. हिमवर्षावाला पहाडात सुरुवात झाली असली तरी खाली सोसवेल इतपतच थंडी आहे. सरती फळे आणि किंचित् हिमदर्शन हेहि कमी देखणे नाही. पाहाण्याचा बर्फ फक्त या नगाधिराजाच्या साम्राज्यातच आहे. बाकीच्या भारतात आहे तो बर्फ खाण्याचा.

मंडी ते भुंतर या दरम्यान काल आमच्या बरोबर एक चंदीगडकडील लहानसा दुकानदार होता. बरा माणूस वाटला. त्याने आग्रहपूर्वक पुन्हा पुन्हां सांगितले होते की आम्ही मणिकरणला जरूर जावे. तो मणिकरणलाच निघाला होता. हे मणिकरण भुंतरपासून सुरू होणाऱ्या पार्वती खोऱ्यात आहे. अर्धा अधिक रस्ता बस जाते. पुढे पायी जावे लागते. परंतु ठिकाण पाहिले पाहिजे असे आहे. टूरिस्ट ऑफिसरने सुद्धा आज तिकडे जाण्याची शिफारस केली. म्हणून त्याच्याकडून तिथल्या टूरिस्ट हटमध्ये राहाण्याकरता पास घेऊन ठेवला आहे.

याचा उपयोग आम्ही करणार नाही असे त्याचे भविष्यकथन आहे. परत आल्यावर आम्ही त्यास जरूर भेटावे असेहि त्याने आग्रहपूर्वक सांगितले आहे. म्हणजे हे मणिकरण आहे तरी काय! उद्या जायचे तर ठरविले आहे. गोड्या पाण्याचे गरम झरे तिथे आहेत म्हणतात.

मणिकरणला विशेष काय आहे हे न सांगता सर्वांनी त्याबाबत कुतूहल मात्र निर्माण करून ठेवले आहे. ‘ चल, तुला जम्मत दाखवितो ’ म्हणून कुणी म्हटले म्हणजे लहान मूल ती ‘ जम्मत ’ पाहायला ज्या हुरहुरीने जाते त्याच गोड अनिश्चिततेत आम्ही उद्या मणिकरणला जाणार आहोत, याला दोन दिवस लागणार आहेत. तिकडून आल्यावर ‘ भाऊभटा ’ ची जीप मिळाल्यास पाहायची.

♣ ♣

# कुलू [ टूरिस्ट कॅम्प २ ]

ऑक्टोबर २६, १९६४

आम्ही मुंबईस परतल्यावर मुंबईच्या थंडीचा (?) मोसम सुरू होणार आहे. मुंबईची थंडी हा एक मोठा विनोदाचा विषय आहे. तरीसुद्धा थंडीचे कौतुक करावे मुंबईकरांनीच. देशावर किंवा उत्तरेकडे कौतुक होतेच. पण तिथे थंडी पडते तरी. मुंबईला तिचा अभाव असला तरी कौतुक मात्र कांकणभर सरस लद्दाख मधील विमानचालक जसे कपडे घालील तितपत तरी 'स्मार्ट' कपडे मुंबईच्या स्कूटरवाल्याला हवेतच. लग्नासाठी अगर हौशीसाठी शिवलेला गरम कापडाचा सूट किंवा शेरवानी बाहेर काढायची तरी केव्हा नाही तर !

कौतुक, आपले तसेच दुसऱ्यांचेहि, करणे हा मुंबईकराचा स्वभाव आहे. स्थायीभाव आहे. राष्ट्रीय उत्सव, थोर पुरुषांच्या जयंत्या-मयंत्या, गणपती उत्सव हे काय सगळेच करतात, सामान्य माणसाचे थोर सत्कार करण्यात मुंबईचा हात अखिल भारतात (कसे व्यासपीठावरून बोलल्यासारखे वाटते, नाही ?) कुणी धरू शकणार नाही. असतात एकेका गावाची वैशिष्ट्ये ! संस्था हे पुण्याचे वैशिष्ट्य नाही का ? तसे षष्ट्यब्दिपूर्ती मुंबईला सार्वजनिकरीत्या कोणाचीहि होऊ शकते. आणि याला साठ वर्षे पूर्ण व्हावी लागतात असेहि नाही अलिकडे पलीकडे दोनचार वर्षांत धनयोगाचा मोका बघावा नि उरकून टाकावी. एकशे पासून एक हजार संस्थांच्यातर्फे (हारांची सोय केली म्हणजे) हे होऊ शकते.

याशिवाय जे. पी. (ही फक्त मुंबईचीच मक्तेदारी), एकाद्या सोसायटी-पासून पार्लमेन्टच्या निवडणुका असे किती तरी मोके सतत येत असतात. सामान्यांचे थोर सत्कार करण्याचे. निदान बारशी नि वाढदिवस तर कुठे गेले नाहीत !

मुंबईकरांच्या कौतुक्या स्वभावामुळे मला तर वाटू लागले आहे की तक्रारी, मोर्चे, मिरवणुकी हे प्रकारसुद्धा याच स्वभावविशेषाचा एक भाग आहे.

हं ! तर मुद्दा असा की मुंबईस परतल्यावर थंडीचा मोसम येणार आहे. तेव्हा मला जर कुणी विचारलं, 'कशाला गेला होतास त्या कुलूच्या गारठ्यात कुडकुडायला ?' तर त्याला मी शायराच्या भाषेत सांगेन, 'हाय कंबख्त, तूने पीहि नही.'

परंतु याशिवाय कुणी खरा शौकिन निघेलच की ! आणि असा निघाला आणि त्याने जर मला विचारले, 'का हो ! आम्ही कुठे जावे, म्हणजे आम्हाला काहीतरी पाहिल्यासारखं वाटेल ?' तर आज तरी मी त्याला मणिकरणची शिफारस करीन. काल आणि आज जे दर्शन मला घडले आहे त्याने मी आणि अण्णासुद्धा भारावून गेलो आहोत.

'*काव्येषु नाटकं रम्यं, तत्र रम्यं शकुंतला* । तत्रापिच चतुर्थोऽङ्कः तत्रच श्लोक चतुष्टयं ॥' अशी जी 'त्यातल्या त्यात' महात्म्य सांगण्याची पद्धत आहे ना, त्याच चालीवर मी सांगेन—

'जा तर मग हिमालयात ! नगाधिराजाच्या पश्चिमोत्तर भागात !

त्यातल्या पार्वती खोऱ्यात ! त्यातल्या त्यात मणिकरणला !'

कालच्या आणि आजच्या प्रवासाने, शरीर कसे अगदी आंबून गेले आहे ! परंतु मन तितकेच प्रसन्न आहे. मणिकरणाच्या दर्शनाने ते भारून गेले आहे. मणिकरणला नुसते सृष्टिवैभवच नाही. सेवाभावाचेहि एक आगळे दर्शन तिथे घडते. तिथल्यापेक्षा अधिक मातब्बर सृष्टिवैभव बहुधा मनाली-नग्गरला मिळेल. परंतु हा साक्षात्कार तिथे नाही. बाबा नारायण हरी मणीकरण या शीख सज्जन गृहस्थाला दोन मुली आहेत. यात्रींची सेवा हेच बाबाचे परमार्थ साधन आहे. बाबाची आध्यात्मिक साधना-सिद्धि किती आहे याचा मला अंदाज नाही. परंतु त्याने चालविलेले काम एकाने दुसऱ्याला सांगावे असे आहे.

ठरल्याप्रमाणे काल रोजी सुप्रभातीच धालपूर मैदानात बसच्या तळावर हजर झालो. मनालीकडून मंडीकडे जाणाऱ्या दोन गाड्या आल्या. परंतु एकहि 'सीट' त्यांत चढू शकली नाही. या रस्त्यावर आम्हाला फक्त सहा मैल भुंतरपर्यंत जायचे होते. भुंतरपासून पार्वती खोऱ्यांल अकरा मैलांवरील जारी

गावापर्यंत जीप सर्व्हिस होती. आणि पुढे आठ मैल मणिकरणपर्यंत आपलीच 'पेंदल' सर्व्हिस असावी लागते.

अखेर सकाळच्या वेळांतील शेवटची गाडी आली. आणि आम्ही गाडीत तर चढलो. आलेली बस जादा पॅसेंजरसह आधीच ठेचून भरलेली होती. त्यांत आम्ही एकूण अकरा जण चढलो. आंत एकमेकांच्या रेट्यामुळे आम्ही उभे होतो. बसचा हिसका बसल्यानंतर आम्हांला धडपडायलासुद्धां जागा नव्हती. त्या सहा मैलांना पुरा अर्धा तास लागला. कारण वाटेत 'लोडिंग' अन्लोडिंग चालूच होते. आता रिकामी झालेली जागा मिळणार अशी वेळ आली तेव्हा आमचे उतरायचे ठिकाण भुंतर आले होते!

इतरांच्याबरोबर आम्ही उतरलो. आणि बघतो तो आपली मंडळी धावत सुटली! कशाकरता ते मला समजेना. दोन पंजाबी तरुण पुढे धावत गेले, परंतु त्यांच्या मातुश्री धीरे धीरे चालत होत्या. त्यांच्या सांगण्यावरून समजले की ही धावपळ पुढील जीपगाडीच्या तिकिटांकरता होती. मीहि अण्णांना सांगून अर्थात् धावलो.

एका उघड्या पडवीत एकदां, पूर्वी केव्हांतरी 'फर्निचर' म्हणून गणल्या गेलेल्या मोडक्या मेजापाशी 'मॅनिजरसाब' बसले होते. त्यांनी सांगितले, गाडी अद्याप जारीहून यायची आहे. ती आल्यावर तिकिटे मिळतील. यथासांग विधी पार पडल्यावर तिकिटे ज्यांना जेवढी पाहिजे होती तेव्हढी मिळाली. ती घेऊन आम्ही दोघे गाडीकडे गेलो. मग मला त्या धावपळीचा खरा अर्थ समजला. तिकिटे काढणारे आम्ही आठच जण होतो. गाडी जवळ आल्यावर बघतो तो गाडी आधीच ठेचून भरलेली होती. बसायला जागा कुठे नव्हतीच, परंतु धरून उभे राहायलाहि जागा नव्हती.

ही बस म्हणजे जीपला जोडलेला एक उघडा हौदा होता. दोन्ही बाजूंना बसण्याकरता फळ्या मारलेल्या होत्या. एकूण अकरा माणसांना बसण्याची परवानगी असलेल्या त्या गाडीत आम्ही एकूण तेवीस तिकीटवाले होतो. आम्हाला अर्थात् बसलेल्या महाभागांच्या पदस्पर्शाने पुनीत होत असलेला तळमजला टेकायला मिळाला होता. हा हौदा एकदा जागचा हालला आणि पोत्यांतल्या भांड्यांप्रमाणे दोन हिसके खाऊन आम्ही फिट्ट बसलो. बस चालू झाल्यावर एक फर्लांगभर अंतर गेली की नाही, तोच ती थांबली. सर्वांना पाय

उतारा व्हायचा हुकूम झाला. रिकामी गाडी बियासवरचा पूल ओलांडणार होती. आम्ही तेवीसजण वर - घोड्यात मिरवतात तसे पाठीमागे हात बांधून 'टॉक टॉक' बूट वाजवीत त्या लाकडी पुलावरून आमच्या हौद्याच्या मागून गेलो. पुन्हां पूर्ववत् स्थानापन्न, पुन्हा हिसके नि फिट बसण्याचा विधी झाला.

आरंभी काही वेळ नदीचा आवाज येत होता. बियास - पार्वती संगमाजवळ तो थोडा मोठा झाला. पुढे रस्ता पार्वतीचा काठ धरून धरून चढत आहे इतकी अस्पष्ट जाणीव उरली. बिजली महादेवच्या डोंगराला डावी घातल्यावर मग मात्र धुरळा आणि त्यांतून दिसणारे आकाशाचे कवडसे याशिवाय, या शिवाच्या दुनियेला आम्ही किंवा ती दुनिया आम्हांला अंतरली होती.

अण्णांना विचारले, 'कुलू खोऱ्यास देवांच्या खोऱ्यास भेट द्या, ही जाहिरात आठवते का?'

'ती जाहिरातशी काय, सगळं ब्रह्मांड आठवतंय!' अण्णा वैतागाने म्हणाले. कोणालाहि वैताग यावा अशी बिनचूक व्यवस्था होती. त्यांतून अण्णा तर उतार वयाचे.

जरा वर गेल्यावर रुखे - सूखे नि भुंडे डोंगरच दिसले. धुरळा कमी झाल्यावर 'चला! आपले काही पाहायचे असे फारसे बुडले नाही ना!' असा मुलासारखा विचार मनात येऊन त्यांतहि बरे वाटले. जरा वेळाने बस रस्त्याच्या कडेला होऊन थांबली कांही मंडळी झट्दिशी खाली उतरून आपली गठुळी संभाळीत सरळ पुढे चालू लागली. आमच्यासारख्या नवख्यास जरा वेळ लागला. पिशव्या कॅमेरा घेऊन आम्हीहि उतरलो. मंडळी बघत होती तिकडे आम्ही बघू लागलो. फार सावकाशपणे धावेतील हवा कमी होत होती. 'स्टेपण्या' दुसऱ्या गाडीत राहिल्या होत्या. मैलाच्या दगडावर जारी दोन मैलांवर दिसली. दुपारचे बारा वाजले होते. थोडीशी उंची असली तरी वैराण मुलूख होता. तो काटायला लागण्याशिवाय अन्य गती नव्हती. म्हणजे हे दोन मैल नि पुढचे आठ - दहा मैल झाले.

चालतांना बरोबर एक स्थानिक प्रौढ आमच्याबरोबर होता. त्याच्या रांगडी हिंदीत त्याने 'ये बसवाले बडे बदमाश है' या वाक्याने आमच्याशी बोलत चालायला सुरुवात केली. त्याचे एकूण म्हणणे असे की बसवाले दोन फेरे

'वहीला' दाखवून एकाच फेऱ्यांत काम उरकतात. यांतून वाचणाऱ्या पैशात चक्रधराचा भाग असतो. क्वचित तो पकडलाहि जातो. आपल्या इकडील दारू-भट्टीवाल्यासारखा. पण तो प्रकार कुणाच्या खिजगणतीतहि नसतो. प्रवाशांचे हाल होतात. पण त्यांना विचारतो कोण? ही लूटमार या देवांच्या खोऱ्यात राजरोस सतत चालू आहे. त्याचे म्हणणे चूक नसावे असेच आम्हांस वाटले. प्रत्यक्ष त्याची फळे आम्ही भोगीतच होतो.

जारी गाव डोंगरी. उंचावर. दहापाच घरांचे नि चार-पाच दुकानांचे. कोणत्याच दुकानात जेवण असे तयार नव्हते. जे पदार्थ होते ते ओंगळ दिसणारे शेवटी आम्ही आमच्या जवळचेच फराळाचे साहित्य बाहेर काढले. तिथे दूध मात्र बरे मिळाले. पुढच्या आठ मैलास आम्हास साडेतीन तास तरी लागतील असे माहितगारानी सांगितले. म्हणून पंधरावीस मिनीटांच्या विश्रांतीनंतर आम्ही उठून चालू लागलो. या भागात रेडियमचा संभाव्य साठा फार मोठा आहे. म्हणून जारीच्या आधीपासून क्वचित् पाहारेकरी राखीव पोलिसांचे तंबू आम्हास वाटोवाट आढळले.

जारी गावदरी उतरून पार्वती मैय्यापाशी आल्यावर आतापर्यंतचे दूषित नि रुक्ष वातावरण संपले आहे. पुन्हा देवाचे खोरे लागले आहे. भुंडे डोंगर संपून गर्द जंगलांतून पार्वती काठाने आमचा पायरस्ता चालत आहे. सकाळपासून अंगावर असलेल्या गरम कपड्यांचे ओझे झाले होते. आतापर्यंत त्यांची ऊब आता आवश्यक बाब झाली आहे. कुलूंतील पाच सहा माणसांचे एक कुटुंब आमच्या आगे मागेच चालत आहे. त्यांच्यापैकी बहात्तर वर्षांच्या लालाजींनी आमच्याशी दोस्ती केली आहे. बहात्तर वर्षांचा लालाजी सफरचंदा सारख्या तुकतुकीत कांतीचा, आमच्यापेक्षा दोन तीन इंच उंचच, धारदार नाकाचा तरणा-म्हातारा आहे. सुनेजवळून दोन वर्षांच्या आपल्या नातवाला खांद्यावरून आणून दोन दोन मैल सतत चालत आहे. नातू उतरून आपल्या आईकडे अगर बापाकडे गेल्यावर लालाजी आमची ओझी घेऊ पाहातो. आम्ही अर्थात ती शरमेने देत नाही. खरी म्हणजे कुणी घेतली तर आम्हाला बरेच वाटणार आहे. तो आमच्यापेक्षा किंचित सावकाश चालतोय. परंतु आतच्या-पेक्षा कमी वेळा दमून थांबत आहे. त्याच्या उत्साहाचा फार फार हेवा वाटत आहे.

आता खरं हिमालयीन (यालाच अल्पाईन म्हणतात का?) वातावरण आले आहे. पिनपार्वती घाटाकडील वीस-वीस हजार फुटी पहाड आणि त्यांच्यावरचे चंदेरी मुकुट आपल्याला बोलावीत असतात. फोडणीच्या पोह्यां-वरील ते शुभ्र किसलेले मोहाचे खोबरे आमच्या अर्धपोटी भुकेला काही उपयोगी नाही. परंतु भूक विसरायला जरूर लावीत आहे.

आता ही जी गर्द राई आली आहे ती देवदाराची आहे. एका पुराण-वृक्षावर तो एकशे ब्याएंशी वर्षाचा असल्याची पाटी लटकत आहे. शांतता इतकी नीरव आहे की आपापसात बोलण्यासहि आम्हाला संकोच वाटत आहे. उतारावरील नाजूक हिरवळीवर सूर्य किरणांनी फक्त आकर्षक खडी नि कुयऱ्या काढल्या आहेत. चंद्रकळेवर असतात तशा. सबंध आकाश या देवदारांनी पेलून धरले आहे. ते नसते तर ते आपल्या अंगावर नक्की कोसळून पडेल असे वाटत आहे.

आतापर्यंतच्या खोऱ्यांची इथे दरी झाली आहे. डोंगरांतून येणारे ओहोळ इथे पार्वतीला भेटतात. हा पाणवटा मोठा सोईस्कर ठिकाणी आहे. निम्म्या रस्त्यावर लालाजींच्या कुटुंबांतील तरुणांनी पुढे येऊन तीन धोंडे मांडून चक्क चूल पेटविली आहे. आता ही मंडळी इथे काय स्वयंपाक करणार कीं काय? नाही. वेताच्या टोपलीतून त्यानी घरून तयार करून आणलेली रोटी, तर्कारी वगैरे काढली आहे. ती फक्त गरम करून मधली वेळ साजरी करायचा त्यांचा विचार दिसतो. कल्पना छान आहे. खऱ्या खवय्यांना हे सर्व सुचते.

चष्म्याचे थंडगार पाणी पिऊन आम्ही न बसता पुढे चालू लागतो.

'पंडतजी! अरे ओ पंडतजी!' लालाजींच्या हाका ऐकू येतात. आम्हालाच हाका मारीत आहेत अशी खात्री झाल्यामुळे आम्ही थांबतो. 'ठहरिये भाई' करीत लालाजी धोतर सावरीत आमच्याजवळ पोचतात.

'कहिये, लालाजी, क्या बात है?'

'अरे! मुझे बुढेको क्या भूखा रखोगे?'

'अखिर बात क्या है? आपका खाना तो गर्म हो रहा है. भूखे क्यू रहोंगे?'

'हाँ! मगर महमान तो जा रहे है. बगैर उनके मैं खाना नही खाऊंगा.' आता लालाजींच्या म्हणण्याचा मतलब माझ्या पुरा लक्षात आलेला असतो.

'अरे ! लालाजी ! आप बडे आतिथ्यशील है. धन्यवाद आपको. मगर जारीमे हमने भरपेट खाया है. म्वाफ कीजिये ! आप बडे शौकसे खा लीजिये !'

'अब आपके सामने क्या सत्याग्रह करना पडेगा ? पक्की रसोई है ! पंडतजी ! फिक्र न कीजिये !'

हे वाक्य पुरे होते न होते तोच लालाजी अण्णांचे हात धरून त्यांना ओढू लागतो.

'अरे अरे ! लालाजी !' – अण्णांचा दुबळा प्रतिकार.

'चलिये चलिये ! उह पहुंचनेमे देर न होनी चाहिये.'

आमचा काहीच इलाज नसतो. लालाजीला 'अन्नदाता सुखी भव' अशी मनापासून शुभेच्छा मिळते. अंदर की बात अशी असते की भुकेल्याला अन्नाचे महत्त्व पुन्हा एकदा पटले होते. त्याच्या अभावी आम्ही मणिकरणाला केव्हां आणि काय अवस्थेत पोहोचलो असतो त्याची आम्हांला चांगली कल्पना आहे. फुलके, आचार नि तर्कारीची लहेजत अद्याप ताजी आहे आमच्या तोंडांत.


तासाभराची तर लालाजींची आणि आमची ओळख. आता मात्र त्यांची आठवण कायम राहणार आहे.

आता इथून कसौल एक मैल. त्याच्यापुढे मणिकरण दोन मैल. खाण्या-मुळे हुशारी नक्कीच आली आहे. तरीसुद्धा चढ जाणवू लागला आहे. चढ थेटपर्यंत थोडा फार आहेच हे माहीत आहे. पायाची तक्रार फार जोराने सुरू झाली आहे. अण्णा फारच थकले आहेत. त्यांची ही कसोटीच लागत आहे. आता वरचेवर टेकावे लागत आहे. उंचीमुळे नव्हे. थकल्यामुळे.

पावणेपांच वाजले आहेत पार्वती मैय्या एका पाय - पुलावरून पार करायची आहे. तिथे एक मजूर भेटतो. त्याला विचारताच तो सांगतो, 'हे काय मणिकरण !' एका हाकेवर पुसटशी खुज्या घरांची वस्ती दिसते. आमचा मोठा विरस होतो. हेच बघायला आपण एवढी पायपिटी करून आलो ? परंतु एवढ्याजणांची शिफारस चुकीची कशी ठरेल ? काही तरी असेलच ! तिथे गेल्यावर ते दिसेल ! मनाची काही तरी समजूत घालीत आम्ही पुढे सरकतो. आता सर्व यात्री आमच्या पुढे गेले आहेत. आम्हीच शेवटले.

खडकांतून खोदलेली पायवाट आठदहा मिनिटे एक एक पाऊल कष्टाने टाकीत तुडवितो. आणि एक वळण मारल्यावर अकस्मात् गांव पुढे उभे ठाकते.

पहिली वास्तू हीच बाबाची मठी हे कुणी सांगायला लागत नाही. खालच्या बाजूला वाफा येत असलेली गरम पाण्याची प्रशस्त कुंडे दिसतात. सहा पायऱ्या उतरून आम्ही कुंडाच्या ओसरीवर येतो. लालाजी वगैरे मंडळींच्या हातात चहाचे बम्पर्स आहेत. इतर प्रवाशांचा तोच कार्यक्रम चालू आहे. लालाजींच्या



**एका हाकेवर पायरस्त्याच्या टोकाला खुज्या घरांची वस्ती दिसते. हेंच तें मणीकरण. दिसायला सुंदर नाही पण असायला....**

सांगण्यावरून त्यांच्या सामानाशेजारी आम्ही आमच्या सामानाच्या पिशव्या ठेवतो नि हात पाय धुवायला जातो. गरम गरम पाण्याने हात पाय धुतल्यावर खूपच हुशारी वाटते. आम्ही परततो.

'दो मूर्तियाँ अभी आयी थी न! काहाँ गये?' उतार वयाची पण ताठ अंगकाठीची एक मूर्ति दोन हातात दोन चहाचे बम्पर्स घेऊन आम्हांला पाठमोरी आहे, आणि लालाजींना विचारीत आहे.

'नमस्कार बाबाजी!' न सांगता हेच ते बाबाजी म्हणून आम्ही ओळखतो.

'नमस्कार नमस्कार! चाय लीजिये.' आम्हाला नमस्कार करण्यासाठी वम्पर्स एकदा वर करून बाबाजी ते आमच्या हातीं देतात. निदान दोन दोन कप तरी चहा त्यांत असतो. इकडे सिंगल कप, डबल कप वगैरे भाषा कुणाला माहीतच नसावी.

'बाबाजी, हम ठहर सकते यहाँ ?'

'हाँ हाँ बेटे! शौकसे! आपीकी सेवाके लिये है यह सब.' सभोवती हात ओवाळीत बाबा आम्हांस निर्धास्त करतो.

चहांत गवती चहा पण होता का काय कुणास ठाऊक? पण चहा प्यायल्यावर आणखी तरतरी येते. गावाबाहेरच्या पुलावर थंडी वाजत होती.



**दोन्ही कुंडांच्या मधोमध बांधलेला सतरा वर्षांपूर्वी दिसणारा पूल. रेडियमयुक्त गरम पाण्याचे हें मणीकरण तीर्थ. पलीकडे फेसाळलेली पार्वतीमैय्या. गार ठणक पाण्याची**

आता या मठांत ती पळाली आहे. उंची तीच आहे, सहा हजार फूट, परंतु इथे आम्ही मुंबईच्यासारखे सहज, न कुडकुडता कपडे काढतो आणि कुंडांवर स्नानास जातो.

दोन्ही कुंडांच्या मधोमध इकडून तिकडे जाण्यासाठी पूल बांधला आहे. त्यावरून आम्ही पलीकडे जातो. लालाजी ओरडून सांगत असतो की फार वेळ डुंबू नका, चक्कर येईल. परंतु थकलेल्या शरीराला त्या वेताच्या गरम पाण्याच्या शेकाचा मोह सोडवत नाही. काही तरुण या दुसऱ्या कुंडांतल्या उष्णतेला शरीर सरावले म्हणजे पुलाखालच्या कमानीतून अधिक गरम पाण्याच्या कुंडांत शिरत आहेत त्या पहिल्या कुंडाच्या वर चौथऱ्यावर एक शंकराची पिंडी असलेली घुमटी आहे. त्याच्या बाजूला अंगणांत उथळ आणि लहान टाकीवजा कुंड आहे. यांत या आवारांतला उकळत्या पाण्याचा मूळ झरा आहे. तळच्या रेतींत उकळते पाणी खदखदत आहे. पाणी स्वच्छ आणि मधुर आहे. ते रेडियमयुक्त आहे म्हणतात. लहानशा पन्हळीने ते खालच्या कुंडात व तेथून दुसऱ्या कुंडात जात आहे. वर गरम पाण्याचे तीन प्रकार आणि कुसवापलीकडे दहा फुटांवरून गारठणक पाण्याची पार्वतीची फेसाळत वाहाणारी धार! हा चमत्कार नसला तरी या गुण - वैधर्म्याचे कौतुक वाटत आहे. काही झरे नदीच्या पात्रांतसुद्धा आहेत.

स्नानानंतर शारीरिक थकवा नाहीसा होतो. तरीपण चक्करल्यासारखे होतेच आहे. पार्वतीमैय्याच्या गार पाण्यावरून मधूनच एखादी थंडगार झलक अंगावर येत आहे. तर आता आम्ही बसलो आहोत - खरे म्हणजे आडवारलो आहोत. ही चुनेगच्ची जमीन सुखद गरम आहे. चांगले अंग शेकून निघत आहे. सबंध ओसरीभर हा सामुहिक अंग शेकवण्याचा प्रयोग चालू आहे. या दरींत दुपारच्यानंतर ऊन आम्हाला दिसत नाही. तरीपण आता ही दिवस मावळायची वेळ झाली असावी. अंग शेकत शेकत आम्हाला झोपसुद्धा लागायला येते. इतक्यांत लालाजींची चाहूल लागते.

'कुछ सेवा करोगे, पंडतजी ?' – लालाजी.

'कैसी सेवा ?'

'यही ! आलूके मटरके छिलके निकालना. आप बडे सेवाभावी हैं.'– आता सेवाभावी हा नसता गुण माझ्या अंगी लालाजींनी चिकटवल्यावर मला

काय नाही म्हणता येतंय ! तसे लालाजी मोठे धूर्त आहेत. मी उठतो आणि झक्कत बटाटे सोलायला बसतो. मंडीहून भुंतरपर्यंत आमच्याबरोबर असलेला चंदीगडचा लालाजी आमच्याबरोबर सेवेला आहे. मधून मधून चार दिवस सेवा करायला तो इथे येतो.

काम करणाराला दिवसाचे चोवीस तास इथे पुरणार नाहीत. परंतु सक्ती कुणावरच नाही. न करणाराला तू अमुक कर म्हणून कुणी म्हणणार नाही. त्याने खुशाल यावे, दोन वेळा आपल्यासारख्याच इतर चाळीस-पन्नास (क्वचित् शे - पाउणशे) सहप्रवाशांबरोबर पुख्खा झोडावा, दोन वेळा बम्पर बम्पर चहा प्यावा, लहर येईल तेव्हा गरम पाण्याच्या कुंडात डुंबावे, बाबांनी दिलेले कांबळे पांघरून रात्री डाराडूर झोप काढावी, सकाळी उठून पुन्हा चहा घ्यावा, बाबाना वाटल्यास नमस्कार ठोकावा नि चालू लागावे. देण्याघेण्याचा प्रश्नच नाही. कोणी काही विचारणार नाही. सर्वांनाच बाबा हसत निरोप देतात. असे हे मुक्तद्वार आहे.

बाबांच्या वास्तूत शिरताना डाव्या हाताला रस्त्याला लागूनच एक हॉल सहकुटुंब यात्रीसाठी जरा बंदोबस्ताने बांधलेला. त्याच्याखाली एकाखाली एक अशा अंगणाकडे उतरत्या दोन खोल्या. हे सर्व जवळ जवळ दगडात खोदलेल्या गुहांच्या स्वरूपाचे आहे. कांबळी मिळालेली सडी मंडळी कुंडांच्या ओसऱ्यावरून झोपतात.

बाबांच्या मुक्तद्वारांत भोजन साधे पण रुचकर आहे. भात, चपाती, डाळ, उसळ नि चटणी. यात्री भोजनावर आडवा हात मारतात. एक एक पंजाबी सात-आठ चपात्या खात आहे तर आम्हाला दुसरीहि घशाखाली घालवत नाही. जेवताना चवीला या पार्वती खोऱ्यातील दंतकथा चालू असतात. त्यात कांही बाबांच्याहि आहेत. एकूण पन्नास तरी पान जेवून उठले आहे.

आम्ही ज्या खोलीत झोपलो तिथे अंथरुणा पांघरुणाची जरुरी नाही. जमिनीवर फक्त एक तरट अंथरलेले आहे. जवळची शाल आम्ही उशाला घेतली आहे. लालाजी माझ्या बाजूलाच पडले आहेत, कोपऱ्यात एक पणती-सारखा दिवा आहे. बाहेर बिजलीचे झगझगीत दिवे आहेत. आमच्या खालची जमीन सुखद उन्ह उन्ह आहे. या रेडियमयुक्त पाण्याच्या स्नानाने व जमिनीच्या शेकाने कैक आधी-व्याधी नाहीशा होतात म्हणतात.

कांबळ्याचे वाटप व इतर कामांचा उरक पार पाडून बाबा आमच्याशी गप्पा मारायला येतात. आल्यापासून बसलेले असे मी त्यांना प्रथमच पाहात होतो. बाबांची बोली हिंदी पंजाबीचे मिश्रण आहे. वाणी मिठास आहे.

'बाबाजी ! खरोखरीच या उकळत्या पाण्यावर स्वयंपाक करता येतो का हो ?' मला त्याबद्दल मोठी उत्सुकता आहे जाणण्याची. गंधकाच्या वासाचे गरम झरे माझ्या पाहण्यात आहेत. परंतु मधुर पाण्याचा असा हा पहिलाच.

'हाँ हाँ, बेटा ! चपात्याशिवाय सगळाच स्वयंपाक करतो ना आम्ही त्याच पाण्यावर !' – बाबा.

'आणि चपात्यांची व्यवस्था काय करता ?'

'माझी बेटी तव्यावर भाजते रोट्या. इतर मंडळी असली की तीहि मदत करतात.'

'पण रोट्यासुद्धा या पाण्यात होतात म्हणता !'

'होतात, होतात ! पण याची चव सगळ्यांना आवडणार नाही बेटा, म्हणून तव्यावर भाजतो.'

'त्या पाण्यात भाजायच्या म्हणजे काय करायचे ?'

'पुरीसारखी रोटी लाटायची आणि तळणी मधल्या तुपात पुरी सोडतात ना ? तशी पाण्यात सोडून द्यायची.'

'पाण्यात बुडत नाही ?'

'बुडते ना ! पण पुन्हा फुलून वर येते. अरे ग्यान् !'

बाबा काय सांगणार हे त्यांच्या मदतनिसाने ओळखून तो एक वाडगा बाबांच्या पुढे धरतो.

'ह्याच त्या ओल्या रोट्या काय ?'

'चव तर बघा.' असे म्हणत बाबाने आमच्या सर्वांच्या हातावर एक एक तुकडा ठेवला. नागपंचमीला उकडलेली दिंडें आमच्याकडे करतात ना ? तशा लागत आहेत या.

'जास्त वेळ लागतो का हो ?'

'कशाचा आलाय वेळ ? टोकरीभर बटाटे किती वेळात शिजले ते बघितलंत ना ? भात तर यूं हो जाता है.' इथे बाबाजींनी एक चुटकी वाजविली.

पाण्याचे तपमान उत्कलन बिंदूपेक्षा जास्त असलं पाहिजे.'

'बहोऽत ज्यादा ! भगवानकी माया आहे ही बेटा. इथं काय कमी पडणार आहे ? खीरगंगेला तर इससे भी ज्यादा.'

'खीरगंगा ?'

'हाँ ! खीरगंगा है यहासे पूरे एक दिनकी यात्रापर. परंतु तिथे भगवंताची माया अजायब आहे. तिथे एक साधू आहे. पण तो माझ्यासारखा दुनियादारीत नाही पडला. आज कैक वर्षे त्याची साधना चालू आहे. अशा साधकाला उदरंभरणासाठी भगवंतानं कुदरती साधनं ठेवली आहेत. तिथल्या रानांत आपोआप उगवणारं देवभात भेटतं. जंगलगोभी मिळते. कंद मिळतात. खारट, आंबट वगैरे चवीची झाडपानं मिळतात. बकरीचं, क्वचित गाईचं दूध मिळतं. साधकाला आणखी दुसऱ्या कशाची अपेक्षा असणार ?'

'आणि उकळत्या पाण्याचे झरे ?'

'अरे ते तर इथल्यासारखेच आहेत.बडा पोहचलेला बाबा आहे तो !'

'पण बाबा ! तुम्ही इथे जो अखंड यज्ञ चालवलाय हा, हे फार मोठं पुण्यकृत्य आहे. त्या बाबापेक्षा मोठं पुण्य या बाबांच्या खाती जमा होत असलं पाहिजे.'

'अरे अरे ! असं नये बोलू. तो बाबा मोठा सिद्ध पुरुष आहे.'

'असेल असेल ! त्यांची साधना-सिद्धी मोठी असेल. परंतु ती आम्हाला समजत नाही.तुमची ही लोकाभिमुख साधना इथे येणाऱ्या प्रत्येकाला मदतरूप होते. म्हणून ती जाणवते.'

'आपण काय समजायचं असेल ते समजा. पण माझं काम, आहे यापेक्षा मोठं व्हायला हवं एवढीच चिंता मी करतो. ते जाऊ द्या ! परंतु तुम्ही खीरगंगेला जरूर जाऊन या.'

खीरगंगेला जाऊन येण्याबद्दल आता आम्हालाहि चुटपूट लागून राहिली आहे. पण जाऊन यायला तीन दिवस तरी हवेत. ते आमच्यापाशी नाहीत. त्या तयारीन आम्ही आलो नसल्यामुळे कपडे, पांघरुणे वगैरे घेतलेली नाहीत. सर्वांत महत्वाची गोष्ट म्हणजे पुढे एवढे चालत जाण्याची आमची उमेद नाही.

पुन्हा केव्हा तरी इथे येऊ तेव्हा जरूर जाऊ म्हणून बाबाला कोरडे आश्वा-

सन आम्ही देतो व आता माफ करण्याविषयी विनवितो. आमची कमजोरी ओळखून बाबाही सांगतो, ' बरं बरं ! पुन्हा याल ना, तेव्हा घोडं घेऊन या म्हणजे नक्की जाणं होईल. '

खीरगंगेला आज जी अवस्था यात्रींची होत असेल तीच दहा बारा वर्षांपूर्वी इथे होती. बाबाचे हे मुक्तद्वार केवळ जनाधारावर चालते. काही मदत आपोआप मिळते. ती ( धान्य वगैरे ) जारीला येते. तिथून इथे आणण्याची व्यवस्था मग बाबा करतो; काही वेळा पुरवठा आघाडीवर आणीबाणीची परिस्थिती उद्भवते. बाबाची धावाधाव होते. पण बाबा बाणी संभाळतो. या वयात सुद्धा बाबाचा खांदा तसा मजबूत आहे. त्याने सगळे पेलले आहे. जनताभिमुख बाबा माणसामाणसांत भेदभाव मानीत नाही.

या मणिकरण नावाबद्दल एक पौराणिक आख्यायिका आहे. उमा-महेश हे ' भटके युगुल ' या खोऱ्यांतून फिरत असताना उमेच्या अलंकारांतील एक मणी इथे पडतो. पाताळातील शेषनागाला चावटपणाची लहर येते. पडल्या-बरोबर तो, तो मणी पळवून पाताळांत नेतो. पार्वती ही जगन्माता असली तरी ती तुमची आमची. शंकराची ती पत्नी, बायको. इतर बायका आपल्या नवऱ्याशी जशा वागतात तशी ती त्याच्याशी वागणार. 'ते काही नाही ! माझा मणी मला आत्तांच्या आत्ता पाहिजे. ' म्हणून आपल्या नवऱ्यापाशी ती हट्ट धरते. स्त्रीहट्टा पुढे काही इलाज असतो ? बिचारे शंकरजी ! तो मणि परत मिळविण्याच्या उद्योगाला लागतात. नटराजाचे तांडव सुरू होते. दमदार पदन्यासाने पृथ्वी कंपायमान होते. शेषाला पृथ्वीचा डोलारा डोक्यावर सांभाळणे कठीण जाते. बिचारा शरण येतो महादेवाला, आणि पाण्याच्या धारेबरोबर मणी पृथ्वीवर पाठवून देतो. भूगर्भातील पाणी ते ! उकळतेच असणार. तेच हे गरम झरे.

महेश्वराने बहुधा कित्येक वर्षे जाम पावती पाठविलीच नसावी. म्हणून १९०५ च्या भूकंपापर्यंत या क्षेत्रात असे मणी मधून मधून या गरम झऱ्यांतून येतच राहिले. भूकंपाने शेषाला पावती पोचविली आणि तेव्हापासून हे मणी येण्याचे बंद झाले असावे.

कसल्या तरी खनिज पदार्थाच्या गोळ्या येथील रघुनाथजीच्या मंदिरा-तील पुजारी अद्यापहि दाखवितो म्हणतात. देवळाच्या मागे असलेल्या मोठ्या

गरम झऱ्यांतून वर आलेलेच हे मणी. १९०५ च्या भूकंपापूर्वी. असे हे पौराणिक कालापासून वाजत गाजत असलेले मणिकरण क्षेत्र बाबाने जागते आणि पवित्र राखले आहे.

खरे म्हणजे इथे एक दिवस तरी मुक्काम व्हायला हवा होता. परंतु आमच्याजवळ दिवस शिल्लक नाही.

आम्ही मुंबईचे म्हणजे चहाबाज असे ओळखून पहिला चहा सूर्योदयाबरोबर झाल्यावर तासा - दीडतासाने बाबा आम्हांला पुन्हा चहा देतो. प्रसन्न वातावरण आणखीच प्रसन्न होते. बाबाला आदरपूर्वक नमस्कार करून बाबाचा आम्ही आशिर्वाद घेतो. निघताना अण्णा बाबाच्या हाती एक पाच रुपयांची नोट ठेवतात. ती कितीची आहे हे न बघता धर्मादाय पेटीप्रमाणे बाबा ती कोपरीच्या खिशांत कोंबतो.

निरोपाच्या शेवटी नमस्कार करताना बाबा पुन्हा एकदा खीरगंगेकरता येण्याची अठवण देतो. आणि सांगतो की तुम्ही याल तो पर्यंत या पुलापर्यंत जीप यायला लागलेली असेल.

♣ ♣

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. 23769
ग्रंथ शाखा (स्थळ

# कुलू [ टूरिस्ट बंगला २ ]

## ऑक्टोबर २७, १९६४

**माणसाला** थोडे फार काही होत असले आणि आज जसे मला पडून राहवला लागले आहे, तसे पडल्या पडल्या माणूस जे काही करतो त्यालाच बहुधा मनन आणि चिंतन म्हणतात. विनोबा, नेहरू .... पण कशाला ही मोठी नावे घ्या उगाच ! बायका मुलांचे चिंतन नि आजची नग्गरची सहल हुकल्याचे मनन केले म्हणजे मी काय चिंतक थोडाच होणार आहे ? विश्वाची चिंता करतो त्याला चिंतक म्हणायचे !

तसा चिंतक व्हायचा मीसुद्धा आज प्रयत्न केला. भारताचे पुढे कसे होईल याचा विचार केला. परंतु काय व्हायला हवे आहे तेच मला माहीत नसल्यामुळे कसे होईल ही चिंताच मला लागेना. आंतरराष्ट्रीय तणातणी कशी कमी होईल याचा विचार करू लागलो. पण मग विचार असा आला की, आपला मुलगा व त्याच्यापेक्षा दोनच वर्षांनी वडील असलेली मुलगी यांच्यातली तणातणी नाही आपल्याला कमी करता येत ! तर जगातली तणातणी कमी करण्याचा मी काय उपाय शोधून काढणार ! कुणी कुणाची खोडी काढायची नाही हा उपाय मी मुलांना सुचवितो. पण त्यांच्या काही ते गळी उतरत नाही. तणातणी करणाऱ्या राष्ट्रांनासुद्धा या पेक्षा दुसरा कोणता उपाय मी सुचविणार !

भारताने अणुबाँब बनवावा किंवा नाही वगैरे वगैरे अखिल मानव जातीच्या भवितव्याबद्दलचे विचारसुद्धा मला ( वर्तमानपत्रांत वाचल्यावरून ) सुचले. म्हणजे आठवले. तीच तीच अक्षरे ( वर्तमानपत्रात वाचलेली ) पुन्हा पुन्हा दिसत. तीहि पांढऱ्या ढगांसारखी विरून जात. मग मला आमच्या

आजीचा शद्बप्रयोग आठवला. 'मातीचे चिकटविलेले कुल्ले.' आणि माझ्या लक्षांत आले की आपण काही चिंतक होऊ शकत नाही. मनन मात्र करता येते वाचलेल्या, पाहिलेल्या, अनुभविलेल्या गोष्टींचे.

काल-परवा मी जितका चढलो, चाललो, तितकेच अण्णा चढले, चालले होते. माझ्यापेक्षा त्यांची दमछाक झाली होती. आणि ते साहजिक होते. परंतु रात्रीच्या झोपेनंतर ते ताजेतवाने झाले होते. आणि मला थोडासा ताप आला होता. म्हणजे अण्णांना म्हातारा (मनातल्या मनात) म्हणता म्हणता मीच म्हातारा ठरलो होतो. सकाळी त्यांनी मला चक्क चापलेच.

'....समजलं समजलं! तुम्ही आज नुसतं पडून राहायचं. स्नानाच्या आज गोळ्या घ्यायच्या हं! नाहीतर जाल हुशारी वाटते म्हणून स्नान करायला. तुमच्या अंगात ताप आहे तो पर्यंत तुम्ही पुढारी नाही. मी पुढारी. आलं लक्षात?' –अण्णा.

'तसं पुढारीपण आपल्यापैकी कुणालाच जमलं नाही. ते जाऊ द्याहो! पण अण्णा थोडासा ताप असला तरी नग्गरला यायला हरकत नाही मला. कन्याकुमारीला तर....'

'कन्याकुमारीपासून कश्मीरपर्यंतचे तुमचे तापातील पराक्रम मला माहीत आहेत तरी पण तेव्हाची गोष्ट निराळी होती. आता काही तुम्ही तरुण नाही.'

'तरी पण अण्णा, माझ्या अंगात विशेषसा ताप नसावा.'

'थोडासा तरी आहे ना! तोच जास्त होऊ नये म्हणून जपायला नको का? काल तुम्हाला जेवण गेलं नाही. आज दुपारी इच्छा असल्यास थोडासा, नुसता भात जेवा. संध्याकाळी मी तुम्हाला भरपूर दूध आणून देतो ते घ्या. उद्याला तुम्ही मोकळे व्हाल. पुढच्या कार्यक्रमाकरता तरी तुम्ही मोकळं व्हायला हवं.' लहान मुलासारखे अण्णा मला समजावीत होते.

'ठीक आहे. सगळं कबूल तुम्ही म्हणता ते. आज बाहेर कुठं जाणार नाही. तुम्ही म्हणता तसं सगळं तंतोतंत मी पाळीन. परतु तुम्ही एकटे नग्गरला का जाऊन येत नाही? नग्गर हे एक 'मस्टर' पैकी ठिकाण आहे. तुम्ही खुश्शाल जाऊन या ना!'

## १० : पहाड, पाणी आणि परी

'अहो ! माझा तरी उत्साह कुठे एवढा उतू चाललाय ! मला पण एक दिवस विश्रांती मिळेल अनायासं. मनालीला तर आपण जाणार आहोतच ना ? मग सगळयाच ठिकाणी जायचा अट्टाहास कशाला हवा ? तेहि उत्कृष्ट ठिकाण आहेच ना ?'

'जाऊन या हो तुम्ही !'

'जाऊद्या हो तुम्ही !'

अण्णांच्या मनात ते म्हणाले त्याप्रमाणे फारसा उत्साह नसेल, किंवा मला एकट्याला सोडून त्यांच्याच्याने जाववले नसेल. ते गेले नाहीत खरे. आणि एकूण नग्गर आमचे हुकले आहे. काश्मीरांत मागे अमरनाथ असाच हुकला होता नेहमी काहीतरी हुकत राह्यलाच हवे. सतत सर्वच मनाप्रमाणे घडत गेले तर माणूस आपली जागा विसरेल. विश्वाच्या या अवाढव्य पसाऱ्यातील आपले एका क्षुद्र कणाचे स्थान विसरेल आणि परिणामी दुःखी मात्र होईल.

आमच्या 'भाऊभटा' ची जीप आम्हाला कधी मिळेल असे आता आम्हास वाटतच नाही. जीपच्या चालकास आणखी दोन दिवसात पंजाबात कारखान्याच्या गावी जाण्याची आज्ञा झालेली आहे. तेव्हा जायच्या आधी दोन दिवसात चोरटे भाडे करुन जितके जास्त पैसे मिळवता येणे शक्य आहे तितके तो मिळविणार आहे. आम्हीहि भाडे द्यायला राजी आहोत परंतु 'भाऊभटा च्या नकळत ते साधणार नाही. म्हणून 'भाऊभटा' च्या देखत तो आम्हाला नाना सबबी सांगतो आहे. 'भाऊभटा' ला त्याचेच आता वाईट वाटत आहे. त्याचा नाईलाज झाला आहे. जीपवाला त्याला एकट्याला कुठे मधूनच चार सहा मैलांवर सोडायचे आणायचे काम करतो आहे तरी पण त्याच्या हुकमतीत तो नाही. म्हणूनच आमचे घोडे पेंड खातेय, नि भाऊभट खंत करतोय !

बसने नग्गरला जायला मिळाले असते तरी तो धावता दौरा झाला असता पुढाऱ्यासारखा. नीटपणे बघायचे म्हटले तर आठ एक दिवस तरी हवे होते. या आठ दिवसात सुद्धा चंदरखानी आणि जवळपासची आणखी काही सौंदर्यस्थळे पाहू शकलो असतो. आणि मलानासारखे वैशिष्ठ्यपूर्ण खेडे पाह्यचे राहूनच गेले असते.

हे खेडे दुर्गम आहे. आणि त्याच्याबद्दल काही वैशिष्ट्ये कळल्यापासून हे गाव आहे तरी कसे ते समक्ष पाहण्याची माझी इच्छा होती या खेड्यात राज्य म्हणजे हुकूमत कोणाचीच नाही. जम्लू या ग्रामदेवतेचे तिथे राज्य आहे. आळतेकरांच्या संशोधनातले शेकडो वर्षांपूर्वीचे दक्षिणेतील अग्रहार गाव स्वप्नवत् वाटे. विनोबांच्या ग्रामदानी गावापेक्षाहि निराळी अशी ही अग्रहार गावे होती. सर्व थरातले ग्रामस्थ गावगाडा चालवीत असत. ग्रामदेवतेच्या नावाने. या मलाना गावाचे तसेच आहे. जम्लू या ग्रामदेवतेलाच इथली प्रजा करभार देते. तो पैसा ग्रामदेवतेच्या जामदारखान्यांत जमा होतो. मुख्य पुजारी हा ग्रामदेवतेचा प्रतिनिधी. गावातल्या सार्वजनिक कामाला गावकऱ्यांच्या सल्ल्याने तो याच जामदारखान्यांतील द्रव्य त्यांच्या समक्ष काढून आणून खर्च करतो. क्वचित् गावात पाहुणा आला तर त्याचे आदरातिथ्य उत्तम केले जाते. वैयक्तिक मालकीची जमीन इथे नाही. गावकरी करीत असलेली शेतीभाती ग्रामदेवतेची आहे.

अग्रहार गावे किंवा अलिकडील विकसित ग्रामदानी गावे आणि हे मलाना गाव यात फरक इतकाच - तो अर्थात सर्वांत महत्त्वाचा आहे - की, गावकरी हे जे सामूहिक जीवन जगत आहेत ते परंपरागत रूढीमुळे. सामूहिक जीवनाची समाजव्यवस्था जाणीवपूर्वक स्वीकारून नव्हे.

रस्ता दुर्गम म्हणून बाह्य जगाशी याचा संबंध फारसा नाही. कसल्यातरी सुगंधी वनस्पती इथे मिळतात. गावकरी त्या गोळा करून दलालाला विकतात. एवढाच याचा बाह्य जगाशी संबंध. ग्रामशासनाचा एक नमुना पाह्यचे आमचे हुकले होते.

मोहेंजोदडो, हडाप्पा या हजारो वर्षांपूर्वीच्या भारतीय नगरांचे नमुने राहाणीमान वगैरे संस्कृतीची बाह्यांगे आपण ज्या उत्सुकतेने आणि ज्या कुतूहलाने बघू तितक्या किंबहुना त्यापेक्षा जास्त उत्सुकतेने मी हे गाव न्याहाळले असते. मोहेंजोदडो अगर हडाप्पा इथे पुरातन संस्कृतीची केवळ बाह्यांगे पाहायला मिळतील. पण इथे या गावात त्या संस्कृतीचे अंतरंग, माणसाचे मन, पाहायला मिळाले असते. ममीज पाहणे निराळे आणि तोच माणूस सचेतन पाहाणे निराळे. ही महत्वाची संधी हुकली होती.

♣ ♣

# म ना ली ( टूरिस्ट रेस्ट कॅम्प )

## ऑक्टोबर, २८, १९६४

'खाना रक्खा हैं साब ! जल्द लीजिये. नही तो ठंडा हो जाएगा.' चौकीदार जेवणाचे पदार्थ व ताटल्या वगैरे सामान शेजारच्या खोलीत मांडून ठेवून आम्हांला सांगायला येतो.

'अरे बेतसिंग ! देखो. इधर इलेक्ट्रिक हीटर कहीं नही मिलेगा ?' वाढल्या थंडीची आता चिंता वाटू लागते. जेवणापेक्षा ( ते तर पदरांत पडल्यासारखेच होते. ) शीत निवारणाचे महत्व आता मोठे होते.

'इधर तो नहीं है जी. गावमे शायद किरायेसे मिलेंगी, कल देखूंगा साब.'

'आच्छा आच्छा ! कल जरूर देखना भला ! और देखो चंद मिनटमे गर्म गर्म फुलके लाना.'

'जी साब !'

इथे जेवण गार व्हायला काही मिनिटे सुद्धा लागत नाहीत. जेवता-जेवता ते गार होतेय. पारा शून्याच्या आसपास आहे. जेवढे म्हणून गरम कपडे अंगावर चढविणे शक्य आहे तेव्हढे चढविले आहेतच. आता जेवणानंतर थंडी जास्तच वाजते किंवा काय कुणास ठाऊक. आता निजतांना गरम पांघरुणे आमची आहेत ती आम्ही घेणारच आहोत. परंतु इष्ट मित्रां-साठी ज्या शाली सामानांत आहेत त्याहि आमच्य. पांघरुणांना जोडून ठेवल्या आहेत. शिवाय झोपायच्या खोलीतला दिवा रात्रभर जळता ठेवणार आहोत. लहानसा हीटरच तो. तेव्हढीच उष्णता राहील. या प्रवासांत थंडीचा एवढा झपाटा कुठे अनुभवला नाही. नऊ वर्षांपूर्वी तेरा हजार फुटावरील बावजनच्या झोपडीतील ती रात्र मला आठवते आहे आता.

आजची तिथी पंचमी - षष्ठी असावी. अकरा वाजायला आले. अद्याप निशीनाथाची चाहूल नाही. कुठल्यातरी टेकडी वरून आमच्यापर्यंत पोचायला त्याला थोडा वेळ लागणार आहे. त्यादिवशी शंकर टेकडीवर स्वारी आमच्याकडे टक लावून बसली होती. पण आमचेच आधी तिकडे लक्ष नव्हते. चक्रने-मिक्रमेण एकेकाची पाळी येते. आज त्याची वाट पाहण्याची पाळी आमची होती. वाट पाहावी लागली तरी आम्ही बसणार आहोत. लहानपणी काचेला काजळ लावून सूर्यग्रहण पाहाण्याकरता ताटकळत बसत असू तसे. किंवा गावकरी नेहरूंच्या गाडीची वाट पाहात राजरस्त्यावर ताटकळत बसत तसे. कांही तरी दिव्य दर्शनाचा साक्षात्कार होणार असल्याची खात्री आहे.

कूलूला आल्याचे सार्थक झाले असे वाटावे असे हे दुसरे ठिकाण ! पहिले मणिकरण. आणि दुसरे हे मनाली. पहिल्याचा विशेष आध्यात्मिक तर याचा नसर्गिक. दोन्ही सौंदर्याचेच आविष्कार.

इथे हे जे जाणवत आहे, त्याचे कांहीसे श्रेय आम्ही उतरलो आहोत या ठिकाणाला आहे. एखाद्या गावाचा बरा वाईट, स्पष्टास्पष्ट असा काही तरी ठसा आपल्या मनावर उमटतो. त्यात आपल्या राहात्या जागेचा, त्याच्या सभो-वतालच्या वातावरणाचा आणि तिथल्या सोयी गैरसोयीचा सुद्धा आपल्या मनावर होणारा परिणाम अंतर्भूत असतो. येरवडा नासिकचे हवापाणी चांगले आहे. तिथल्या तुरुंगातल्या कोंदट बराकीत राहाणाऱ्या हातभागी जीवाना त्याची काय मातबरी वाटणार ? बंगलेवाल्यांना, म्हणजे त्यात राहाणाऱ्यांना जरूर वाटते.

इथला हा रेस्ट कॅम्प, बस तळापासून आपल्या मलबारहिलइतक्या उंचीवर आहे. सात फर्लांग चढ चढावा लागतो. चढताना अण्णांची चांगलीच दमछाक होते. पण वर आल्यावर स्वारीची तबियत खूष ! वरून खालच्या खोऱ्यातले मनाली गाव, पलीकडील मैदान आणि 'बियास दर्या' ची धार या सगळ्या गोष्टी चित्रांतल्यासारख्या लहानसर दिसतात. त्या पाहून थकवा कुठेच्या कुठे पळतो.

जी गोष्ट पहलगांवच्या परिसरांत जाणवते तीच अधिक उत्कटत्वाने इथे जाणवत आहे. हिमाच्छादित शिखरांनी वेढलेले खोरे बघितले की माझे हिंदु अंतर्मन त्या परिसराचा संबंध भोलानाथाशी जोडून मोकळे होते. बाराहि

ज्योतिर्लिंग भारताच्या अष्टदिशास आहेत, गिरिकुहरात आहेत तशीच सागर-तीरी आहेत. परंतु त्यांचे 'हेड ऑफीस' आणि 'रजिस्टर्ड ऑफीस' दोन्ही हिमशिखरांतच असली पाहिजेत अशी आपली लहानपणापासूनची दृढभावना आहे. आपल्या कामानिमित्त आपल्या पंतप्रधानाप्रमाणे दौरे त्यानेहि जगभर केले असतील. परंतु आपले 'मिशन' संपले की तो जो परत आपल्या घरी म्हणून येत असेल तो मात्र असल्या पुण्यभूमीतच.

अशी एक भव्य कल्पना यात्रींच्या जगात रूढ आहे कीं पुरा पंधराशेच्या पंधराशे मैल पसरलेला हा नगाधिराज म्हणजेच एक उमा-महेश्वराची नंदीवर आरूढ झालेली त्रिशूलधारी स्वारी. नेपाळांतील पशुपतिनाथापाशी या स्वारीचे मध्यांग. गौरीशंकर, एव्हरेस्ट नि कांचनगंगा ही त्रिशूळाची तीन अणकुचीदार पाती. इतरहि आणखी तपशील सांगितला जातो. ही कल्पनाच एवढी भव्य आहे की सामान्य माणसास तिचे आकलनच होत नाही. कागदावर समजू शकते. पण मनात ठसत नाही. नगाधिराजाच्या किंचिद्दर्शनाने काय समजणार ! समजायचीच पंचाईत तिथे रसग्रहण कोण करणार ?

आता जवळ जवळ अद्याप अंधार आहे. अंधारांतच उजेडाच्या आशा सामावलेल्या असतात. अंधाराला जो समजू शकला नाही त्याला उजेडातहि प्रकाश दिसणार नाही. असे अंधाराबद्दल काही तरी गूढ गूढ बोलले नि लिहिले जाते. माझ्या बाबतीत अंधाराची मात्रा फारशी काही चालतच नाही. अंधार झाला की मला झोप येऊ लागते. आज आता मी जो ताटकळत बसलो आहे तो मोठ्या कष्टाने. कौमुदी फुलेल नि आपल्या कष्टाचे चीज होईल या आशेने. पुढच्या करमणुकीच्या कार्यक्रमाच्या आशेने मुले जशी व्याख्यात्यांचे व्याख्यान ऐकण्याची कळ सोसतात तसा.

फार लहानपणी माझ्या मामाची रंगाची पेटी माझ्या हाती आली होती. चांगले तास दोन तास मी त्या वेळी चित्रकलेत रमलो होतो. फक्त काळा व गडद निळा दोनच रंग मी वापरले होते. तेव्हा जी चित्रकला उमटली होती कागदावर, त्यात हत्ती, घोडे आणि पशु-पक्षी तर होतेच,पण शिवाय देव आणि राक्षस सुद्धा मी काढले होते. ते सर्व या काळोखात माझ्या समोर आता आहेत.

आता हा उजवीकडचा डोंगर आईन्ता कौमुदीवरचे झाकण उघडीत आहे. मघांपासून काळोखाच्या या भव्य डेऱ्यात जे घुसळण चालू होते त्यावर

आता नवनीताचा हा थोरला गोळा आला आहे ! दिवसा पाहिलेल्या वस्तुजाताचे रंग आता फार मोहक दिसू लागले आहेत. त्या सर्वांवरून कौमुदीचा दैवी हात फिरला आहे ना ! ही कौमुदी फुलायच्या आधी तिच्या विभावरी मातेला थोडे का कष्ट पडले होते ? कुलाचार संभाळणे, नाहीतरी गृहिणीलाच बघावे लागते. दिनराज ! पुरुषच तो ! त्याला काय ! ताम्हणांतला गुलाल, हळद, कुंकू उधळून संपविल्यावर, पश्चिम गोलार्धात आपला पुरुषार्थ करायला स्वारी निघून गेली होती. एक एक नीरांजन दीप तेवता ठेवून विभावरीने कौमुदी नावरुपाला येईपर्यंत, कसे बसे प्रकाश दानाचे आपले कौटुंबिक व्रत संभाळले होते. चार साडेचार तासानंतर आता कुठे तिला विश्रांती मिळाली होती.

आमच्या समोर आमच्याच डोंगराच्या उतारावर कौमुदीच्या शुभ्र फुलांचा खच पडला आहे. घनदाट वृक्षराजीखाली प्राजक्ताच्या फुलांची पखरण आहे. तर विरळ पर्णराजीखालीं शुभ्र कमळांची उधळण आहे. एखादा वेडाही (हा कवि असू शकेल) वेचायला धावावा इतकी ही खरीखुरी फुले वाटत आहेत. वेचायला उठायची कल्पना मनांत येताच गुरफटून चांगली ऊब आलेले पांघरूण काढायला लागेल ही जाणीव होते नि मग लक्षांत येते की समोरच्या दैवी धवलतेला पकडता येणार नाही. नुसत्या दर्शनांतच धन्यता मानावी लागेल.

एक एक गोष्टीला आता स्पष्ट आकार येऊ लागला आहे. थेट नाका-समोर, पार लांबच्या श्रेणीत असलेले हिमशिखर हे हिमशिखर नसून शिव - मंदिराचा रुपेरी कळस आहे. या मंदिराच्या भव्य प्राकाराचे प्रवेशद्वार या मंदिराला शोभण्याइतके भव्य, आमच्यापासून केवळ वीसपंचवीस फुटांवर आहे. दोन देवदार ! डांगमधल्या सागासारखे उंच सरळसोट ! यांच्यावरच या भव्य प्रवेशद्वाराची मदार आहे. यांचा उंचावरील शाखाविस्तार दहा मजली गोपुरापेक्षा निश्चित आकर्षक आहे. माणूस काय निसर्गावर मात करू शकलाय ? वरच केवळ शाखा विस्तार असलेली दोन देवदारांची ही महिरप एकदा लक्षांत आली की तिच्यावरची नजर बळेच काढून घ्यावी लागते. शहरांत हजारो रुपये खर्चून कंत्राटदारांनी बांधलेल्या कमानी झक मारतात हिच्यापुढे !

ताजमहाल पहिल्या प्रवेशद्वारांतून काहीसा असाच दिसतो. दरवाजांतून आत शिरायच्या आधी ताज, आमच्या समोरच्या शिवमंदिरासारखा असाच

स्वप्निल वाटतो असाच दैवी वाटतो. ताजमहालाचा मुख्य आर्किटेक्ट या जागी आधी येऊन गेला असला पाहिजे. तरीसुद्धा त्याची कलाकृती या भव्याकृतीची लघुआकृतीच झाली आहे

पंडित नेहरू सवड सापडली की मनालीला येत असत. त्यांच्यासारख्या कवि हृदयाच्या चिंतकासच या परिसराचा लोभ वाटावा. सृष्टिवैभवाने नटलेला हा कुलू - राणीचा प्रदेश माणसाचा दृष्टिकोन विशाल बनविणारा आहे. पंडितजी इथे आले की नग्गरलासुद्धा जात असत. या नग्गरला निकोलस रोएरिश हा रशियन चित्रकार काही वर्षे वास्तव्य करून होता निसर्गाशी लांबचे-जवळचे नाते असणाऱ्या कोणत्याही पेशाच्या माणसाची ही काशी रामेश्वर तीर्थे आहेत.

सकाळी कुलूहून निघतांना आम्हाला कल्पना नसते, की ऐकीव आणि पुस्तकी माहितीवरून आम्ही केलेल्या कल्पनेपेक्षा ही कुलूराणी इतकी आकर्षक आहे. आमचे हे निवासस्थान ज्या मोक्यावर बांधलेले आहे, त्यामुळे आम्हाला तो स्वर्गाश्रम वाटत आहे. साहेबाने बांधलेले ठिकठिकाणचे डाक - बंगले पाहिल्यावर त्याला सौंदर्यदृष्टी होती याची खात्री कुणालाही पटावी. परंतु आमच्या लोकशाहीच्या बाल्यावस्थेतील ( ही अवस्था आणखी किती वर्षे बाल राहाणार आहे ! ) सरकारच्या बाबतीत हा एक गोड अपवाद म्हणायला हवा. किंवा काही चुकीची गोलमाल तरी झाली असावी. या प्रवासांतील आमचे सर्वोत्कृष्ट निवासस्थान हेच. उंची सुमारे साडेसहा हजार फूटच आहे. परंतु बर्फ सान्निध्यामुळे पारा उंचीच्या मानाने अधिक खाली उतरतो.

तिब्बतची सरहद्द इथून रस्त्याने सुमारे पाऊणशे मैल असेल. सरळ रेषेत फारच कमी असावी. आम्ही काही सरहद्द पाहायला आलेलो नाही. तरी पण ती जाणवत आहे. लष्कराच्या 'यातायाती' (हा मात्र हिंदी शद्ब) मुळे. दहाच मैलांवर रोहटांग. ती चढून गेल्यावर एकच भारतीय विभाग मध्ये राहिला. लहौल. परंपरागत एक वाहाता रस्ता मनाली - राहाला- रोहटांग असाच तिब्बतमध्ये पोहोचला आहे. आता रोहटांगपर्यंत जीप चढते. आणि पुढे मैदान आहे. हवी तिकडे जीप न्यावी. बस सर्व्हिस मात्र राहालापर्यंतच ( रोहटांगचा पायथा ) आहे.

पंधरा - वीस वर्षांपूर्वी एका प्रवाशाने एक चूक केली होती. बरोबर जीप आणली होती. ती मोडून खेचरांच्या पाठीवर लादून रोहटांग चढवून वर नेली. तिथे पुन्हा जोडली आणि मनसोक्त शेकडो मैल फिरविली. विद्युत्‌चलित

वाहन तिथल्या स्पित्ती, लहौली म्हणजे जवळजवळ तिब्बतीच, लोकांनी कधी पाहिलेले नव्हते. त्याची त्यांनी पूजा काय केली, माणसांना खाऊ - पिऊ काय घातले ! मोठी धमाल उडवून दिली होती त्या जीपवाल्याने !

या गावात हिंडताना स्थानिक माणसाशिवाय इतर उघडे वाघडे हिंडणारे हमाल, मजूर—कोण स्पिती आणि कोण तिब्बती हे काही आपल्याला ओळखत नाही. सगळेच मंगोलियन चेहरे. स्थानिक मात्र ओळखता येतात. जवळ जवळ कष्मीरीप्रमाणेच आहेत हे. देखणे, चपल. नाव मात्र खालिक, सादिकच्या ऐवजी बेतसिंग, जगतसिंग अशी आहेत. प्राचीनकाळाच्या स्थानिक कथा आणि दंतकथा यांचा तोंडवळा राजस्थानी आहे.

काहीहि नवीन पहिले की माणसाच्या मनात तुलना सुरू होते. कोकणात कुठेहि जायचे झाले की एकादी तरी घाटी चढावी किंवा उतरावी लागते कराव्या लागणाऱ्या चढउतारामुळे माणसे चपळ, लहान चणीची व काटक-च्चिवट अशी असतात. इथली नि कष्मीरांतील माणसे तशीच म्हणजे कोकणी माणसांसारखी आहेत. चेहऱ्यामोहऱ्याने कोकणी मनुष्य चांगला उजवा असतो. कष्मीरांतील चेहऱ्यांत आर्यत्व बव्हंशी असल्यामुळे तो चेहरा खरोखर मोहक असतो. या कुलू खोऱ्यांतमात्र कोकणच्या इतपतच उजवेपण आहे. तरीहि त्यांत निराळे पण आहे. नाही म्हटले तरी मंगोलीय छाप जाणवते. तिब्बतीच्या इतकी मात्र नाही.

इथे ठायी ठायी कोकणची आटवण येते. हा कुलू प्रदेश म्हणजे कोकण अधिक बर्फाच्छादित शिखरे, डोंगर-दऱ्यांची उंची आणि खोली थोडी अधिक उत्कट, इतकेच.

कष्मीर नि कुलूंत पुष्कळसे साम्य आहे, तरीहि वैविध्य इतके की एक पाहिले म्हणजे दुसरे पाहिले असे म्हणता येणार नाही. दोहोंची आकर्षणे निरनिराळी. तसा विविधपणा सगळीकडेच सृष्टीत भरून राहिला आहे. पृथ्वीवरील मनुष्यवस्ती सव्वातीनशे कोटीच्या सुमाराची आहे. परंतु एकासारखा तंतोतंत दुसरा मनुष्य मिळत नाही. जुळया भावात तिसऱ्याला फसण्याइतके साम्य आढळले, तरीहि त्यांच्यात सूक्ष्म फरक असतोच. इतर प्राण्यांतसुद्धा हेच आढळते.

इथे बसले म्हणजे मन अंतर्मुख होऊन असेच कुठे तरी भटकत जाते. अण्णा असेच टक्क डोळे उघडे ठेवून कुठे तरी गुरफटले आहेत.

♣ ♣

# म ना ली ( टूरिस्ट रेस्ट कॅम्प )

## ऑक्टोबर २९, १९६४

**उद्या** सकाळी खरे म्हणजे पहाटेसच इथून निघायचे जिवावर आलेय. परंतु निघायला तर हवे आहे. परवा पठाणकोटला मुंबईची गाडी गाठायची आहे ना ? या ठिकाणी आणखी दोन तीन दिवस हिंडायला आणि शेवटी एकादा दिवस नुसतं लोळायला मिळायला हवा होता ! एका दृष्टीने निघावे लागत आहे हेहि ठीक आहे. चुटपुट लावणारी, ओढ लावणारी वस्तू पुरेपुर मापाने कधी मिळूच नये. त्याचे महत्त्व, त्याचे कौतुक मग दुय्यम, पुसट होते.

थंडी जाम पडली होती म्हणूनच आज सकाळी जाग लौकर आली. झोप मात्र अपुरी झाल्यासारखी वाटत नाही. आज मनालीच्या आसपास पाच-चार मैल तरी भटकून यायचे आम्ही ठरविले आहे. इथे स्नान करण्यापेक्षा मागच्या डोंगरात वसिष्ठ गावच्या गरम पाण्याच्या ( गंधकयुक्त ) कुंडात स्नानाला जायचे आम्ही ठरवितो, चहा,नाष्ता उरकून आम्हाला बाहेर पडायचे असते.

पहिल्या चहाच्या वेळीच बेतसिंग प्रवाशांची नोंद-वही आमच्या पुढे ठेवतो. आमच्या नोंदी भरून झाल्यावर मी ते अथपासून इतिपर्यंत चाळून पाहातो. मराठी माणसांची नावे फक्त दोनच आढळतात. पुढे होऊन बेतसिंग ' आमच्या मुलूखवाल्या ' ची म्हणून पुष्कळशी नावे काढून दाखवितो. ते सगळे आमचे मुलूखवाले असतात यात संशय नाही सगळी नावे मुंबईचीच, पत्ते मुंबईचे. फक्त ती मराठी नव्हती. एवढेच मला खटकत होते.

यावर एक टराविक समर्थन केले जाते. ' मराठी माणसे आपल्या राजधानीतच त्रिचारी भांडी घाशीत आहेत, फार तर खर्डे घाशीत आहेत. आणि साचे चालवित आहेत. त्यांच्यापाशी कुठला आलाय पैसा नि स्वास्थ्य ? ' या म्हणण्यात अगदीच तथ्य नाही असे नाही. आणि हे तथ्य भूषणावह तर

मुळीच नाही. परंतु म्हणून काय इथे येणाऱ्या माणसात दोनच मराठी नावे मिळावी ? इथे यायला लागणारे पैसे आणि स्वास्थ्य असणारी माणसे दोनच ? हॅट् ? हे काही खरे नव्हे.

या कुलू खोऱ्यात प्रवाशांची सोय केवळ अभावानेच जाणवते. बस-मधून जाण्यासारख्या ठिकाणी बसमध्ये गर्दी. म्हणजे अपुऱ्या गाड्या. पुढे डोंगरात जायला स्वारीला घोडे नाही, सामानाला खेचर नाही की हमाल नाही. जिथे जीपच जाऊ शकेल अशी कित्येक ठिकाणे आहेत. परंतु जीपा मिळत नाहीत प्रवाशांनी जीपा काय आपल्या सामानातून आणायच्या आहेत ? जीप मिळावी म्हणून रास्त मार्गाने आम्ही मुंबईपासून प्रयत्नशील आहोत योग्य माणसांची योग्य त्या व्यक्तीसाठी अधिकाऱ्यांसाठी ओळखपत्रे-शिफारसपत्रे आणली आहेत. परंतु त्यांना बसच्या तिकिटांइतकी सुद्धा कुणी किंमत देत नाही. जीप फुकट नाही मागितली. होईल तो सर्व खर्च, मजुरी, भाडं वगैरे आम्ही द्यायला तयार आहोत, परंतु जीप कुठेहि मिळाली नाही. आता मिळ-णार नाही. इथे आमचा कुणी दोस्त, नात्याचा अगर संबंधाचा अधिकारी नाही ना ? तसे असते तर कोणत्यातरी खात्याची जीप आम्हाला उपलब्ध झाली असती. तशा आणखी कुणाला उपलब्ध झालेल्या जीप्स आम्हाला भेटल्याच आहेत.

वर्तमानपत्रातून जाहिरातीचा खर्च करून राज्यसरकार जाहीर निमंत्रण देते तरी कोणत्या तोंडाने ? आणि कशाला ? इथे आलेल्या प्रवाशांच्या जखमा-वर मीठ चोळायला ? जाहिराती देऊन प्रवाशांचे शिव्याशाप खाण्याची ही काय हौस या सरकारची ! जाहिराती नसऱ्या, तरी काही हौशी भटक्ये येणारच आहेत, परंतु ते आपल्या जबाबदारीवर येतील, भटकतील, चालतील, चढतील पडतील. आपल्याला सोसेल ते करतील. परंतु मग ते कुणाच्या नावाने चरफड-णार तरी नाहीत.

न्याहारी उरकून आम्ही बाहेर पडतो ते प्रथम हिडिंबा देवीच्या मंदिरात जातो आमच्या राहात्या जागेपासून हे केवळ फर्लांगभर अंतरावर आहे. पुन्हा देवदारांची गर्द राई इतकी गर्द की मुंबईला पारशांच्या घराच्या ओट्यावर पांढऱ्या रांगोळीचे ठसे मारलेले दिसतात तशी इथली सर्व देवदारवटीची जमीन सडा-संमार्जनानंतर कोवळ्या उन्हाच्या ठशांनी शोभिवंत केलेली

दिसत आहे. देवीचे दर्शन मात्र आम्हाला होत नाही. पुजारी पूजा उरकून दरवाजे बंद करून गेला आहे. हे जाडजूड दरवाजे आणि कोरीव कातीव खांबे सगळे देवदाराचे आहे. आणि याला शेकडो वर्षे झाली आहेत म्हणतात.

आपल्याला देवदारी खोके माहित असतात. आणि ते लाकूडहि आपण फार हलक्या प्रतीचे मानतो. परंतु इथे ते शेकडो वर्षे टिकण्याइतके मजबूत आहे. या डोंगरउतारावरील देवदारवटीला एक शिस्त आहे. माड-पोफळीच्या बागांसारखी.

तिथून आम्ही गावात उतरतो. बाजारातील काही इमारती जळल्याचे आम्ही कूलूलाच वाचले होते. बाजाराला सगळी अवकळाच आलेली आहे त्यामुळे. मूळ गाव अगदी लहानसे खेडे. नेहमीच सुस्त. प्रवाशांच्या कमी-जास्त संख्येवर गावाची हालचाल अवलंबून.

नदी पार करून आम्हाला वसिष्ठला जायचे आहे मैलभर मनाली तिब्बत रस्त्याने चालल्यावर आमच्या रेस्ट कॅम्पइतकेच वर चढायचे आहे. गिर्यारोहण संस्थेला उजवी घालून आमची चढायला सुरुवात होते. इतक्या साजिऱ्या-गोजिऱ्या डोंगरांतले हे गाव अगदीच वठलेले आहे. गरम (गंधकाच्या) पाण्याचे झरे आणि जवळचे वसिष्ठ ऋषीचे अतिप्राचीन मंदिर या शिवाय या वसिष्ठचे दुसरे काही एक वैशिष्ट्य नाही.

स्नान करून कुंडातून भेल्कांडतच बाहेर पडतो आम्ही. इतका थकवा येतो.अण्णा तर जरा वेळ आडवे होतात ओसरीवर. मी जेमतेम वसिष्ठांचे दर्शन घेतो नि बाहेरच्या 'प्रभात रेस्टोरॉ' नामक टावरणांत चहा नास्त्याची व्यवस्था करतो. हा कार्यक्रम उरकल्यावर पुन्हा हुशारी येते आणि आम्ही मार्गस्थ होतो.

काही म्हणा, सृष्टीवैभवाची जाणीव होते ती विशेष म्हणजे डोंगर उतरताना. चढताना विशेष जाणवतात ते म्हणजे रस्त्यांचे चढ अणि पायांतले कढ! आता कुठे आमचे लक्ष या आणि समोरच्या पाहाडाकडे जाते. समोरचा संबंध डोंगर ओटे पाडलेल्या शेतांनी भरलेला आहे. पार मागे शिखरांवर बर्फ दिसत आहे. एक मोठी घळहि बर्फाने भरलेली खाली ओघळली आहे. अख्ख्या कूलू खोऱ्यांत नाव घेण्यासारखे पीक म्हणजे आलू (बटाटा) आणि भात. मका आणि कडधान्येहि होतात. पण क्वचित. वाळत घातलेली मक्याची कणसे घरांच्या छपरावर दिसत आहेत ती नारिंगी रंगाची आहेत.

घराची छप्परे कौलांची नाहीत की पत्र्यांची नाहीत. ती आहेत गुळगुळीत दगडाच्या खापऱ्यांची. खापऱ्या चांगल्या वीतभर हातभर लांबीच्या आहेत. याच डोंगरांतून त्या काढलेल्या आहेत. कोकणात जसे जांभ्याचे दगड हरएक गावी खणून कापून काढता येतात तशा. याचे छप्पर कौलांपेक्षा साधे नि सुबक दिसतेय.

औरंगाबादला एक पाणचक्की आहे. ती पाहायला प्रवाशांची झुंबड लागते. या उतारावर त्या ठिकठिकाणी डझनभर तरी आहेत. परंतु पाहायला प्रवासीच नाहीत. डोंगराच्या उतारावर म्हणाल तिथे पाण्याचा झोत चाकाच्या पात्यावर पडायला ओंजळ धरून उभा आहे. एक पाते फिरते. त्या जागी येणारे दुसरे फिरते. तिसरे फिरते. सबंध चाक फिरते. या चाकाला वरच्या बाजूला जोडलेल्या जात्यांत धान्य भरून निघत आहे. इतकी साधी रचना आहे की याला यंत्र म्हणवत नाही. सहज सुलभ! सहज सुंदर! या निष्काम कर्मयोगिनींची ही सेवा फार पुरातन काळापासून अखंड चाललेली आहे.

आपण पाय टाकावा तो दगड आपला चकाकतो आहे! त्यांत रुपे नाही, कथील नाही का शिसेसुद्धा नाही. अभ्रकाचे कण आहेत ते.

आमच्या समोरून डाव्या हाताकडून उजव्या हाताकडे एक निळसर पक्ष्यांची रांग जाते. हे रानकोंबडे असावेत. आपल्याकडील रानकोंबडे मातकट रंगाचे असतात. निळ्या डोंगरातले हे निळसर रंगाचे असावेत. गरुड पक्षी मध्य हिमालयाप्रमाणे या भागातहि दिसतात म्हणतात. ते दिसावे अशी इच्छा आहे.

आमची उतारवाट आता तिब्बत रोडला मिळायला आली आहे. रस्त्या-पलीकडला टीचभर रुंदीचा गर्जत चाललेला 'बियास दर्या' आता दिसू आणि ऐकू येऊ लागला आहे. त्या एवढ्याशा नदीत मधून मधून कापीव लाकडे वाहून दुसऱ्या गावी जाण्याकरता सोडलेली दिसत आहेत क्वचित् ती एकमेकांस भेटत आहेत. जरा वेळ एकमेकांस सोबत करून पुन्हा दूर फेकली जात आहेत.

त्या लाकडाप्रमाणे आम्ही मोठ्या रस्त्याला उतरतो, तोच आमची गाठ एका शिकाऱ्याशी पडते. त्याच्याबरोबर दोन मजूर आहेत. त्यांच्या दोघांच्या मिळून खांद्यावर असलेल्या एका काठीला चार पक्षी उलटे टांगलेले आहेत. दोन कवडे. दोन तित्तिर. सागुतीची त्यांची व्यवस्था छान झाली आहे.

'नमस्ते!' पहिला रामराम त्याचा. फार वेळ त्याला बोलायला कुणी मिळाले नसावे.

'नमस्ते, नमस्ते !' आमचा प्रति रामराम.

'बम्बईवाले ?' – शिकारी.

'जी हाँ !' याने कसे नेमके ओळखले ? काही प्रांतीयांचे चेहरे–मोहरे ओळखता येतात. उदाहरणार्थ, पंजाबी, शीख, मद्रासी (चार प्रांत), बंगाली, कश्मिरी ही मंडळी. परंतु मुंबईवाल्याचे तसे नाही. का या प्रांतापैकी दिसत नाही तेव्हा 'मुंबईवाल्याचा' खडा टाकून पाहायला हरकत नाही अशी तर याची तर्कपद्धती नाही ना ?

'आपका दौलतखाना ?' मी विचारतो.

'मेरा गरीबखाना स्यालकोट था, जो अब पाकिस्तानमे चला गया. फिलहाल मैं ठहरता हूं जलंदर.' बिचारा पाकिस्तान–हिंदुस्थानच्या फाळणीत बेवतन झाला आहे.

'आपने हमको बम्बईवाले करके कैसे पहचाना ?'

'यूँ ही ! मै कभी कभी बंबई आता हूं. और वहाँसे खंडाला जाया करता हूं एक पारसी दोस्त के साथ.'

'आच्छा आच्छा ! खंडाला आप आते हो. शिकार खेलनेके लिये. नही ?'

'तुम्ही मराठी आहात हे पण मी ओळखलं.' आता तर तो मराठी बोलू लागला. मला एक कल्पना सुचली.

'हे पाहा मि ... ?'

'जसजीतसिंग.'

'मि. जसजीतसिंगजी ? एक विचारू का आपणाला ?'

'बेशक.'

'आपण 'स्पोर्टस्' च्या सामानाचा व्यवसाय करता का ?'

'अरे ! हे कैस पहचानलं आपन ?'

'मी मराठी आहे हे जसं आपण ओळखलं, तसंच !'

माझा खंडाळ्यांतला 'ळ' उच्चार याने ऐकला आणि माझं मराठीपण अचूक हेरले. तसे तो पूर्वी स्यालकोटला असल्याचे त्याने सांगितले म्हणून, मी पण खडा टाकून पाहिला. तो बरोबर लागू पडला. फाळणीपूर्वी स्याल-

कोटची पुष्कळशी मंडळी वेताच्या लाकडाचे खेळण्याचे सामान बनविण्याच्या धंद्यांत असत हे मला माहीत होते.

'अनुभव ही फार मोठी चीज आहे जिंदगीत.' अण्णा आता भाग घेऊ लागले. शिकारी मोठ्या अदबीने ऐकू लागला.

'जी हाँ ! अन्नाजी !'

'या जंगलांत जनावरं तरी कोणती मिळतात?'

'भारी शिकारीच्या हौशीनं मी या जंगलात येत नाही. आपल्या सारखाच 'सीनिक ब्यूटी' बघायला येतो. जानवरं आहेत. रीछ आहे. चित्ता आहे. काही किसमची हरियन आहे. भारल खोखड वगैरा वगैरा. पन डाहाण्या शेर, बडा सुव्वर वगैरा भारी जानवरला ही शरदी बरदाष्त नाही होत. हत्ती, सिंह तर असणार नाहीत. तुम्हाला माहीतच आहे.'

'म्हणजे आमच्यासारखेच भटकायला आलात म्हणायचे तुम्हीसुद्धा.'

'अरे अन्नासाब, भटकण्याची पण एक धुंदी आहे. तुमच्यासारख्याला मी काय सागावं ! तुम्हीच या वयात बगलेत थैली लटकावून पहाड चढताय.'

'आता खंडाळ्याला कधी येणार ?' मी पृच्छा करतो.

'अरे भैय्या, त्याच्या आधी आपण जलंदरवरून पास होणार आहात. तेव्हा माझ्या झुपडीत आलंच पाहिजे तुम्ही दोघांनी.' धूर्तपणाने तो आपल्या निमंत्रणाचा क्रमांक आमच्या अगोदर लावतो. बोलत बोलत आम्ही नदीच्या पुलावर आलेले असतो. बरोबर असलेली पाण्यातील काही लाकडे एक एका कमानीतून तर दुसरे दुसऱ्या कमानीतून अशी दूर दूर फेकली जातात. आता तो शिकारी आणि आम्ही यांचे रस्तेसुद्धा असेच निरनिराळे होणारआहेत. जलंदरला उतरण्याचा त्याने इतका आग्रह केलाय की शेवटी आम्हाला 'हो' म्हणावे लागलेय. एकमेकांच्या पत्त्याची देवघेव करून आम्ही निरोप घेतो. पठाणकोटला गाडीत बसल्यावर मुंबई-सेंट्रलपर्यंत वाटेत कुठे उतरणे शक्य होणार नाही. तरी सुद्धा दिवाळीच्या दिवशी आम्ही कसेबसे मुंबईस पोहोंचणार आहोत.

आता दुपारचा एक वाजला आहे. खाली गावातच जेवण उरकून एकदम विश्रांतीकरिता मगच वर जायचे आम्ही ठरवितो. बेतसिंगाला तसेच सांगून आलेले असतो.

संध्याकाळी पुन्हां गावात मला यायलाच हवेय. बसमध्ये आम्हाला जागा राखून ठेवायच्या आहेत उद्यांच्या पठाणकोटच्या. जमल्यास इथली एकादी फळबाग बघायची आहे. सकाळी हिडिंबेच्या जंगलात भेटलेल्या बागवानाने येवढे बोलावले आहे ! जाऊन येऊ.

इथूनहि आम्ही पुष्कळसे पाहिल्याशिवायच निघणार आहोत. रोहटांग घाटीच्या पायथ्यापर्यंत तरी जाऊन यायला हवे होते. राहालापर्यंत तर बस जाते आता. इथे म्हणे अमेरिकेतील वायुगुहा सारखी वायुविवरे आहेत. वारा सपाट्याने आतून निरनिराळे आवाज करीत बाहेर पडत असतो. या विवरांच्या आत पोकळी असून विवरांची तोंडे उंचावर कुठे तरी पर्वतात असली पाहिजेत आणि त्या उंचावरील वाऱ्याचा सोसाटा इथून ध्वनी करीत बाहेर पडत असावा. कुणी सांगावे ! अमेरिकेतील वायु-गुहेसारखे चमत्कार इथेहि असू शकतील. हजारो वर्षे निसर्ग कोरीत असलेले शिल्प इथेहि आढळून येईल. त्यापेक्षा कदाचित निराळे असेल. परंतु निसर्ग-चमत्कार नक्की आढळतील. कुणी संशोधन केल्यास, अर्थात !

या मनालीजवळची सौंदर्य-स्थळे आमची पाहायची थोडी का राहिली आहेत ? परंतु त्यापैकी मातबर स्थळे दोन-दोन, तीन-तीन दिवसांच्या सहली आहेत. वसिष्ठ ज्या डोंगरांत आहे त्याच्या थेट माथ्यावर आकर्षक वातावरणात भृगु तलाव आहे. इथे पोचायलाच दोन दिवस लागतात. परंतु पोहोचल्यावर आल्याचे सार्थक झाल्यासारखे वाटते म्हणतात. भृगुऋषींच्या वास्तव्याने पुनीत झालेले स्थळ कसे तरी असेलच कसे ? मनालीच्या वरच्या पहाडातील अकरा हजार फुटावरील झिन्नाराणाचा किल्ला सवड असती तर नक्की पाहिला असता. शतकापूर्वीच्या राजस्थानी वळणाच्या याच्या दंतकथाहि थकल्या भागल्या प्रवाशाला रिझवितात. या मनालीचा किंचित् वास, सहवास मला चिरकाल साद घालीत राहील.

♣ ♣

## पठाणकोट ( रिटायरिंग रूम )

ऑक्टोबर ३०, १९६४

आज पहाटे पाच वाजता आमच्यापुढे एक मोठा पेचप्रसंग उभा राहिला. सामान गाडीतळावर कसे न्यायचे! काहीच व्यवस्था न करता मी स्वस्थ राहिलो असे घडलेले नाही काल संध्याकाळी दोन हमालांना शक्य तो रात्री मुक्कामालाच रेस्ट कॅम्पमध्ये यायचे व न येऊ शकल्यास पहाटे साडेचारला तरी हजर असले पाहिजे, असे ठरवून बजावून आलो होतो. शिवाय बेतसिंगाच्या ते ओळखीचेसुद्धा आहेत. अखेरे बेतसिंगाला स्वतःलाच विचारुन पाहायचे, नाहीतर दोन खेपा स्वतः करून आम्हाला सामान नेण्याशिवाय गत्यंतर नाही; अशा कष्टसाध्य सोडवणुकीपर्यंत आलो. बेतसिंग स्वतःच आपल्या पोऱ्याच्या मदतीने सामान नेण्याचे मान्य करतो. दोन खेपांत तरी आम्ही पुरे सामान नेऊ शकू किंवा कसे हा विचार करीत राहाण्याची आता जरूरी उरली नव्हती.

बेतसिंगाने दाखविलेल्या माणुसकीबद्दल त्याला त्याच्या अपेक्षेबाहेर फळ मिळते आणि गेले दोन्ही दिवस त्याने केली त्यापेक्षा जास्त चांगली सेवा त्याला करता आली नाही म्हणून तो हळहळ व्यक्त करतो. चांगला व्यवहारी आणि संस्कारी मनुष्य आहे.

पंधरा मिनिटे गाडी तळावर आम्ही आधीच पोहोंचतो. पंधरा मिनिटे बस उशीरा सुटते. म्हणजे आमचा त्या जळक्या बाजाराचे कळकट स्वरूप पाहात ताटकळत घालवण्याचा एकूण काळ अर्धा तास होतो.

'आपण कुठून आलांत?' महाराष्ट्रापासून दीड हजार मैलांवर शुद्ध मराठींत हे कोण विचारीत आहे? भल्या पहाटे आणि या कडाक्याच्या थंडीत आमच्यासारखेच दुसरेही भटके महाराष्ट्रांतून आले आहेत काय?

'मुंबईहून. आपण ?' – माझं उत्तर नि प्रतिप्रश्न.

'आम्हीही मुंबईचेच. हे श्री. माळी आणि मी चांदेकर.'

'नमस्कार, नमस्कार! वा वा!' मी आमची नावे सांगितली.

'नमस्कार, नमस्कार! वा वा!'

'आमच्यासारखेच भटकायला, का काम होतं काही इकडे?'

'म्हणजे भटकायचंच काम होतं. आमच्या कॉलेजची गिर्यारोहकांची तुकडी घेऊन आलो होतो आम्ही इथल्या गिर्यारोहण संस्थेत.'

'प्रशिक्षणासाठी?'

'होय.'

'मग कुठपर्यंत मजल मारलीत?'

'देओ तिब्बा गाठलं की आम्ही!'

'म्हणजे किती फूट हो?'

'एकोणीस हजार.'

'विद्यार्थीपण चढले तिथपर्यंत?'

'काही चढले. सगळे नाही.'

'बरं पण तुमचे विद्यार्थी कुठं आहेत?'

'दोन दिवसांनी मागाहून येतील. आम्हांला जरा घाई आहे.'

'बरं झाल भेटलात. गाडीत वेळ तरी चांगला जाईल.'

कट्राँए, कुलू, भुंतर आणि औट! पुन्हा तीच ठिकाणे! सकाळी चहा नीटपणे जमला नव्हता. इथे औटला बरा आहे. मुंबईस जायला आम्ही उत्सुक आहोत-तरी कुलू खोरे सोडताना मन थोडेसे तरी भारावते आहे. लहानपणी आपल्या मावशीकडून आपल्या घरी आपल्या आईकडे परतताना वाटत होते तसे कांही तरी. भुंतरला गाडी आल्यावर पार्वतीखोऱ्याकडे साहजिक नजर जाते. मणिकरण डोळ्यापुढे तरळू लागते. मंडीला गाडी पोचते. आता निसर्गाचे रौद्र तांडव संपलेले असते.

मंडीला मी चपळाई करून पन्डोह-पठाणकोट गाडीत जागा मिळवितो. हेतू असा की जोगिंदरनगरला उतरून बारोटला जाऊन येता आल्यास पाहावे. मुंबईची आमची गाडी उद्या संध्याकाळपर्यंत पठाणकोटला गाठायची आहे. परंतु हे मनोरथ तसेच मनात राहातात. लवकर पोहोचू म्हणून जी गाडी पकडतो.

ती 'रथ' निघते. मराठी मंडळींची सोबत आम्ही गमाविलेली असते.

जोगिंदरनगरला गाडी थांबते. तिथे सगळी वेळापत्रके मी जमवून बघतो. परंतु भरवसा येईना, उद्या पठाणकोटला वेळेवर पोंचू असा. पालन-पूरला आल्यावर तसेच डलहौशीच्या फाट्यावर गाडी आल्यावर तोच हिशोब मी करतो. तोहि जमत नाही.

आणखी तीनचार दिवस फुरसत असती तर ? तर काय झाले असते ? आणखी एक दोन ठिकाणे पाहून झाली असती. तरी पण आणखी कित्येक राहिलीच असती.

शेवटी काळोख पडल्यावर पठाणकोटला गाडी पोहोचते. आता उद्या संध्याकाळी गाडीत बसेपर्यंत आराम आहे.

माझा एक बूट गाडीतून कुठे तरी पडला. दुसरा शाबूत आहे. आता मुंबईच्या आमच्या मामा कांबळेने दुसऱ्या पायाचा एकच बनवून दिला तर याचा उपयोग ! तोपर्यंत वाहाणा आहेतच.

इथे आल्यावर माळी आणि चांदेकर कुठे दिसलेच नाहीत. वाटेत मंडीला त्यांची सोबत सोडून पन्डोहच्या गाडीत 'हुशारी' करून जागा मिळविली. परंतु ज्या उद्देशाने ती मिळविली तो साधला नाही, ही गोष्ट ते भेटले असते तर त्यांस सांगता आली असती. त्यांचा संभाव्य गैरसमज काढता आला असता. ते मनात म्हणत असतील, मंडीपर्यंत गप्पा हाणीत आलेली ही मंडळी दुसऱ्या गाडीत जागा पटकावून एकदम निघून जातात हे आहे तरी काय ? पन्डोहच्या गाडीत जागा मिळाल्यावर हात वर करण्यापेक्षा आणखी सविस्तरपणे त्यांचा निरोप घेता आलाच नव्हता.

आमच्यापेक्षा त्यांचीच गाडी अनपेक्षितपणे लवकर पोहोचून मुंबई गाडी तर त्यांनी गाठली नसेल ?

आज शेवटले चार तास आमचे अनपेक्षितपणे अत्यंत बेचैनीत गेले. दुपारी 'ट्रिब्यून' दैनिकात एक लहानशी दोन ओळींची चार दिवसांपूर्वीची मुंबईहून आलेली बातमी वाचली. 'ऑपेरा हाऊस जवळच्या औद्योगिक वस्तीत भयंकर आग लागून अंदाजे ××× नुकसान झाले.' अण्णांच्या राहात्या जागेला हे वर्णन लागू पडत होते. घरात वहिनी ( अण्णांच्या वृद्ध पत्नी ) आणि मुलगेलासा पुतण्या. काय झाले असेल कुणाला ठाऊक !

पठाणकोटला आल्यावर ही हुरहुर थांबली. माझ्या मुलाचे दोन दिवसां-पूर्वीची तारीख असलेले पत्र मिळाले. त्याच्यात अण्णांच्या घरची खुशाली होती. पत्र आगीच्या दुसऱ्या दिवशी लिहिलेले होते. म्हणजे आगीचा संबंध अण्णा राहत असलेल्या वाडीशी नव्हता, असा निष्कर्ष आम्ही काढला. तरीसुद्धा काही वेळ ओढून ताणून शक्याशक्यतेचे विचार अण्णांना बेचैन करीतच राहिले. शेवटी 'टेलिफोन करू या' म्हणून मी सुचविले तेव्हा नको म्हणून ते थोडेसे निश्चिंत झाले.

आज 'वातानुकूल विश्रामालय' घ्यावे लागलेय. परंतु त्याचे 'वातानुकूल' यंत्र बिघडलेले आहे. या हवेत त्याची जरूरहि नाही. आणि जरूरी नसताना, यंत्र बिघडलेले असताना दुप्पट भाडे पडले आहे एवढेच बिघडले आहे.

♣ ♣

# फ्रं टि अ र मे ल ( परतंताना )

## ऑक्टोबर ३१, १९६४

'**पठाणकोटला** गेला सबंध दिवस आपण जवळजवळ लहान मुलांसारखा उंडारण्यात घालविला.' – अण्णा.

'आता साऱ्या विवंचना संपल्या आहेत. डोक्याला कसला ताप नाही आहे. दिवसा उजेडी पोहोचू किंवा नाही, उतरायला जागा कशी मिळेल, पुढला मुक्काम कसा आखायचा यापैकी काही काही आता शिल्लक नाही. सहल संपलेलीच आहे आता. मुंबई गाठायला काय चाळीस तास आता लागतील तेव्हढेच!' – मी.

'खरी उंडारण्याला सुरुवात झाली एअर कन्डिशन्ड रिटायरिंगरूमपासून.'

'आता ते 'वातानुकूल विश्रामालय' आपण जे घेतलं ते काय चैन करायची म्हणून? दुसरी साधी खोली रिकामीच नव्हती. आणि 'प्रतीक्षालयात' कशी खेचाखेच होती ते आपण बघितलंच. मग हा एक दिवस, थोड्या आरामात आणि निर्वेधपणं घालवायचा म्हटला तर दुसरा इलाज काय होता?'

'अहो, पण त्याचं समर्थन कशाला करताय तुम्ही? उलट मी म्हणतोय झालं ते बरंच झालं. ते घेतल्यापासून आपला नूरच पालटला. शिवाय मुंबईस पोचेपर्यंत आपला खर्च अंदाजाच्या बाहेर होणार नाही असं तुम्ही म्हणतोय ना?'

'ते तर खरंच आहे. पण आपला खरा नूर पालटला 'देशी घी' मधली न्याहारी सकाळी आपण गावात जाऊन घेतली तेव्हापासून. काय झक्क बेत जमलाय पण! नाही तरी रेलवे कॅन्टीन्स नि टूरिस्ट कॅन्टीन्स मधल्या तोच तोचपणाचा अगदी वीट आला होता नाही!'

'वा ! जेवणाचा सुद्धा बेत अगदी छान जमला. परंतु रस्त्यावर बाकड्यावर बसून न्याहारी करणं चमत्कारिक वाटतं. संकोच वाटतो.'

'संकोच वाटतो खरा ! परंतु सगळेच तसं करीत असतात. अहो, या पंजाबातल्या मोठमोठ्या शहरात 'माल' म्हणून जे मोक्याचं ठिकाण असतं तिथं तर संध्याकाळी हा खाण्याचा कार्यक्रम सहकुटुंब सहपरिवार चालतो. त्यानंतर हात धुणं नि मग इतर विधी रस्त्याच्या कडेला उरकणं यातसुद्धा कुणाला काही गैर वाटत नाही. तशी इकडील मंडळी टापटिपीबद्दल फारशी प्रसिद्ध नाहीच आहेत.'

'तरीसुद्धा तगडी जवान माणसं पाहिली की बरं वाटतं. तुस्त असतो एक एक जण ! समृद्ध प्रांत आहे.'

'प्रांत समृद्ध तर आहेच. पण मेहनतीसुद्धा आहेत माणसं. अलिकडे इकडच्या खेड्यापाड्यांतून न्याहाल झाले आहेत. परदेशी पाव्हण्यांना ही चंदीगडकडची खेडी सुधारलेली म्हणून मुद्दाम दाखवितात.'

'सुधारलेली शेती, लघुउद्योग यांत पंजाब आघाडीवर आहे. दक्षिणेकडील प्रांतांनी हेवा करण्यासारखा मुलख आहे हा. शिवाय सरहद्दीवरचा आणि लष्कराची मदार ज्याच्यावर आहे असा हा प्रांत !'

'तर हो ! या भांडवलावर तर इथल्या पुढाऱ्यांचे दिल्लीला लाड चालतात.'

'जरा भाईसाब वो पानी का लोटा उपर दे दीजिये.' एक पंडीतजींची फर्माईश. आतापर्यंत हे वरच्या बर्थवर आपल्या घरून आणलेला डबा आमच्याकडे पाठ करून संपवीत होते. पाणी पिऊन ढेकर देत स्वारी खाली उतरते नि आमच्या गप्पांत सामील होते. मूळ डलहौसीचे राहणारे हे पंडित रेल्वेत नोकर आहेत. साडेतीनशेच्यावर पगार असल्यामुळे यांना पहिल्या वर्गाचा पास असतो. यांनी एकदा मुंबई पाहिलेली असते.

'एवढा खर्च करून आलात तसे आमचं डलहौसी तरी बघायचं होतं. धौलाधर मालिकेतील हे ठिकाण म्हणजे हिमालयाचे प्रवेशद्वार समजलं जातं.'

'डलहौसीबद्दल ऐकलंय आम्हीसुद्धा. पण असं बघा, तीन आठवडे आम्हाला सवड होती. यात काय काय म्हणून बघायचं ? थोडंसंच पाहता येतं आणि पुष्कळसं राहातं हा नेहमीचाच अनुभव आहे. तुम्ही मुंबईला आला

होतात ना? काय काय पाहिलं सांगा बघू!'

'अरे भाईसाब! एक हत्ता मुंबईलाच होतो ना! मुंबई बहोत बघितली. लक्झुरी बसमधून हिंडलो. एलफंटा बघितलं, सचिवालय, मेट्रो बघितलं, दर्यांत नौकाविहार केला.'

'एक आठवडा होता म्हणता? म्हणजे पुष्कळच पाहिलं असणार.'

'मुंबईसारख्या शहरांत पाहण्यालायक जशा पुष्कळ गोष्टी आहेत तशाच झुपडपट्टीसारख्या समजण्यालायक पण पुष्कळ समस्या आहेत.'

'वाहवा! खरे भटक्ये दिसता आपण!'

'अरे भाईसाब! मघापासून आपल्या गोष्टी ऐकतोय मी. म्हटलं गप्पा मारण्यालायक मंडळी दिसताहेत. म्हणून तर खाली येऊन बसलोय. पुष्कळ फिरणं झालंय नाही म्हटलं तरी माझं. रेलवेचा फुकट पास असल्यामुळे हा शौक परवडतो आम्हाला.'

'छान छान! समानशील मनुष्य भेटला की बरं वाटतं.'

'तर मी काय म्हणत होतो की डलहौसीला आपण आवश्य यावं एकदा. पंडित नेहरूंना फार आवडायचं आमचं हे पाच टेकड्यांवरचं गाव.'

'पाच टेकड्या आहेत काय? आणि हवा?'

'अरे तीच तर सगळ्यांत महत्त्वाची गोष्ट. उत्तम हवेमुळं इथं प्रथम आरोग्यधाम १८५१ साली साहेबानं बांधलं. मग शहर वाढलं. एक दिवस येऊन बघून जाण्यासारखं आमचं गाव नव्हेच. सबंध सुट्टी इथं घालवायल पाहिजे. सिमल्याइतकी महागाई नाही. आपण जरूर या एकदा. माझी झुपडी आहे स्वतःची. मला फार आनंद वाटेल आपण तिचा लाभ घेतलात तर. हा माझा दिल्लीचा पत्ता.'

'तुमच्या दिलावरपणानं तुम्ही तर आम्हाला गुदमरून टाकलं!'

'आपल्याला या गोष्टीची कदर आहे म्हणून तर एवढा उत्साह वाटतो. आणि याल ते आपला परिवार घेऊन या. बालबच्च्यांच्या सुखाकरता तर आपण मेहनत करतो. खरं का नाही?'

'खरं आहे. आम्ही जरूर लक्षांत ठेवू पुढल्या वर्षी.'

'जे जे पाहिलं आहे तुम्ही ते तुमच्या आपोआप लक्षांत राहातंच, परंतु

न पाहिलेल्या ठिकाणांच्या यादींत आमचं डलहौसी पहिलं धरा, म्हणजे याल तुम्ही.'

'आपण युक्ती बरोबर सांगितलीत. न पाहिलेली ठिकाणंच जास्त लक्षांत राहातात. दुष्प्राप्य वस्तूबद्दलच जास्त कौतुक असतं. हा आमचा पत्ताही घेऊन ठेवा जरूर पडल्यास संकोच करू नका.'

आता जलंदर जंक्शन आलं आहे. जसजीतसिंगाची मला आठवण येते. प्रवासातल्या ओळखी – विशेषतः समशौकिनांच्या – किती आल्हाददायक असल्या तरी त्या टिकू शकत नाहीत. या पंडिताची म्हणून कशी टिकणार आहे!

♣ ♣

# फ्रंटीअर मेल (परततांना)

## नोव्हेंबर १, १९६४

**आजचा** प्रवासाचा शेवटचा दिवस. उद्या आम्ही मुंबईला पोचतो आहोत. गेलो थेट आणि आता परतत आहोत ते सुद्धा थेटच. दहाबारा दिवस सहज भटकता आले असते. न पाहिलेल्या आणि पाहाण्यासारख्या अशा स्थळांना काय तोटा होता. कोव्यास निदान पंडिताकडे तरी जायला हवे होते.

कशाकरिता म्हणून आम्ही या सहलीला गेलो होतो ? आणि पूर्वीसुद्धा मी भटकलो आहे तो कशासाठी ? सभा, संमेलन अगर परिषदेसारखे सार्वजनिक निमित्त या वेळी नाही. व्यक्तिगत अगर स्वतःच्या पेशाबाबतहि काम नव्हते. मग का गेलो होतो ? श्रीमान् लोक, काही हौशी श्रीमंतांचा अपवाद वगळता, केवळ आपल्या रेकॉर्डला असावा प्रवास म्हणून जातात तसे आम्ही गेलो होतो ? मिरविण्यासाठी ? आमच्या पदरांत काय पडले' होते ? याचे व्यावहारिक उत्तर शून्य, असे आहे. सहज न परवडणाऱ्या आमच्या सारख्यांचे काही शेकडे खर्चच झालेले होते. पैसे नव्हते तेव्हांहि हा शौक करीत होतो ना !

कवि कविता का करतो ? चित्रकार चित्रे का काढतो ? गायक का गातो ? किंवा नर्तक का नाचतो ? या चालीवर याचे उत्तर प्रतिप्रश्नांनी देता येण्यासारखे आहे. तशी अष्टौप्रहर करण्याची ही साधना नाही. जात तीच. पण प्रकार निराळा. हा एक जीवन समृद्ध करणारा शौक आहे. ज्याला तो नसतो ते त्याला आंबट शौक म्हणतात. आम्हाला तो गोड वाटतो. त्यांत होणारे हाल शरिराला बोचत नाहीत. होणारी फजिती - परिस्थितीने निर्माण केलेली - मनाला टोचत नाही. पदरी पडणाऱ्या निराशेने मन खचत नाही.

पैशांची अडचण, जागेची अडचण, तिकिटांची अडचण, खाण्यापिण्याची अडचण या सगळ्यांवर उत्साह मात करतो. आता आम्ही परत चाललो आहोत. रिकामे नाही जात आहोत. कित्येक दिवस, कित्येक महिने पुरेल इतका उत्साह, उल्हास छातीत भरून घेऊन चाललो आहोत. जीवन आणखी समृद्ध झाले आहे अशी धारणा आहे.

प्रवास हा एक छंद आहे. हौस आहे. मन आणि बुद्धी विशाल करणारी निर्मळ हौस आहे. शिकारी, शिकारीसाठी रानावनांत भटकतो. जिवाचे हाल्हाल करुन घेतो. म्हणून का त्याचा शिकारीचा शौक हा आंबटशौक म्हणायचा ? त्याला मिळणारा शिकारीचा आनंद उत्कट नि उच्च प्रतीचा असतो. म्हणून त्याला कोण काय म्हणतो याची पर्वा नसते. दिसेल त्या जनावराला गोळी घालीत नाही तो. अनुभवी शिकारी अविचारी नसतो. विवेकाविवेक तो चांगला पळतो. उपद्रवी जनावरे तो मारतो. जनावरांच्या बाबतीत त्याचे मन हळवे बनलेले असते. रानांतल्या प्राण्यांच्या जगाची त्याला चांगली माहिती असते. म्हणून त्याचा आनंद उच्च प्रतीचा म्हणायचा.

प्रवासांत काही व्यक्ती आपल्या मनावर कायमचे ठसे उमटवितात. मनुष्यस्वभावाचे आपले ज्ञान वाढते. भेटणारी काही सत्प्रवृत्त असतात. काही दुष्प्रवृत्त. धालपूर मैदानांत भेटलेली बुढीमा, मणिकरणच्या वाटेवरचा लालाजी आणि खुद्द बाबा नारायण हरी यांना एकदा भेटल्यानंतर कुणी विसरू शकेल काय ? काही इरसाल नमुनेहि लक्षांत राहातात. रामदास स्वामींनी म्हटले आहे —

कुग्रामे अथवा नगरे । पहावी घरांची घरे ॥
भिक्षामिषे लहान थोरे । परीक्षूनि सोडावी ॥

♣ ♣

# मुंबई ( आमची खोली )

## धनत्रयोदशी, नोव्हेंबर २, १९६४

**आज** सकाळी नऊ वाजता फ्रंटीयर मेल मुंबई सेंट्रलला फलाटावर लागली. फलाट माणसांनी नुसता फुलून गेला होता. गर्दीचा डोंब उसळला होता. क्वचित् ओळखीचे चेहरे दिसू लागले. म्हणजे ही गर्दी आमच्या स्वागतार्थ होती ? नाही नाही ! आम्ही नेमके कोणत्या दिवशी येणार आहोत हे कुणाला कळविलेच नव्हते. आणि कळविले असते तर ? कुणी तरी सामान उतरून घ्यायला आले असते कदाचित ! बस्स ! वीस दिवस नि एकवीस तासांची आमची ही यात्रा आज संपली.

मनुष्य प्राणी हा कळप करून राहाणारा प्राणी आहे असे लहानपणापासून मी वाचीत आलो आहे. तसाच मनुष्यप्राणी हा—विशेषतः यातला नर-भटक्या आहे असे, खरोखर तसे असताना, कुठेच कसे आढळत नाही ! मी काही मानववंशशास्त्रवेत्ता नाही. तरीसुद्धा मोठे लोक भटकतात एवढे तरी सर्वांना मान्य व्हावे. नाही तर अनादिकालापासून माणसाने भटकण्याचा पराकाष्ठेचा शौक एवढ्या आस्थापूर्वक केला असता कशाला ? ज्याच्या जवळ काही आहे किंवा ज्याला काही मिळवायचे आहे तो भटकायला बाहेर पडलाच म्हणून समजावे. मग ते ' काही ' एकादी इलम असो, पराक्रम असो, तत्त्वज्ञान असो, पांडित्य असो, हौस-छंद कला असो, संदेश असो किंवा आणखी कसला माल असो.

आर्य पामीर पठारावरून निघाले ते आपली वैदिक संस्कृति घेऊन. त्यातला अगस्ती तर पार कन्याकुमारीपर्यंत पोहोचला. पहिला मोठा प्रातिनिधिक भटक्या प्रभू रामचंद्र, काही तरी निमित्त ( आता ते वाजवी असेल सुद्धा ! ) मिळताच स्वारी निघाली चौदा वर्षांच्या भटकंतीला ! सहकुटुंब सहपरिवार. आणि त्याच्या हातून पराक्रम घडले.

दुसरा प्रातिनिधिक गट पांडवांचा. हेहि कुटुंब कबिला घेऊन निघालेले भटक्ये. द्यूतात म्हणे हरले हे आणि म्हणून देशोधडीला लागले. अरे! जुगारात हरले तर दिवाळे काढायचे होते! फार प्रामाणिक असाल तर कोरडे दिवाळे काढावे.ओले राखून काढू नये! पण नाही. देशोधडीला जाण्याची हौसच यांना म्हणून पधराशे मैलांचा हिमालय पूर्व-पश्चिम भटकले. भीमाची एक राणी हिडिंबा ही कुलू खोऱ्याची सगळ्यात मोठी देवता बनून राहिली आहे. आणि मध्यम पांडवाची एक राणी उलूपी ही पूर्वेकडील कामरूपांतील ऐतिहासिक पुरुष बभ्रुवाहन याची मातृदेवता आहे.

याच्याहि अलिकडले शंकराचार्य. हा नंबुद्री ब्राह्मण आपले 'म्हणणे' आटोपल्यावर जो निघालाय तो साऱ्या भारतभर फिरला. चौदिशांस याने मठ स्थापन केले. आणि हिमालयात अदृश्य झाला. त्यानंतरच्या सगळ्या संतांना सुद्धा हाच एक छंद! भटकण्याचा. नामदेवाचे अभंग तर पंजाबातल्या ग्रंथ साहेबात समाविष्ट केलेले आहेत.

रामदास! स्वतः तर भारतभर भटकलेच, आपल्या शिष्यांना भटकायला लावले, शिवाय भिक्षेच्या मिषाने भटकण्याच्या ठायीठायी उपदेशहि करून ठेवला आहे.

अगदी आताचा, आजचा सुप्रसिद्ध भटक्या म्हणजे विनोबा. भूदानाचा संदेश देत देत कष्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत बारा वर्षे नि तेरा महिन्यात पंचावन्न हजार मैल भटकला.

भटक्यांची आणखी एक जमात आहे. मंत्री आणि पुढाऱ्यांची. परंतु ही श्रेणीच वेगळी. ही हौशी भटक्यांची जमात नव्हे. धंदेवाईक. शिवाय यांची पद्धतहि उलटी आहे. मोठे होण्याकरता हे भटकत नाहीत. आधी हे पदसिद्ध मोठे होतात आणि मग दुसऱ्याच्या खर्चाने भटकतात. खर्च दुसऱ्याचा असल्यामुळे यांचे भटकणे अधांतरी असते. यांच्या मैलांची कसली गिनती करायची!

मूळ मुद्दा असा की, सगळी मोठी माणसे भटकतात. मी सुद्धा खूप भटकतो. (माझा तसा समज आहे!) आता फक्त मी मोठा मनुष्य व्हायचे तेव्हढे शिल्लक राहिले आहे. आणि तरीहि नाहीच झालो मोठा, तर बघेन नि एक दिवस बारा. नाही तर चौदा वर्षे भटकण्याचा संकल्प सोडीन! सोडणार नाही!

♣ ♣

# — कष्मीर, कांगडा व कुलू —

## यांसाठी मार्गदर्शक माहितीसह पुरवणी

पुस्तकाच्या प्रथमावृत्तीच्या वेळी म्हणजे सतरा वर्षापूर्वी या पश्चिमोत्तर हिमालयांतील प्रवासाची जी साधने व इतर सोयी - सुविधा होत्या त्यात आता पुष्कळच फरक झाले आहेत. सामान्य प्रवाशाच्या दृष्टीने सुख सुविधा वाढल्या आहेत. प्रवास सोईस्कर झाला आहे. परंतु रसिक व हौशी प्रवाशाच्या दृष्टीने काही ठिकाणांचे नागरीकरण झाल्यामुळे सृष्टी सौंदर्याचे मूळचे मुग्ध स्वरूप बरेचसे कृत्रीम नखऱ्याचे झाले आहे.

पुढे दिलेली माहिती, कष्मीर, कांगडा आणि कुलू या तीन प्रदेशांची आहे. सामान्य व हौशी प्रवासी ज्या ज्या स्थानाना भेट देण्याचा संभव आहे त्या सर्व ठिकाणांची माहिती, शक्य तितकी अद्यावत करून दिलेली आहे. गेल्या दोन वर्षात माझे जे आप्त इष्ट मित्र मला माहिती विचारून गेले होते ते जाण्यापूर्वीच त्यांना सांगितलेली काही विशिष्ट ठिकाणांची मला हवी ती माहिती माझ्यासाठी मिळविली व ती तर त्यांनी मला सांगितलीच. शिवाय स्वतःचे अनुभव सांगितले. त्यामुळे प्रस्तुत माहिती अद्यावत होण्यास मदत झाली आहे.

कष्मीर, कांगडा आणि कुलू या तीनही भागाची सहल एकाच वेळी उरकायची असेल तर कमीत कमी चोवीस-पंचवीस दिवसांची सवड - मुंबई ते मुंबई हवी. कांगडा हा भाग या तीन्ही मध्ये कमी महत्वाचा मानला तरी सुद्धा सुमारे तीन आठवड्यांची सवड, बाकीच्या दोन्ही भागांची सहल उरकण्यास हवी. नुसत्या कष्मीरला जायचे असेल तर कष्मीरला पोचल्यापासून निघेपर्यंत मध्ये सात दिवस हवेत. तरी-

सुद्धां घोड्यावरून अगर पायी जाण्याची ठिकाणे (ही विशेष महत्वाची आहेत) राहातीलच. 'कश्मीर' माहितीच्या शेवटी दोन दिनक्रम दिले आहेत. एक माफक व दुसरा व्यापक. ते पाहावे. कश्मीर ज्यांचे पाहून झाले आहे व ज्यांना फक्त कुलू खोऱ्यालाच भेट द्यायची आहे त्यांनी सिमल्यालाच परत जाऊन सिमल्यालाच परत यावे. या सिमला ते सिमला मह्लीलासुद्धा आठ दिवस हवेत.

आता आता तीन वर्षांपूर्वीपर्यंत या सर्व ठिकाणी जायला रेल्वेने भाड्यांत सवलत ठेवली होती. ती तर आता नाहीच. पण राखून ठेवलेली जागा आपणांस सहज प्राप्त झाली म्हणजेच रेलवे खात्याला धन्यवाद द्यायला हवेत अशी परिस्थिती आहे. म्हणून कुठे कधी जावे याचाही विचार व्हावयास हवा. आपल्या या तीन भागांत जायला - आणि इतर हिमालयीन भागांतसुद्धा - सबंध सप्टेंबर महिना हा सोयीचा. पावसाळा जवळजवळ संपलेला असतो आणि पूर अतिवृष्टी वगैरे संकटे बहुतेक येऊन गेलेली असतात. शिवाय हिवाळा - त्रासदायक असा पुढे यायचा असतो. शिवाय हा फळांचा ऐन हंगाम. (फुलांचा मात्र होऊन गेलेला असतो–जून जुलैमध्ये) फळे स्वस्त असतात. फळांनी लहडलेले बगीचे पाहायला मिळतात. आणि मुख्य म्हणजे सुट्टया कसल्याच नसतात. त्यामुळे बहुतेक ठिकाणी गर्दी अशी नसते.

विमान मार्गे सगळ्याच भागांत जाता येते. मुंबई दिल्ली, आणि दिल्लीहून चंदिगड अमृतसर, जम्मू आणि श्रीनगर अशी विमानसेवा कश्मीर भागांत आहे. कुलू जवळ भुंतरला विमान तळ आहे. परंतु विमान मार्गे जाणारा साधनसमृद्धीवाला असतो असे गृहीत धरायला हरकत नाही. शिवाय त्यांच्या सुखसोयी दुसऱ्या कुणाच्या तरी तर्फे होत असतात. तेव्हा सामान्य प्रवाशांना उपयोगी पडेल अशी माहिती इथे प्रामुख्याने द्यायला हवी.

दुसरा एक वर्ग, स्वतःची गाडी घेऊन जाणारे प्रवासी. आता पेट्रोलच्या महागाईने परिसीमा गाठली आहे. तेव्हा पेट्रोलची गाडी घेऊन जाण्याचा हव्यास कुणी सहज करणार नाही. परंतु ॲम्बेसेडर सारख्या गाड्या हल्ली डीझेलवर चालतात. ती गाडी पाच सहा (ड्रायव्हर धरून) माणसे असल्यास खुशाल न्यावी. त्यांतहि गम्मत आहे. प्रत्येक गाडीत दोन तरी ड्रायव्हर हवेत.

पैकी एक दुरुस्तीची जुजबी माहिती (मेकॅनिकल व इलेक्ट्रिकल) असलेला हवा पाच-सहा माणसे असल्यास वाटतो इतका खर्चाचा बोजा भयंकर असणारा नाही काही खर्च आपोआप वाचतात. आणि काही. मुद्दाम वाचविण्यासारखे सुद्धा आहेत. तीन आठवड्याच्या प्रवासांत हमाली पाचसहा जणांची सुमारे पाचशे रुपये होते. (शंका असणाऱ्यानी मोजून पाहावे) गाडी असल्यास आपोआप वाचतात. गाडी असल्यास मुद्दाम वाचविण्याच्या प्रकारापैकी उदाहरणादाखल सुचवायचे असल्यास हा एक प्रकार करून बघण्यासारखा आहे. फार मोठ्या शहरात उतरण्यासाठी व जेवणाखाण्यासाठीं सामान्यतः फार पैसे खर्च होतात. त्या ऐवजी मोठ्या शहराच्या आसपास पांच दहा किलोमीटर अंतरावरचे गांव पाहावे व तेथे डाक बंगला, वन-निवास अशा सारख्या ठिकाणी – प्रवासी फारसा सुखसोयींच्या अंकित झालेला नसेल तर – खर्च बराच कमी येतो. हा उद्देश मनांत सतत बाळगल्यास फारशी शोधाशोध न करता आपले अंदाज बरोबर ठरत जातात. शिवाय अशा मोठ्या प्रवासाला एकदम निघण्याआधी चार - आठ दिवसांच्या काही प्रवासांचा पूर्वानुभव आवश्यक आहे. पुण्याचे चार रिक्शावाले काही वर्षांपूर्वी काश्मीरची सहल करून आलेले आहेत. गाडी स्वतःची असल्यास एकूण प्रवासास वेळ कमी लागतो. किंवा तेव्हढ्याच दिवसांत ठिकाणे जास्त पाहून होतात. हवे तेव्हा निघता येते. ज्या मोठ्या रस्त्याने गेलो त्याच मोठ्या रस्त्याने तीच तीच गावे पाहात येण्याची जरूरी नाही. उदाहरणार्थ जातांना आग्रारोडने गेल्यास, येतांना पंजाब - हरयाणांतून राजस्थानांत जयपूरकडे जाता येते व गुजरातमधून परत मुंबईकडे पश्चिम द्रुत मार्गाने येता येणे शक्य आहे. मात्र अशा प्रवासांत निघण्यापूर्वीच खबरदारी घ्यायला हवी ती म्हणजे आजोबा आजी अगर तान्ही मुले बरोबर नसावीत. आजोबा आजींना अगर तान्ह्या मुलांना प्रवास सुखाचा होणार नाही. इतरांचा मात्र विरस होईल. तसेच कोणताहि ड्रायव्हर नवशिका अगर रॅश असता उपयोगी नाही. दहा - पंधरा वर्षांचे अनुभवी ड्रायव्हरच हवेत. अद्यावत 'रोड मॅप' अत्यावश्यक आहे. तशीच जुजबी हत्यारे.

पाहायच्या-हिंडायच्या मुलखांतील गावोगावी रिझर्वेशन करून जाणे हे सामान्य प्रवाशाला जमण्यासारखे नसते. आणि अशी रिझर्वेशन नसली तरी

सर्व ठिकाणी हालच होतात असे नव्हे. काही ठिकाणी थोडीफार गैरसोय होते. परंतु सोय होत नाही म्हणून ठिकाणच पाहायचे सोडावे लागले असे सहसा होत नाही. मध्यम वर्गीय सामान्य प्रवाशांसाठी उपलब्ध असलेल्या राहण्या जेवणाच्या सोयींचा पुढे योग्य संदर्भात निर्देश केला आहे. कश्मीर-मध्ये त्या बऱ्यापैकी आहेत. कुलू विभागात ठराविकच आहेत. म्हणून कुलूस बस मधून उतरल्या बरोबर एकाने टूरिस्ट ऑफीस सारख्या ठिकाणाकडे धाव घेतली पाहिजे. सामान बरोबरच्या इतरांनी उतरून घेऊन आपल्या जागा बघावयास गेलेल्या सोबत्याची वाट पाहात थांबावे. अशा सारखी श्रमविभागणी सर्व प्रवासात होतच असते. व्हायला हवी.

जास्त करून बहुतेक प्रवासी रेलवे व भाडोत्री बसने जाणारेच असतात. त्यांना तर पुढील सर्वच माहिती उपयुक्त ठरेल. पुढील पानामधून जी माहिती दिली ती प्रवासी मध्यम वयाचे आहेत असे समजून वेळ व इतर शक्यता धरल्या आहेत. प्रवाशांचा गट विशीतल्या तरण्याबांड प्रवाशांचा असला तर त्याला त्या विभागातल्या प्रवासाला एकाद दिवस कमी लागेल. अगर इतर ठिकाण ते अधिक पाहू शकतील. वृद्ध माणसे आणि लहान मुले त्या गटांत असल्यास त्या मानाने थोडा अधिक वेळ लागेल, अगर एकाद दुसरे ठिकाण कमी पाहून होईल.

प्रवासी गटाबरोबर आवडी-सवडीनुसार एकाद दुसरी दुर्बिण व छाया-चित्र घेण्यासाठी कॅमेरा असावा. खुद्द श्रीनगरला थंडी या सप्टेंबर मध्ये फारच बेताची असते. इतर ठिकाणी विशेषतः सहा हजार व त्यापेक्षा जास्ती उंचीच्या ठिकाणी थंडी विशेषतः रात्री चांगली असते. सर्व गरम कपडे व पांघरुणे लागतात.

## कश्मीर

सुमारे दहा वर्षापूर्वी पठाणकोटच्या पुढे रेलगाडी नव्हती. आता जम्मू (टवी) हे शेवटले स्टेशन आहे. तिकीट जम्मूचेच मिळते. पूर्वीप्रमाणे श्रीनगरचे ( पठाणकोट ते श्रीनगर पर्यंत २६२ मैल बस प्रवास धरून ) मिळत नाही. जम्मूला गाडी सकाळीच येते व तिथून बस सकाळच्या वेळातच मिळाली तर संध्याकाळपर्यंत प्रवासी श्रीनगरला पोचतो. पूर्वी बनिहाल बोगदा ( पीरपंजालमध्ये ) पाडलेला नव्हता तेव्हा पठाणकोट ते श्रीनगर अंतर

२६२ मैल होते व प्रवासी दुसरे दिवशी श्रीनगरला पोहोचे. आता जम्मू ते श्रीनगर व शिवाय बोगद्यामुळे कमी झालेले अंतर फक्त १८२ मैल( २९१ कि. मी.) आहे.

कश्मीरच्या राजधानीत श्रीनगरला आल्यावर तुमची बस थांबते ती टूरिस्ट सेन्टर समोर. दल गेट जवळ. टूरिस्ट सेन्टरवर राहाण्याच्या जागा भरपूर आहेत. पण जागा रिकाम्या नसल्याचे ठराविक उत्तर मिळते. काही मखलाशी करून कुणी प्रवासी जागा मिळवतात. परंतु इथे दाद न लागल्यास आपल्यापैकी एक दोघांनी जागा पाहाण्यास - टांगा रिक्षा घेऊन बादशा ब्रिज, लालचौक, पहिलापूल ( सर्व जवळ जवळ आहेत ) या भागांत यावे. येथे राहण्याजेवण्याच्या सोईसह, अगर नुसती राहायला खोली देणारी व संडास पाण्याची चाळी सारखी सार्वजनिक सोय असलेली हॉटेले आहेत. त्यापैकी आपल्या खिशाला परवडेल व स्वतःच्या सवयींना गैरसोईचे वाटणार नाही असे निवडावे. आपल्या सामानासह दुसऱ्या माणसांना तिथे घेऊन यावे. नुसत्या राहाण्याच्या जागी चहा मिळतो. आसपास तर सोय निश्चित असते. आपण हिंडत असू त्या त्या भागांत जेवणाची सोय असलेली होटेले आढळतात.

श्रीनगर पर्यंत येण्यात तीन दिवस गेले आहेत. जाण्यात तीन दिवस मोडणार आहेत. दोन आठवड्याची सुट्टी घेऊन निघालेल्या माणसास म्हणजे आता आठच दिवस कश्मीर मध्ये हिंडण्यास मिळतात. या आठ दिवसांच्या सहली खाली दिल्या आहेत. आणखी सवड असल्यास आणखी सहली दिल्या आहेतच शिवाय त्या कशाला जोडून घ्याव्यात तेहि त्या त्या जागी सुचविले आहे. श्रीनगरच्या आसपासच्या ज्या मुंघल गार्डन्स ( शाही बगीचे ) आहेत त्यामध्ये रविवारी व अन्य सुटीच्या दिवशीच फक्त उडती कारंजी व आरास असते. तेव्हा रविवार बघूनच या सहली योजिल्या पाहिजे. कमीत कमी वेळांत जास्तीत जास्त स्थळे पाहाता यावीत अशा तऱ्हेने त्या आयोजिल्या आहेत. तसेच तरुण मण्डळीचा उत्साह लक्षात घेऊन त्या आयोजिल्या आहेत. बायका मुले अगर वृद्ध मण्डळी असलेल्या गटांस यांतील काही गाळावे लागण्याचा संभव आहे.आठ दिवस हिंडल्यावर नववा दिवस श्रीनगरला विश्रांती व

खरेदीसाठी हवा सहलीचे अनुक्रम दिलेले नाहीत. कोणत्या बाजूस प्रथम जायचे ते प्रथम ठरवून त्या प्रमाणे त्या आखाव्या.

**एक बाजू पहलगावची. दुसरी गुलमार्ग कडील.** बाकीच्या स्वतंत्रच आहेत.

**सहल एक दिवसाची :** चहापाणी स्नान उरकून **सकाळी** अमीराकदल या पहिल्या पुलापासून सात पुलाची-झेलमच्या धरणापर्यंतची सफर करावी. वाटेत रघुनाथजी मंदिर, एकादी सिल्क फॅक्टरी, (अगर दुकान) हमदान मस्जीद, कालीमाता, पथ्थुर मस्जीद वगैरे स्थळांच्या ठिकाणी थांबून ती बघणे हे या सहलीत येते. टॅक्सी शिकाऱ्यातून ही सहल झेलम नदीमधून करावयाची असते.

**दुपारी** जेवण विश्रांती नंतर शंकराचार्य टेकडीवर (तक्त-ई सुलेमान) जाऊन सबंध श्रीनगर व आसमंत न्याहाळणे हा एक अनोखा अनुभव आहे. श्रीनगरचे येथून दिसणारे विहंगम दृश्य अविस्मरणीय आहे.

**सहल एक दिवसाची :** हा रविवार असावा. **शालीमार** (प्रेमगेह) **बाग, निशात** (उल्हासोद्यान) **बाग, चष्मशाही** (बादशाही झरा) व **नेहरू पार्क** ही ठिकाणे (दललेक) टॅक्सी शिकाऱ्यांतून, अगर रस्त्यातून बसने अगर टांग्यातून पाहावयाची आहेत. सकाळी निघून संध्याकाळी परत. बरोबर जेवण घ्यावे. वाटेतहि भागविता येणारे पदार्थ मिळतात. तशी ही सहल टॅक्सी मोटरने ३।४ तासातहि होते. पण ते खरे नव्हे.

**सहल एक दिवसाची :** बसने (रिझर्वेशन आदल्या दिवशी करावे) **सोनमर्गला** जाणे. आजूबाजूला हिमनदी. संध्याकाळी परत. या बाजूनेहि अमरनाथला जाता येते. परंतु या रस्त्यावर सर्व सुविधा उपलब्ध नाहीत.

**सहल एक दिवसाची :** वुल्लर सरोवराची सफर. हे भारतांतील सर्वांत मोठे सरोवर. आदल्या दिवशी बसचे रिझर्वेशन करावयास हवे. वुल्लरला प्रदक्षिणा (उलटी) करणारी ही बस वाटेत गांधारबल, क्षीरभवानी (खीरभवानी), मानसबल, वुल्लरदर्शन, बांदिपूर, वल्तब, शोपूर, बारामुळा आणि शहीद स्मारक वगैरे स्थळे पाहाण्यासाठी थांबते व आवशीस श्रीनगरला परतते.

**सहल एक दिवसाची : गुलमर्ग** (फुलांचे कुरण) उंची ८५०० फूट

( २५६० मीटर्स ) श्रीनगर पासून २४ मैलांवर. पोचल्याबरोबर व जेवणाच्या आधी घोड्यावरून **खिलन मर्गला** (उंची ९७०० फूट) जाऊन यावे. जेवण उरकल्यावर राणीमंदिर अगर मंडलाकार रस्त्याने एक फेरफटका मारून यावे. खिलन मर्गलाहि असाच मंडलाकार रस्ता आहे. इथून अर्धे अधिक कश्मीरखोऱ्याचे दर्शन होते. खिलन मर्ग शद्बाचा अर्थ मेंढपाळांचे कुरण.

गुल्मर्ग ही एक आल्हाददायक प्रवासी उपत्यका आहे. आणखी सवड असणारासाठी येथून पुढील सहलीसाठी पुढे अनुसंधान दिले आहे, ते पाहावे

**सहल दोन दिवसांची :** [ ही सहल तरूण मण्डळी एकच दिवसांत उरकू शकतील ] आदल्या दिवशी रिझर्वेशन करून ठेवावयास हवे. पहलगावचे. सकाळीच श्रीनगरहून निघून बस सेवेने पहलगावला पोचायला तीन तास पुरतात. जाताना अगर येताना वाटेतील काही ठिकाणे दाखविणाऱ्या या बसेस असतात. अनंतनाग, अच्छाबल, कुकरनाग, मार्तंड वगैरे. तेव्हा केव्हातरी एकदा बघण्याची संधी घालवू नये. पहलगाव दुपारच्या आत पोचल्यास दुसऱ्या दिवसाची परत जाण्याची चौकशी करून ठेवावी व **चंदन वाडीला** ( पुढे ७ मैल ) घोड्यावर, जीपने अगर ट्रकने सुद्धा चालू लागावे. काही तरी वाहान मिळतेच. वस्ती चंदन वाडीला. इथे एक बर्फाचा पूल आहे तो पहावा. गडद वृक्ष राजीची जंगले आहेत. दुसरे दिवशी बसच्या वेळेच्या आत पुन्हा पहलगावला येऊन श्रीनगरला परतावे. पहलगावला जमल्यास काही पहावे.

आठापैकी सात दिवस संपले. एकाद दिवस खरेदीसाठी ठेवावा. खरेदी सरकारी एम्पोरियम, नदी पलीकडील सरकारी सेंट्रल मार्केट अथवा एखादी विश्वसनीय सिल्क फॅक्टरीतच करावी. फारच वस्ताद प्रवासी असेल तरच त्याने तुमच्याकडे आपण होऊन येणाऱ्या व्यापाऱ्याच्या फंदात पडावे. खरेदीच्या वस्तू अक्रोड, बदाम, केशर ( ताजे ) गरम कापडाच्या बैठका. ( गब्बे ), गालीचे, कापडामध्ये खास करून रेशमी कापड, शाली ऐते तयार कपडे वगैरे.

पहलगाव ही मोठी महत्वाची हिमालयाची उपत्यका आहे. इथून आणखी अनेक सहली नेता येतील. सवड असणाऱ्यांसाठी त्या पुढे दिल्या आहेत. जम्मूकडेहि परतण्याची तिकिटे काही दिवस आधी रिझर्व करावी लागतात. त्याचे स्मरण ठेऊन पहिल्या एक दोन दिवसातच ती काढावी.

शहराच्या थोडेसे बाहेर दल लेक अगर 'बंड' वर हाऊस बोटींचेच हॉटेल बनविलेले असते. ते प्रत्यक्ष पाहूनच मग तिथे जायचे नक्की करायला हवे. ती अनपेक्षितपणे उत्कृष्ट निघण्याचाहि संभव असतो. नुकताच कुणी कश्मीर सहल करून आलेला निघण्यापूर्वी भेटल्यास तो अशा नौका गृहाचे ठिकाण, नाव वगैरे सांगू शकेल. आणखी राहाण्याची सवड असणारांसाठी खालील सहली सुचवीत आहोत प्रथम **गुलमर्ग** बाजू.

**गुलमर्गला** मुक्काम ठोकल्यास सकाळीच लवकर निघून घोड्यावरून अफर्वत (अलापथ्थर) ला जाऊन संध्याकाळी परत येता येते. गुलमर्गच्यावर खिलनमर्ग. त्याच्याहीवर चौदा मैल हे ठिकाण आहे. उंची १४५०० फूट. अफर्वत लेक (फ्रॉझन लेक) चे पाणी चांगले स्वच्छ सुगंधी आहे. दहा हजार फूटावर आरंभी थोडा श्वासोश्वासास त्रास होतो व मनुष्य अगर घोडा लवकर दमतो. भर उन्हाळ्यात तलावात येथे बर्फ खंड तरंगताना दिसतात. बरोबर नेलेले जेवण तिथे उरकून दुपारी परत फिरावे. पलिकडेच पाकिस्तानची हद्द आहे. **तिसरे दिवशी बाबमऋषी** व दुपारी घोड्यावरून **निंगल नाल्याची** सफर करावी. आणखी सवड असल्यास **तोषमैदान** व **फेरोझ-पूर नाला** (वॉटरमीटस्) कडे सहल न्यावी. खुद्द गुलमर्ग हे हवेशीर व सवडीनुसार काही दिवस राहाण्यासाठी चांगले आरोग्यदायी ठिकाण आहे. गोल्फ खेळण्याचे सर्वोत्कृष्ट मैदान येथे आहे. आणखी एक बाजू म्हणजे **पहलगावची.** पूर्वी उल्लेख केल्याप्रमाणे पहलगावा-हून **चंदनवाडी** व चंदनवाडीहून **अमरनाथ** हे बर्फाचे लिंग असलेले एका गुहेतील शंकराचे मंदिर. चंदनवाडीपासून सकाळीच निघाल्यास दुसऱ्या दिवशी प्रवासी चंदनवाडीस परत येतो. वीसएक मैल अंतर आहे. चंदनवाडी जवळील पिसूघाटीत अप्रतीम सृष्टिसौंदर्य दिसते. विशेषतः परत येताना ते जाणवते. वाटेंत शिशनागच्यापुढे महागुणा घाटी १४७०० फूट उंचीची आहे. यापुढे पंचतर्णी व मग अमरनाथ गुहा.

**कोलाहोई ग्लेशर:** पहिलगावहून पुढे बावीस मैलांवर याचा पायथा आहे. वाटेंत ओरु आणि लिदरवत ही मुक्कामाची ठिकाणे आहेत. कोलाहोईच्या पायथ्याशी उंची १४००० फूट. ही कश्मीरमधील सर्वांत मोठी

हिमनदी म्हणजेच ग्लेशर. इथे जाऊन यायला घोड्यावरून तीन दिवस लागतात.

**किरखोळ :** पहिल्गाव पासून २१ मैलांवर **तारसर** सरोवर आहे. पहलगाव ते श्रीनगरच्या परतीच्या रस्त्यावर मार्तंड जवळ **सूर्यमंदिर** व **भौमजोची** कोरीव लेणी आहेत. खूपच सवड असणाराना वाटेत थांबून दिवस मोडणे परवडते. एरवी सहज जाताजाता जमण्यासारखी ही ठिकाणे नव्हेत. महिनाभर मुक्काम असणारांसाठी आणखीही काही नावे सुचवून ठेवतो. **नीलनाग, कौसर नाग, गंगाबल होकरसार, विष्णुसार, कृष्णसार मारसर** वगैरे सरोवरे.

किस्तवाड प्रांत आणि लडाखची राजधानी **लेह**. या ठिकाणीही हौशी सवड असणारी मंडळी जाऊन येतात. उरीची **सीज फायर** लाईन व जम्मू प्रातांतील वैष्णोदेवी ही सुद्धा पाहाण्याची ठिकाणे आहेत.

## कांगडा

कश्मीर पैकी जम्मू व हिमाचल, प्रदेशापैकी कुलू या दोन जिल्ह्यांच्या मधला कांगडा हा हिमाचल प्रदेशांचाच एक जिल्हा. दुसऱ्या दोघांपेक्षा हा जरा कमी महत्वाचा समजला जातो. वेळ नसणारे दुसरे दोन बघतात व हा टाळतात. जम्मूपर्यंत रेलवेचे एक टोक जे. ॲन्ड के. मध्ये गेले आहे तसे कांगडा मध्येहि पठाणकोट पासून उजवीकडे जोगिंदरनगर पर्यंत एक टोक आले आहे. ब्रॉडगेजचेच. परंतु तरीहि या जिल्ह्यात जायला पठाणकोट पासून बसच सोईच्या पडतात. जम्मूहून थेट बसेस तशा अद्याप तरी सोईच्या अशा नाहीत पुढेमागे होतीलहि. तशा त्या आता आहेत किंवा कसे याची चौकशी यापुढे जाणाऱ्यांनी करावी.

**डलहौसी :** पूर्वीच्या लाटसाहेबाच्या नावाने वसलेली ही नगरी धौलाधर पर्वतराजींत पाच टेकड्यांवर वसलेली आहे. पठाणकोटपासून ८० कि. मी. अंतरावर आहे. हवा खाण्यासाठी येऊन राहाण्याचे ठिकाण म्हणून साहेबाच्या वेळेपासून समजले जाते. १९ कि. मी. अंतरावर खजियार सरोवर आहे. बसने जाता येते. आणखी थोडे पुढे दुधामधाचे चंबा खोरे आहे. काही प्राचीन मंदिरे पण आहेत. आसमंतात पंचपुला हे आणखी एक भेट देण्यासारखे ठिकाण. येथे वीर भगतसिंगाच्या चुलत्यांचे स्मारक आहे.

**धर्मशाळा :** डलहौसीहून इथे यायला थेट बसेस नाहीत. बदली करीत जावे लागते. त्यापेक्षा पठाणकोटला परतून तिथून थेट धर्मशाळेची बस पकडावी. म्हणजे उभ्याने प्रवास करावा लागण्याचा संभव नाही. हे ठिकाणही धौलाधर पर्वतराजींत आहे. बस थांबते ती लोअर धर्मशाळा किंवा मॅक्लीऑड गंज. थोड्या उंचावर अप्परधर्मशाळा आहे.इथे दलाई लामांचे बुद्धमंदिर, पाठ-शाळा, वसतीगृह आणि तिबेटींची वसाहत आहे. खालच्यापेक्षा हे ठिकाण शांत व थंड आहे. बेताची सवड असणाऱ्यांनी इथे एखाद दिवस हिंडून पाहिल्यावर बसने ज्वालामुखी, व कांगडा या ठिकाणी जाऊन यावे बरोबर मण्डळी असणाऱ्याची सुद्धा ही दोन ठिकाणे सहज पाहून होतात व संध्याकाळी मुक्कामावर परतता येते. ज्वालामुखी हे ज्वाला देवीचे मंदिर. येथे सतत डोंगरातून येणारा गॅस पेटता असतो. मंदिराच्या आवारात तो दोन तीन ठिकाणी पेटता आहे. एके ठिकाणी पाण्याच्या कुंडातून तो (गॅस) येतो. म्हणून पाण्याला उकळ्या आलेल्या दिसतात. परंतु पाणी थंडच असते. कांगडा हे गाव मध्येच हमरस्त्याच्या बाजूला आहे. येथील वज्रेश्वरी वगैरे मंदिरातील प्राचीन शिल्प व व मुखवटे आकर्षक आहेत. बसपेक्षा टॅक्सी अगर जीप मिळाल्यास वरील दोन ठिकाणाशिवाय पार टोकाला व्यास नदीचा जिथे मोठा नद झाला आहे असे ठिकाण नदांयु, राणीताल आणि डेरा - गोपीपूर वगैरे गावी जाऊन परतता येईल.

**जोगिंद्र नगर :** धर्मशाळेहून हमरस्त्याने जोगिंदरनगरकडे येताना वाटेत पालमपूर आणि बैजनाथ ही गावे लागतात. पालमपूरला हिरव्या चहाचे मळे आहेत. आणि बैजनाथ गावात बैजनाथाचे पुरातन मंदिर आहे. गाडी अर्धा तास थांबणार आहे अशी खात्री असल्यास रस्त्यापासून पाच सात मिनिटाच्या रस्त्यावरील हे मंदिर भाविक नसणारांनी सुद्धा पाहावे. जोगिंदर-नगर तसे बाजारू खेडेगाव. परंतु प्रवाशांनी इथे उतरायचे ते रेलट्रॉलीतील थरारक अनुभवासाठी. इथे रेलवेचे टोक आहे. परंतु इथून पुढे डोंगरावर रेल ट्रॉली सरकारी कामासाठी रोज जाते. त्यांतून हौशी प्रवाशांना नेतात. बॉन्ड द्यावा लागतो व परवानगी काढावी लागते. तीहि आदल्या दिवशी ऑफीसच्या वेळांत. रेलट्रॉली पुरी चढल्यावर तेथील उंची समुद्र सपाटी पासून ८००० फूट आहे. ट्रॉली भिंतीसारखे उभे चढ चढत असता

जंगलाचे व निसर्गाचे रौद्रभीषण स्वरूप प्रत्ययाला येते. खाली हिमाचल प्रदेश विद्युत मंडळाचा व पी. डब्लू. डी चा डाक बंगला आहे. त्यांत राहाण्यास जागा मिळते. प्रत्यक्ष अनुभव इतका थरारक आहे की दोन दिवस मोडल्याचा पश्चात्ताप होत नाही. वाटेत ६००० फूटावर ट्रॉली एकदा बदलावी लागते. वर गेल्यावर परतायच्या आधी वर चहापाण्याची सोय आहे.

## कुलू खोरें

कुलू खोरे म्हणजे व्यास ( बियास ) नदीचे खोरे. याला देवांचे खोरेही म्हणतात. देव देवता व त्यांची देवळे अमाप आहेत. मंडीपासून **रोहटांग खिंडी**पर्यंत व्यासच्या दोन्ही किनाऱ्यावरचा चिंचोळा भूभाग म्हणजे हे कुलू खोरे. काश्मीरसारखे या खोऱ्याचे नागरीकरण व औद्योगीकरण झालेले नाही. त्यामुळे हे मूळ स्वरूपात नैसर्गिक अवस्थेत पाहावयास मिळते. ही चांगली बाजू . परंतु यामुळे इकडे प्रवासी कमी येतात. आणि म्हणून एकूण सुविधा कमीच आहेत. हमाल, घोडे, वाहने अगर खास जीप वगैरे प्रवाशांच्या गरजेच्या गोष्टी सहज मिळत नाहीत. हा जिल्हा पूर्वी पंजाबात होता. आता हिमाचल प्रदेशाचा डोंगरी जिल्हा आहे.

पूर्वी इथे यावयास पठाणकोट ते मंडी व मंडी ते कुलू हा एकच रस्ता होता. आता सिमल्याहून मंडी-कुलू अशी सरळ बस सर्विस आहे. तसेच चंदिगड - रोपड - मंडी – कुलू असा तिसराहि रस्ता आता झाला आहे.

कुठूनहि आले तरी मंडी हे शहर बसने सोडले म्हणजे कुलू खोरे लागते. खरे हे व्यास नदीचेच खोरे. परतीच्या वाटेवर पुन्हा मंडीला येईपर्यंत आपणा व्यासच्या नजरेखालीच असतो. नेपाळी टोपी, काश्मीरी टोपी तशी कुलूचीपण एक खास मखमली टोपी आहे. अनेक प्रवासी ती घालून सगळीकडे हिंडताना दिसतात. या कुलू खोऱ्यात आठवडाभर सवड असणाराला सुद्धा खालील महत्वाची ठिकाणे पाहाता यावीत एवढी प्रवासी वाहने आता उपलब्ध झालेली आहेत. खुद्द कुलू, मणिकरण ( पार्वतीखोरे ) नग्गर, मनाली, व राहाला-रोहटांग खिंड. ( उंची १३००० फूट ) रोहटांग खिंडी पर्यंतच्या उंचीवर जाणरी बस सेवा आहे. कुलू व मनाली या दोन ठिकाणी आपणास मुक्काम ठोकावा लागतो. कुलूला बसमधून उतरल्यावर कुणीतरी प्रथम जवळच असलेल्या टूरिझम खात्याच्या कचेरीत जागेची चौकशी करावी. रिझर्वेशन केले

असल्यास उत्तमच. नसल्यास सुद्धा बहुतेक जागा मिळते. त्यांच्या निवासात मिळाल्यास स्वस्त व सोइस्कर असते. तिथे जेवणाची सोय पण असते.त्याशिवाय पी. डब्ल्यू. बंगला, सरकीट हाऊस आहेच आणि या सर्वांशिवाय मग हॉटेले आहेत. सरकारी रेस्ट हाऊस आणि अल्यूमिनीयमच्या झोपड्याहि आहेत. इतर सर्व ठिकाणाची पण रिझर्वेशन्स येथूनच होतात. कुलूची उंची सुमारे ४००० फूट (१२१९ मीटर्स) आहे. उन्हाळयात थंडी बऱ्यापैकी व हिवाळयांत फार असते.

कुलू खोऱ्यात हिंडताना एक दिवसाचे खाणे फराळ आपल्या बरोबर ठेवायला हवे. लहान लहान गावी काही सोय नसते. असल्यास ती आपल्या मनाजोगती निघणार नाही. म्हणून ही काळजी घ्यायला हवी.

या कुलू खोऱ्यात आल्यावर एक आठवड्याचीच सवड आहे असे गृहीत धरून पुढील सहली सुचविल्या आहेत. तसेच आणखी फुरसत व साधन संपन्नता असलेल्यासाठी आणखी विस्तृत सहली शेवटी सुचविलेल्या आहेत. त्या त्या जागीहि सुचविल्या आहेत.

**कुलू :** आपण बसमधून उतरतो ते धालपूर मैदान आखाडा बाजार म्हणजे जुने गाव. ते मैदानापासून जवळच नदीच्या काठाने आहे. प्रवासी तळ म्हणून याला महत्व. जिल्ह्याचे ठिकाण असल्यामुळे कचेरी, कोर्ट बँका वगैरे नागरी सोयी आहेत. बस सर्व बाजूच्या थांबतात.

**मणीकरण :** भुंतर पर्यंत सहा मैल मागे गेल्यावर पार्वती नदीचा ब्यासशी संगम झालेला दिसतो. म्हणजे आता पार्वती खोऱ्यांत जायचे म्हणजे पूर्वेकडे जायचे. मणीकरणला जाणाऱ्या बसेस थेट मनाली-कुलू हून येतात किंवा काही खुद्द भुंतरहून सुटतात. भुंतर पासून वीस मैलावर मणीकरण. मणीकरणला जाणारे बहुतेक सर्व प्रवासी बाबा मणीकरण हरीच्या चार मजली गुरुद्वारात उतरतात. जेवणाची राहण्याची फुकट सोय होते. धर्म जाति निरपेक्ष सेवा आहे. बाजूला पार्वती मैय्या बर्फासारख्या गार पाण्याची वाहाते व आत आवारात गरम पाण्याची कुंडे आहेत. पाणी मधुर व रेडियम युक्त आहे. गुरुद्वाराच्या खालचे खडक गरम असल्यामुळे सबंध इमारतीत ऊब वाटते. बस नदीच्या पलीकडे थांबतात. पलीकडून बाबाच्या गुरुद्वारात यायला खास झुलता

पूल आहे. शिवाय दुसरा लाकडी जुना पूल बाजूला आहे. गावात रघुनाथजीचे मंदिर आहे. गरम पाण्याचे झरे इथेहि आहेतच. आणखी सवड असणाऱ्यास व चालत जायची ताकद असल्यास तीन दिवसांची क्षीर गंगेची सहल आहे. सवड व उमेद असणाऱ्यांनी जाण्यासारखे ठिकाण आहे. अधिक माहिती पहाड, पाणी, परी मध्ये आहे.

**नग्गर चंदरखाणी :** अलिकडे कुलू पासून (थेट जाणाऱ्या) टॅक्सी मिळतात. बसने मात्र कुलू मनाली रस्त्यावर कट्रांए येथे उतरून पलीकडे चालत व चढत जावे लागते. पूर्वी तोच फक्त मार्ग होता. प्राचीन रजपूत राजवाड्याचेच गेस्ट हाउस केले आहे. इथे दुसऱ्या युद्धपूर्व कालात प्रसिद्ध रशियन चित्रकार रोअरीश राहात होता. त्याची आर्ट गॅलरी अद्याप पाहावयास मिळते. इथे व चंदरखानीला अजोड सृष्टीशोभा पाहावी. तितकी सावकाशी मात्र हवी. येथून जवळच्या मलाना गावचे पहाड, पा. परी मधील वर्णन केलेले अग्र हार खेडेगाव आता साफ बदलले आहे, म्हणजे गाव तसेच आहे. पण माणसे बदलली - बिघडली आहेत.

**मनाली :** येथे सरकारी निवासात राहाण्याचे पास - परवाने कूलूस- मिळतात. ते निघण्यापूर्वी आठवणीने घ्यावे. जागा शक्य तो उंचावरची पसंत करावी. म्हणजे या कुलू राणीचे वैभव राहात्या ठिकाणापासूनच प्रत्ययाला येऊ लागेल. रात्र चांदणी असल्यास वातावरण स्वप्नील वाटते. थंडी चिक्कार असते. सर्व गरम कपडे पांघरुणे काढावी लागतात. दुसऱ्या दिवशी बडे फजल आपण उतरू त्याच्या मागऱ्या बाजूला डोंगरात असलेले हिडींबादेवीचे (भीमाची राणी) मंदिर पाहून घ्यावे. देवदाराच्या लाकडावरचे नक्षीकाम शेकडो वर्षे टिकून आहे. नाष्टा केला नसल्यास खाली गावात करून घ्यावा व वसिष्ठ गावाकडे – नदी पलीकडील डोंगरात, माऊन्टेनिअरिंग संस्थेच्या पलीकडे चढावावर ही गरम (पण गंधक युक्त) पाण्याची कुंडे आहेत तिकडे निघावे. आता चांगली न्हाणी घरे बांधलेली आहेत, येताना वाटेत अनेक पाणचक्या लागतील. धान्य दळण्याची किती सहज सोय निसर्गाने केलेली आहे! परत मुक्कामावर एकादी फळबाग बघून घ्यावी. फळाच्या राशी जवळ उभे राहून छायाचित्रे काढावी. हौशी व उत्साही महिला तेथील पाहाडी स्त्रियांचे पोषाखात त्यांच्या सारख्या कार्यमग्न असतानाच्या थाटात फोटो काढून

घेतात. हे इथेच असे नव्हे. अनेक ठिकाणी करून मिरविण्याइतका उत्साह अनेक महिला व पुरुष दाखवितात. याच संध्याकाळी मुख्य काम म्हणजे सिमल्याकडे परतायचा दिवस ठरवून परतीची तिकिटे आरक्षित करून ठेवणे. तसेच दुसरे दिवशीची रोहटांग खिंडीची बस तिकिटे काढणे.

**रोहटांग खिंड :** उंची ३९६२ कि. मी. सुमारे १३००० फूट. पलीकडे रस्ता लहौल व स्पिती या डाव्या व उजव्या हाताला तिबेट सरहद्दीकडील भागाकडे गेला आहे. ओसाड तिबेटीच प्रदेश आहेत हे दोन्ही भाग म्हणजे. रोहटांग खिंडीच्या पायथ्याशी राहाला हे गाव आहे. बस दुपारी वर पोचते. तासाभराने बस परत यायची असते. बरोबर नेलेले खाणे जास्त सोईचे. येताना सड्या तरुणांनी एक करण्यासारखा प्रयोग आहे. खिंड (परतताना) उतरल्यावर या तरुणांनीही उतरावे (राहाल्या पासून दुसरी बस मिळण्याची सोय असल्यास) आणि राहाला कोठी या दोन मैलांच्या रस्त्यातून चालत जावे. राहालाला धबधबे वगैरे तर आहेतच पण दोन्ही बाजूच्या जंगलांत काही पाहाण्यासारख्या गोष्टी आहेत. बस न मिळाल्यास मनालीपर्यंत पायी जाणे फार कठीण नाही.

फक्त आठवड्याची सवड असणाऱ्यांसाठी ही सहल आता पुरी झालेली आहे. सिमल्याहून इकडे आलेल्या मण्डळींना परत सिमल्याला जायचे असते. परंतु पठाणकोटकडून आलेल्या मण्डळीनीहि सिमल्याकडून जाणे इष्ट. रस्ता जवळचा शिवाय सिमलाहि जाताजाता सवड असेल त्याप्रमाणे पाहाता येईल.

मध्यम वर्गास परवडतील व त्यांना जी सामुग्री सहज मिळणे शक्य असून जिथे जाता येईल अशी स्थाने वर दिली आहेत. यामध्ये सुद्धा 'आणखी सवड असल्यास '....' असे जिथे लिहिले आहे, ती स्थळेहि त्यांस बहुतेक वेळाभावी पाहाता येणार नाहीत अशी शक्यता आहे. तेव्हा वर दिलेल्या स्थळा पैकीहि त्यांच्या वेळापत्रकांत बसतील तीच त्यांस पाहाता येतील. आता जी स्थळे खाली दिली आहेत. ती ज्यांना भरपूर फुरसद व उमेद आहे त्यांच्यासाठी समजावी. यापैकी बहुतेक ठिकाणी बरोबर तंबू, घोडे व घोडेवाले अशा तऱ्हेचा सरंजाम असावा लागेल. परदेशी टुरिस्ट व देशी विमानी प्रवाशांना असल्या ठिकाणी जाणे परवडेल. विशेष हौशी प्रवाशानीसुद्धा हायकिंगला जावे.

**कुलूहून कैसधर :** टूरिस्ट बंगल्याच्या मागल्या बाजूनीच कैसधरकडे रस्ता जातो. कुलूतील डोंगर चढून गेल्यावर पलीकडे दिसते ते कुलू खोरे नसून ते सरवारी खोरे आहे. हे उजव्या हाताला आहे. तसेच पुढे गेल्यावर रस्ता पुन्हा डाव्या हाताला वळतो. आणि सुंदर देवदारवटीच्या वनश्रीतून चढत चढत कैसधरला जातो. ठिकाण इतके आकर्षक आहे की येथे एखाद दोन दिवस आरामांत राहावेसे वाटते. येथे दूध दुभते मिळते. याच्या पुढे कडक उताराच्या रस्त्यावरून आणखी पुढे गेल्यास **नागिणी** हे ठिकाण बघण्यासारखे असे येते. नागिणी म्हणजे सर्पाची माता. येतांना **बजौरा** येथे मोठ्या रस्त्याला मिळायचे व नऊ मैल मागे कुलूला परत यायचे अशी ही सहल आहे.

**कुलूहून बिजली महादेव :** आपण उतरलेलो असतो तिथून हा बिजली महादेवाचा डोंगर समोरच दिसत असतो. बाजाराच्या पलीकडील व्यास नदीवरील पूल ओलांडून पलीकडे गेले की उजव्या हाताचा रस्ता पकडायचा. बोरसू रेस्ट हाऊसकडे चढायला लागल्यावर रेस्ट हाऊसच्याहि पुढे जंगली रस्त्याने चाल चालू ठेवायची. डोंगराच्या कळसापर्यंत पोचल्यावर बिजली महादेवाचे देऊळ दिसायला लागते. या देवस्थानचा विशेष म्हणजे पावसाळ्यात जेव्हा कडाडून विजा चमकतात, तेव्हा देवळाजवळच्या लोखंडी खांबावर वीज पडते व ती शिवलिंगापर्यंत पोहोचून शिवलिंग तडकते. तडकलेले शिवलिंग सत्तूच्या पीठाने सांधतात. डोंगराच्या दुसऱ्या बाजूस उतरून गेल्यावर जारीच्या बाजूला उतरता येते. परंतु रस्ता तेव्हढा बरा नसल्यामुळे सहसा प्रवासी आल्या रस्त्यानेच परततात.

**मनाली-हमटा-रोहटांग :** ही तिकोनी सहल आहे. मनालीहून निघून दुसऱ्या बाजूने पुन्हा मनालीलाच परतायचे. बरोबर तंबू-घोडे वगैरे पाहिजेत. मनालीहून निघून व्यास नदी ओलांडल्यावर उजवीकडे पिरणी गावाकडे निघायचे. हे दोन मैलावर आहे. आणखी पुढे गेल्यावर दोन मैल कडी चढण लागते. आणि मग कुरणे दिसू लागतात. असेच पुढे गेले की, लाहौलच्या घोडेविक्यांनी वसविलेले एक गाव लागते. ते गेल्यावर व एकूण चाल दहा मैलाची झाल्यावर चिका या गावी मुक्कामाची जागा येते. पुन्हा कडी दोन मैलांची चढण चालल्यावर हमटा खिंड ( १४००० फूट ) येते. इथे

त्रिकोणाची एक बाजू पुरी झाली. खिंड ओलांडल्यावर चंद्रा नदीच्या काठी आपण येतो. मागच्या मुक्कामापासून नऊ मैलावर मुक्काम ठोकण्यास चत्रू येथे चांगली जागा आहे. हमस्त्याला येताना खिंडीतील वनश्री नामांकित आहे. चत्रूच्या पुढे त्रिकोणाची दुसरी बाजू चालू होते ती आठ मैलांवरील खोकसार गावी संपते. आता इथून मनालीपर्यंत त्रिकोणाची तिसरी बाजू. वाटेत रोहटांग खिंड लागते. ही वाट अतिरम्य. याचे वर्णन एकदा मागे येऊन गेले आहे. त्याशिवाय लहौल या विस्तीर्ण खोऱ्याचे दर्शन हा अधिक लाभ.

अशा आणखी कितीतरी सहली बरीच फुरसत असणारांसाठी कुलूच्या मनालीच्या आसपास सुचविता येतील. आणि तिथे आरामात राहाणाऱ्यालाहि डोंगरातील अनेक ठिकाणाची माहिती टूरिस्ट खात्याच्या पत्रकात आहे व सविस्तर समक्ष माहिती निघायच्या आधी घ्यायला हवी.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६२८
दा. क. २३७६९
संग्र. शाखा (स्थळ प्रत)
REFBK-0023769
REFBK-0023769